
ऑक्टोबर १०.७०

# अर्थ

दिवाळी अंक


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र




Tom & Bay/KO-7074-M

ही दीपावली व नूतन संवत्सर
आमच्या असंख्य ग्राहकांस व हितचिंतकांस
आनंदाचे व सुखासमाधानाचे जावो.

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
पुणें-३ (भारत)


स्निकर
३ ते ६ रु. ३.२५
७ ते १० रु. ३.९५
जवान
५ ते ९ रु.१७.९५
लीडर
५ ते ९ रु. १८.९५
लाखोंची पसंती
स्वस्तिक कॅन्व्हास पादत्राणे
• सर्व वयाच्या लोकांना रोजच्या वापरण्यास सुटसुटीत
• सुबक, आरामशीर व वजनास हलकी
शिवाय माफक किंमत.
स्वस्तिक पादत्राणे म्हणजे गुणवत्ता आणि
मितव्यय यांचा सुरेख संगमच।
• स्थानिक कर जादा
स्वस्तिक
स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.
खडकी, पुणे ३.
पॅंथर
३ ते ९ रु. ५.९५
१ ते २ रु. ४.५०
न्यू कट ३ ते ९ रु. ५.५०
कॉटन कॉर्डयुरॉय कॅज्युअल ५ ते ९ रु. १६.५०
SRP-2068-E



आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप द्या : आपल्या प्रेमातील माणसांच्या भविष्यकाळासाठी तरतूद करा. त्यांच्यासाठी बचतीस सुरवात करण्याची दीरंगाई करू नका. आपल्या मुलांच्या नांवाने बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग्ज बँक खाती उघडा.

## कोरडे प्रेम काय कामाचे...

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/1058 MAR.

---

## आपली आवड

# बेडेकर
## उत्पादनें




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड व इतर उत्पादनें उत्तम साफ केलेले कच्चे पदार्थ व या विषयांतील ५५ वर्षांचा रोजचा अनुभव यामुळें सर्वांनांच आवडतात. आपणही अनुभव घ्या.

व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स प्रायव्हेट लि.
मुगभाट, मुंबई ४

B.VASANT 165

# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल को-ऑप. बँक लि.,

फोन : ऑफिस ३६०२, मॅनेजर ४४३९ ‖ ऑडिट वर्ग "अ" ‖ **सोलापूर** ‖ तारेचा पत्ता : उद्योग बँक; स्थापना : सन १९४९; पोस्ट बॉक्स : १४०

:: मुख्य कचेरी :: २९।३० रविवार पेठ, सोलापूर

:: शाखा :: (१) नाथ चौक, पंढरपूर, फोन नं. ११० (२) सदर बझार, सोलापूर, फोन नं. २५५५

३१–८–१९७० ची बँकेची सांपत्तिक स्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ... | ... | रु. ७५,००,००० |
| खपलेले भाग भांडवल | ... | ... | रु. ५१,१०,००० |
| राखीव व इतर निधी | ... | ... | रु. १८,३८,३०० |
| ठेवी | ... | ... | रु. ४९,५०,१०० |
| कर्जे | ... | ... | रु. २,६५,४४,५०० |
| एकूण खेळते भांडवल | ... | ... | रु. २,९९,८१,८०० |

आपल्या शाखानिशी विणकर सहकारी संस्था व औद्योगिक संस्था यांचे सेवेत सदैव सिद्ध. ठेवीवरील आकर्षक दर, ड्राफ्टबद्दलच्या सोयी, आपल्या मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्यासाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय, यासाठी जरूर भेटा.

:: व्याजाचे आकर्षक दर ::

(१) चालू......१/२ टक्का (२) बचत ठेव......४ टक्के (३) मुदत ठेव......५ ते ७ टक्के

भी. चे. पप्पू, जी. डी. सी. ॲण्ड ए., जनरल मॅनेजर — गं. सि. कुचन, चेअरमन

भारतातील सर्वप्रथम स्थापित व महाराष्ट्र राज्यातील एकमेव औद्योगिक सहकारी बँक



# सोलापूर नागरी
## औद्योगिक सहकारी बँक लि.,

५१, साखरपेठ, सोलापूर

तार–नागरी बँक ] [ टेलिफोन नं. ४३२२

आपल्या पैशाचे सोने करावयाचे असेल तर ते सोन्यात गुंतविण्यापेक्षा सोना बँकेत गुंतवा !

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. ३,६८,००० |
| सरकारी भाग भांडवल | रु. ३,००,००० |
| ठेवी | रु. १९,२०,००० |
| खेळते भांडवल | रु. ५६,००,००० |

आमच्या येथे सर्व तऱ्हेची बँकिंगची कामे करण्यात येतात.

—जास्त माहितीसाठी समक्ष चौकशी करा—

व्यं. ति. मुतालिक, जी. डी. सी. ॲन्ड ए., मॅनेजर — मुरलीधरजी क. भुतडा, चेअरमन



ही दिवाळी आमच्या ठेवीदारांना व ग्राहकांना सुखाची व समृद्धीची जावो

सहकारी चळवळ आज जीवनाच्या सर्व थरांतील एक अत्यावश्यक बाब झाली आहे. प्रत्येक शेतकऱ्याने, लहान उद्योगधंदे करणाऱ्याने व ठेवीदाराने सहकाराचे तत्व अंगिकारून आपल्या जीवनाचे उज्ज्वल भविष्य निश्चित करावे. जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे केन्द्र बिंदू म्हणजेच

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., स्टेशन रोड, नांदेड

आपल्या ४० शाखानिशी सहकारी तत्त्वाधारे जनतेच्या कल्याणासाठी अखंड सेवा करीत आहे.

या बँकेत ठेव ठेवणे म्हणजे सहकारी चळवळीद्वारे जिल्ह्याच्या समृद्धीस हातभार लावणे होय. म्हणून मोठ्या प्रमाणात ठेवी याच बँकेत ठेवा. त्यावर आपणांस आकर्षक दराने व्याजही मिळते.

अधिक चौकशीसाठी बँकेच्या मुख्य कार्यालय व शाखा कार्यालयांना भेट द्या व सेवेची संधी द्या.

वा. न. संत, मॅनेजर — शामराव कदम, चेअरमन

☆ **अर्थ** ☆

**दिवाळी अंक**

बुधवार, २८ ऑक्टोबर, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !

### अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. शेतकी धंदा काढण्याचा ९० वर्षांपूर्वीचा प्रयत्न | ९ | ८. गिन्हाइकांच्या तक्रारींचे स्वागत करून दखल घ्या | ३३ |
| २. महाराष्ट्रात मँगेनीजच्या खाणींच्या धंद्यास सुवर्णसंधी | ११ | ९. कुटुंबनियोजनाच्या पाच वर्षांची फलश्रुती | ३७ |
| ३. स्वस्तिक-रत्न श्री. वसंतराव वैद्य | १३ | १०. एक्स्पो प्रदर्शनासाठी भारताचा २ कोटी रु. चा खर्च | ४१ |
| ४. सहकारी हौसिंग सोसायट्यांत लाखो रुपये कसे खातात ? | २१ | ११. भारताच्या अर्थव्यवस्थेत पोलाद कारखान्यांचे स्थान | ४३ |
| ५. खाजगी सेक्रेटरीचे काम करणाऱ्या तरुणींची निवड | २५ | १२. चित्रपटाच्या चंदेरी दुनियेमागील कठोर व्यवहार | ४९ |
| ६. श्री. बी. के नाईक | २९ | १३. सहकारी बँका आणि पतपेढ्या ह्यांची सद्य:स्थिती | ५३ |
| ७. परदेशी पाहुण्यांनी केलेल्या स्तुतीमुळे दिशाभूल | ३१ | १४. विधिमंडळात प्रभावी ठरलेले एक मत | ५७ |




दिपावली अभिष्ट चिंतन

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लॅंड मॉर्गेज बॅंक लि.

जे. के. बिल्डिंग, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई–१

(दूरध्वनी २६७८०१)

☆ तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स्, पंपिंग सेटस्, इलेक्ट्रिक मोटर्स, तसेच जमीन सुधारणेकरिता शेतकऱ्यांना कर्ज देणारी बॅंक.

☆ जून १९७० अखेर बॅंकेचे भाग भांडवल ७ कोटी, ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज रुपये १०४ कोटी.

| रा. गो. गोखले | जी. पी. भावे | नी. आ. कल्याणी |
|---|---|---|
| व्यवस्थापक. | कार्यकारी संचालक. | अध्यक्ष. |

"सेंट्रल"ला आपले बचत केंद्र करा!

## सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया

(हेड ऑफिस : महात्मा गांधी रोड, मुंबई–१)

### पुण्यातील कचेऱ्या

- महात्मा गांधी रोड, पुणे कॅंप
- टिळक रोड, पुणे–३०
- पिंपरी, पुणे–१८
- येरवडा, पुणे–६
- लक्ष्मी रोड, पुणे शहर
- भवानी पेठ, पुणे–२
- शिवाजीनगर, पुणे–१६
- शंकरशेट रोड, पुणे–९
- डेक्कन जिमखाना, पुणे–४
- स्वारगेट, पुणे–३०
- हडपसर, पुणे–१३
- रास्ता पेठ, पुणे–११

आमची एअरकंडिशण्ड पुणे कॅंप कचेरी सेफ डिपॉझिट लॉकर्सनी सुसज्ज आहे. आमच्या टिळकरोड, डेक्कन जिमखाना, स्वारगेट आणि पिंपरी शाखांतही लॉकर्सची व्यवस्था आहे.

| एस. आर. टिपणीस | एन. रामानंदराव |
|---|---|
| चीफ एजंट (पुणे विभाग) | कस्टोडियन |

# शेतकी बँका काढण्याचा ९० वर्षांपूर्वीचा प्रयत्न

## न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे ह्यांची दूरदृष्टी

सुमारे ९० वर्षांपूर्वी शेतकी बँका स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रात जे प्रयत्न करण्यात आले, त्यांचा बहुतेकांना विसर पडलेला दिसतो. तथापि तेव्हा जर हे प्रयत्न यशस्वी झाले असते तर आज शेतीची इतकी निकृष्टावस्था झालीही नसती.

शेतकऱ्यास जमिनीची सुधारणा करण्यास, मागील देणे भागविण्यास वगैरे कामासाठी जे भांडवल लागते, ते कमी व्याजाने मिळवून देणे, हे शेतकी बँकेचे मुख्य काम होय. या कर्जाची फेड दीर्घ मुदतीने करावयाची असते व त्यामुळे नेहमीच्या बँका किंवा सावकार यांचेकडून असे कर्ज मिळणे अशक्य असते. महाराष्ट्रामधील शेतकऱ्यांचे दारिद्र्य तर विशेषच प्रसिद्ध आहे. तेव्हा, सरकारी मदतीने शेतकी बँका स्थापन करण्यासाठी १८८२ ते १८८६ च्या दरम्यान जी खटपट करण्यात आली, त्याची थोडक्यात हकीकत खाली दिली आहे.

### पुरंदर तालुक्यात शेतकी बँक

२० नोव्हेंबर १८८३ रोजी पुणे येथे प्रमुख लोकांची एक सभा भरून, शेतकी बँकेच्या योजनेसंबंधी सरकारी सहानुभूती मिळविण्यासाठी गव्हर्नरसाहेबांकडे शिष्टमंडळ नेण्याचे ठरले, व लागलीच रावबहादुर मुदलियार यांचे प्रमुखत्वाखाली या शिष्टमंडळाने गव्हर्नरसाहेबांची गाठ घेतली, आणि पुरंदर तालुक्यापुरती प्रयोगाखातर एक शेतकी बँक काढण्यास सरकारी मदत मागितली. त्यावेळी पुरंदर तालुक्यामधील शेतकऱ्यांना एकूण ६,५०,००० रुपये कर्ज असावे, असा अंदाज होता. एवढी रक्कम सरकारने नियोजित बँकेस चार टके दराने दोन वर्षांच्या मुदतीने कर्जाऊ द्यावी, अशी विनंती करण्यात आली. बँकेने ही रक्कम शेतकऱ्यांचे पूर्वीचे कर्ज निवारण्यासाठी उपयोगात आणावी अशी योजना होती. स्टँप ड्यूटी, कोर्ट फी, इत्यादींची माफी मिळावी अशीही विनंती करण्यात आली. गव्हर्नरसाहेबांनी योजनेस सहानुभूती दाखविली.

शेतकी बँकेच्या योजनेस विलायतेमध्येही पाठिंबा मिळावा, म्हणून खटपट करण्यात आली. सर विल्यम वेडरबर्न हे फर्लो रजेवर असताना त्यांनी विशेष मेहनत घेऊन इंग्लंडमध्येही एका कमिटीची स्थापना केली व योजनेस प्रमुख लोकांची सहानुभूती मिळविली. त्यांनी 'मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स' पुढे व्याख्यानही दिले. खुद्द 'लंडन टाइम्स' पत्राने बँकेच्या योजनेची स्तुती केली व अशा बँका हिंदुस्थानात स्थापन झाल्यास ब्रिटिश कारखानदारांनाही पर्यायाने फायदा होईल, हे दाखवून दिले.

### बँकेच्या योजनेचे स्वरूप

पुण्याच्या सभेने नेमलेल्या कमिटीची योजना अशी होती, की सरकारकडून कर्ज घेऊन बँकेने पुरंदर तालुक्यामधील अगदीच ऋणबद्ध शेतकरी सोडून बाकी सर्व शेतकऱ्यांना कर्जे द्यावी व त्यांना ऋणमुक्त करावे. त्यांच्या सावकारांचे देणे देऊन टाकावे, व बँकेने शेतकऱ्याची सर्व जमीन लावून घ्यावी. बँकेला शेतकऱ्याकडून बारा टक्क्यांपेक्षा जास्त व्याज घेता येऊ नये, व मुद्दल व व्याज वसूल करण्यास सरकारी रेव्हिन्यू खात्याने मदत करावी. त्याचप्रमाणे स्टँप व कोर्ट फीची सरकारने माफी द्यावी व वीस वर्षेपर्यंत सारा वाढविणार नाही, अशी सरकारने हमी द्यावी. अशा रीतीने शेतकऱ्यांना लांब मुदतीचे कर्ज देण्यापूर्वी त्यांचे पहिले एकूण कर्ज किती आहे, हे ठरवावे लागेल. ते ठरविण्यासाठी एक कमिशन नेमण्यात यावे. ही सर्व व्यवस्था बँकेच्या स्थापनेपूर्वी व्हावी, अशी कमिटीने सरकारकडे विनंती केली होती.

कमिटीच्या योजनेवर सर्वे व सेटलमेंट कमिशनरने दिलेले मत मनोरंजक आहे. सरकारने एका खाजगी बँकेची कर्जे वसूल करण्यास मदत केली, तर त्याचे राजकीय परिणाम हितावह होणार नाहीत, व शेतसाऱ्याबरोबर बँकेचे हप्ते वसूल केल्यास शेतकऱ्याचा सरकारवरील विश्वास उडेल, असे त्याचे म्हणणे होते.

पुण्याची कमिटी, सर विल्यम वेडरबर्न, मुंबई सरकार, हिंदुस्थान सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा परस्परांमध्ये दोन वर्षे पत्रव्यवहार चालू होता. सरकारी रेव्हिन्यू खात्याने बँकेच्या कर्जवसुलीच्या भानगडीमध्ये पडू नये, असा सरकारी धोरणाचा रोख होता; उलटपक्षी अशी मदत बँकेस अत्यंत आवश्यक आहे, बँकेने खटपट करूनही हप्त्यांची वसुली झाली नाही, तरच सरकारी मदत आम्ही मागू, असे कमिटीचे म्हणणे होते. बँकेच्या डिबेंचरावरील व्याजाची सरकारने हमी द्यावी असे कमिटीने सुचविले होते, आणि सरकारी हिशेब-तपासनिसांनी बँकेचे हिशेब तपासण्यास कमिटीची हरकत नव्हती.

### स्टेट सेक्रेटरीने योजना फेटाळली

सेक्रेटरी ऑफ स्टेटने सर्वच योजना धुडकावून लावली. संयोजित बँक म्हणजे एक सरकारीच बँक होईल, तिला विशेष सवलती द्याव्या लागतील, कमी दराने सरकारकडून व्याज घेऊन त्यावर बँक मधल्यामध्ये नफा मिळवील, डिबेंचर्सला तारण मिळणार नाही, बँकेच्या कारभाराने शेतकऱ्यांच्या सर्व अडचणींचे निवारण होणार नाही, रेव्हिन्यू अधिकाऱ्यांनी कर्जवसुलीस मदत करणे श्रेयस्कर होणार नाही, इत्यादी मुद्दे पुढे मांडले. शेतकऱ्यास न्याय मिळावा, व तोही लवकर व स्वस्त मिळावा, अशी सरकार खबरदारी घेईल, आणि शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे व अशिक्षितपणामुळे त्यांचे नुकसान होऊ देणार नाही. परंतु खोलात हात

घालणे राजशासनाच्या तत्त्वास धरून होणार नाही, असा त्याने अभिप्राय दिला. इजिप्तमध्ये शेतकी बँका आहेत त्यांसंबंधी त्याने माहिती मागविली, व तेथील व हिंदुस्थानमधील परिस्थिति भिन्न आहे या सबबीवर सरकारी मदतीने या देशात शेतकी बँका स्थापण्याचे विरुद्ध त्याने मत दिले. पुण्याच्या कमिटीने सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या विधानांना पूर्णपणे उत्तरे दिली, परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

अशा रीतीने, ९० वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्ये शेतकी बँका स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला, व तो अयशस्वी झाला. बिन-सरकारी हिंदी लोकांप्रमाणे सर विल्यम वेडरबर्न-सारख्या युरोपियन अधिकाऱ्यांनीही खटपट केली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे या योजनेच्या मुळाशी होते, व त्यांच्या स्फूर्तीनेच हे सर्व प्रयत्न झाले. विलायतेमधील लोकमतही अनुकूल होते. अशा बँका स्थापन झाल्यास ब्रिटिश भांडवल गुंतविण्यास एक उत्तम संधी मिळेल व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास पुढे ब्रिटिश माल हिंदुस्थानात जास्त खपेल, अशी तेथील व्यापाऱ्यांना आशा वाटत होती. मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकारही या योजनेस प्रतिकूल नव्हते, तथापि "सरकारने आर्थिक बाबतीत हात घालू नये" या "खुल्या व्यापारा"च्या तत्त्वाचा पुरस्कार त्या वेळी जोराने होत असल्याने व इतर राजकीय कारणासाठी ही योजना फेटाळून लावली गेली.

---

[ स्थापना १९२१ ]

गरगट्टी ॲंड सन्स

शहापूर–बेळगाव

धोबी, फॅमिली व शिंपी पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देशबांधवांस हे वर्ष सुखाचे जावो !

दीपावली अभीष्टचिंतन

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.

साखरेप्रमाणेच रासायनिक धंद्यातही अग्रेसर.

प्रत्येक कुटुंबाची आवड :—

☆ शुभ्र दाणेदार, मोहक व गोडच गोड साखर ☆

*अनेक धंद्यात आवश्यक असणारी आमची रसायने—*

ॲसेटिक ॲसिड, एन् ब्युटेनॉल, ब्युटाईल ॲसिटेड, ॲबसोल्युट अल्कोहोल, रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिट.

आमची उत्पादने उत्कृष्ट व नाणावलेल्या दर्जाची असतात.

भारतातील एक प्रमुख अद्ययावत कारखाना.

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.
कसबा बावडा, कोल्हापूर नं. ३.

# महाराष्ट्रात मँगेनीजच्या खाणींच्या धंद्यास सुवर्णसंधी

पूर्वीच्या मध्यप्रांतातील खाणीतून काढण्यात येणाऱ्या मँगेनीज खनिजाला जागतिक बाजारपेठेत मोनॅपोलीच असल्यासारखी परिस्थिती होती. युद्धोत्तर काळात गुजरात (शिवराजपूर), ओरिसा आणि महाराष्ट्र येथील खाणीही भरभराटीत होत्या. पुढे मँगेनीज निर्गतीच्या चक्राचे, इतर सर्व व्यापारी चक्राप्रमाणे, एक आवर्तन पुरे झाले आणि बाजारभाव इतके घसरले, की लहान आणि मध्यम आकाराच्या खाणी बंद पडल्या. जागतिक बाजारपेठेतील भारताचा वाटा फक्त १५% वर आला.

१९५५ ते ६५ ह्या काळात सात ठिकाणी 'फेरो मँगेनीज' प्लँट्स बसविण्यात आले. ह्या प्लँट्समध्ये कच्च्या मँगेनीजचे रूपांतर करून ते पोलादाच्या कारखान्यांत वापरता येते. पोलादाच्या तीनही नवीन कारखान्यांत, विशेषतः भिलाईला, फेरो मँगेनीज मोठ्या प्रमाणावर लागते. अशा रीतीने, मँगेनीजच्या खाणींना नवे गिऱ्हाईक लाभले आहे. सात फेरो मँगेनीज प्लँट्सपैकी भद्रावती येथील प्लँटचे रूपांतर फेरोसिलिकॉनच्या उत्पादनासाठी तीन-चार वर्षांपूर्वी करण्यात आले. महाराष्ट्रीयांच्या दृष्टीने कन्हान (नागपूर जवळ), तुमसर (भंडाऱ्याजवळ) आणि दंडेली (पश्चिम किनाऱ्यावर) ही प्लँट्स सोयीची व व्यावहारिक उपयुक्ततेची आहेत.

१९६७–६८ मध्ये मँगेनीज खनिजाच्या किंमती घसरल्या, तेव्हा पुष्कळ खाणी बंद पडल्या. मोठ्या खाणींनी वाढीचे कार्यक्रम स्थगित केले. अशा रीतीने, आता बाजारपेठ सुधारत असूनही, जुन्या निर्गत व्यापारपेठा आणि नवीन फेरो-अॅलॉयच्या बाजारपेठा ह्यांना पुरवठा करण्यासाठी पुरेसे खनिज उपलब्ध नाही. किंमती वाढू लागल्या आहेत आणि चांगल्या दर्जाचे खनिज काही महिन्यांनी आपण पुरवू शकणार नाही, असे जुने खाणीवाले कित्येक गिऱ्हाईकांना सांगू लागले आहेत. महाराष्ट्रातील धाडसाला ही एक सुवर्णसंधी आहे.

नागपूरच्या वायव्येस गुमगाव ते मध्यप्रदेशातील बालाघाट पर्यंतच्या लांब पट्टीमध्ये उत्तम दर्जाच्या मँगेनीजचे साठे आहेत. हा पट्टा मन्सर (उच्च दर्जाचे मगेनीज—दोन समांतर फाटे) मधून जाऊन रामटेकजवळील प्रदेशात (कमी दर्जाचे मँगेनीज) जाऊन तुमसर, तिरोडीकडे जातो. नंतर ६० मैलांचा, बालाघाटपर्यंत, खंड पडतो; त्यानंतर पुनः काही मैलांच्या पट्टीत उच्च-दर्जाचे मँगेनीज सापडते. येथे काम करणारी मुख्य कंपनी म्हणजे मँगेनीज ओअर इंडिया लि., ही होय. तिच्या मालकीत महाराष्ट्र सरकार, मध्यप्रदेश सरकार आणि भारत सरकार ह्यांचा प्रत्येकी १७% वाटा आहे. सी. पी. मँगेनीज ओअर कंपनी लि. (ब्रिटिश मालकी), सेठ श्रीराम दुर्गाप्रसाद, इत्यादी इतर प्रमुख खाणीवाले आहेत.

म्हैसूर-महाराष्ट्राच्या सरहद्दीच्या आसपासही मँगेनीजचे साठे आहेत. लोंढा, सुपा ह्या भागांत व गोव्यातही असलेल्या खाणीतून जरा कमी, तरी पण सहज वापरता येईल अशा दर्जाचे मँगेनीज निघते. उद्योगपती गोगटे आणि इतर कंपन्यांकडे त्यांची मालकी आहे. संडूरच्या खाणी जगप्रसिद्ध आहेत, व सर्वतः एकाच कंपनीच्या ताब्यात आहेत. नव्या खाणी सुरू करण्यास म्हैसूर सरकार खूपच मदत करते.

दररोज सुमारे ५० टन उत्पादन करण्यास खाणीला (ती पृष्ठभागाजवळच असेल, खोल नसेल तर) ५ ते १० लक्ष रुपयांची गुंतवणूक लागते. खनिजाला येणारी किंमत त्याचा दर्जा आणि त्यांतील घटकद्रव्ये ह्यांवर अवलंबून राहते. खनिजात ४४% पेक्षा जास्त मँगेनीज असेल आणि ०·२ % पेक्षा कमी फॉस्फरस असेल, तर त्याला सर्वात जास्त म्हणजे टनाला सुमारे १०० रुपये किंमत येते. खनिजात मँगेनीजचे प्रमाण वरीलपेक्षा कमी असेल आणि फॉस्फरसचे प्रमाण वरीलपेक्षा जास्त असेल, तर त्याला टनास सुमारे ३५ रु. किंमत येते. ह्या दोन टोकांचे मध्ये, दर्जा आणि घटकद्रव्ये ह्यांस अनुसरुन, किंमत असते. चांगल्या व्यवस्थेखालील खाणीला उत्तम नफा मिळू शकतो, हे उघड आहे. खाणीत एकूण किती खनिज उपलब्ध होऊ शकेल ह्याची खात्री करून घेऊनच नंतर १५ ते २० वर्षेपर्यंतच्या कामाची योजना आखावी लागते, कारण खाणींच्या खंडाची मुदत सामान्यतः वीस वर्षांची असते. अशा रीतीने, गुंतविलेल्या पैशाचा उपयोग दीर्घ काळ होत राहतो; यंत्रसामुग्री, वसाहती, वगैरेवर केलेला खर्च वाया जात नाही.

नव्या खाणींचा उपक्रम हाती घेण्यास सध्याचा समय अत्यंत अनुकूल आहे. त्यासाठी परदेशी हुंडणावळ लागणार नाही. खाण चालविण्याचे तंत्र फारसे अवघड नाही. फार लहान प्रमाणावर खाणीचा धंदा सुरू करण्यात मात्र धोका संभवतो, कारण, कोणत्याही कारणाने माल पुरविण्यांत खंड पडला, तर तर गिऱ्हाईक सातत्याने चालणाऱ्या खाणीकडे वळण्याचा संभव असतो. देशाच्या हिताच्या दृष्टीनेही लहान खाणी नुकसानकारक ठरतात. कारण, कोणतेही खनिज-धन पुनः निर्माण करता येण्याजोगे नाही; झालेले नुकसान भरून निघणारे नाही. तांत्रिक आणि आर्थिक ज्ञान असणाऱ्यांनी एकत्र येऊन धडाडीने करण्यासारखा हा उद्योग आहे.

सखोल अभ्यास असलेले व अनेक प्राविण्यपत्रे मिळविलेले महाराष्ट्र टाइम्सचे 'भविष्य' लेखक

## सायनाचार्य श्री. गो. जोशी

भेटा :—कानडा मारुती, नाशिक.

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑ. बँक लि., सोलापूर

मुख्य-कार्यालय : सोलापूर.

आता ३३ कार्यालयांद्वारे खातेदारांचे आणि शेतकऱ्यांचे दारी सेवेस सिद्ध आहे.

विपुल आणि सहज कर्ज उपलब्धतेमुळे आमचा शेतकरी कमाल धान्योत्पादन करून जिल्हा समृद्ध करेल, अशी ग्वाही आज आम्ही देऊ शकतो.

आमचे ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दरांचा धनवंतांनी लाभ घ्यावा व हरितक्रांतीस सहयोग द्यावा.

शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील.
एम. एल. ए., चेअरमन.

बी. बी. लिगाडे,
एम. ए., एच. डी. सी., जी. डी. सी. अँड ए.,
मॅनेजर

तार – साखर – सांगली. | फोन नं. १७० ऑफिस. १७५ गेस्टहाउस ३७० मॅ. डायरेक्टर (निवास)

## शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली

जिल्हा सांगली ( महाराष्ट्र राज्य )

—सहकारातून समृद्धी—

शेतकरी कामकरी लोकांच्या सर्वांगीण उन्नतीस सहकार हाच एक मार्ग आहे. सन १९६९–७० गळित हंगामात ६,०९,४६४ मे. टन उसाचे गळित करून ६,४५,१०० साखर पोत्यांचे उत्पादन करून साखर-उत्पादनाचा सहकारी क्षेत्रात भारतात उच्चांक स्थापन केला आहे. शुभ्र, दाणेदार साखर, रेक्टिफाइड व डिनेचर्ड स्पिरिट, जिन, रम, व्हिस्की, ब्रँडी व कॅटल-पोल्ट्री फीडचे उत्पादन करून भारताच्या औद्योगिक विकासात भर टाकीत आहे.

आ. र. उपाध्याय
मॅनेजिंग डायरेक्टर.

अण्णासाहेब आ. मगदूम
व्हाइस चेअरमन

दिनकरराव कृष्णाजी पाटील
चेअरमन

नवीन माल : : : : : योग्य किंमत

☆ जराची लुगडी ☆ फॅन्सी साड्या ☆ सुंदर बनारसी शालू

व

— सर्व मिलचा माल —

यांकरिता

# शाहाडे आठवले प्रा. लि., दादर

( टे. नं. ४५४५५४) मुंबई २८.

विजय शाहाडे, मॅनेजिंग डायरेक्टर.



# स्वस्तिक-रत्न श्री. वसंतराव वैद्य

गेली ११ वर्षे श्री. वसंतरावांस जवळून पाहाण्याचे भाग्य मला लाभले आहे.

वसंतरावांसारखी अत्यंत सरळ स्वभावाची, प्रसंगी अत्यंत शिस्तप्रिय पण कित्येक वेळी स्पष्टवक्ती अशी व्यक्ती सापडणे कठीण. त्यांचे सर्व उद्देश दुसऱ्याचे चांगले कसे होईल यावरच केंद्रित असतात. कित्येक वेळा प्रथमदर्शनी त्यांचे बोलणे व वागणे तुटक वाटते पण त्यांच्या निर्मळ व प्रेमळ मनाची साक्ष असंख्य वेळा पटते.

मी स्वस्तिकमध्ये फेब्रुवारी, १९६० मध्ये आलो. महाविद्यालयात मराठी व संस्कृत विभागाचा प्रमुख व प्राध्यापक या नात्याने पूर्वी ८ वर्षे काम केल्याने विश्वविद्यालयाच्या अनेक सभांमध्ये माझी उपस्थिती आवश्यक असे व आम्ही सर्व सभासद वगैरेंच्या नात्याने एकत्र बसून चर्चा करीत असू. स्वस्तिकमध्ये आल्यावर मार्च महिन्यातच संचालकांची सभा झाली. श्री. लिखिते, सेक्रेटरी, यांनी मलाही हजर राहण्यास सांगितले व मी सभेच्या खोलीत गेलो. एका मोठ्या टेबलाभोवती खुर्च्या ठेवल्या होत्या; तिथे एका खुर्चीवर मी बसलो. इतरही ३-४ डायरेक्टर्स येऊन बसले. इतक्यात श्री. वसंतराव खोलीत आले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे पाहिले; पण त्यांच्या दृष्टीत मला काहीतरी वेगळे वाटले; पण ते काहीच बोलले नाहीत. मलाच थोडे अस्वस्थ वाटून मी उठून बाजूस उभा राहिलो. इतक्यामध्ये श्री. शंतनुराव व इतर डायरेक्टर्स आले व खुर्च्यांवर बसले. त्यावेळी माझ्या ध्यानात आले की, खुर्च्या फक्त डायरेक्टर्स व सेक्रेटरी यांसाठीच होत्या व मी तिथे बसणे अप्रशस्त होते. अशा प्रकारचा प्रसंग पहिलाच असल्याने आधी ते माझ्या ध्यानात आले नाही. परंतु तिथे काहीही न बोलण्याचा श्री. वसंतरावांचा चांगुलपणा माझ्या स्मरणात कायमचा राहीला आहे.

“ मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास
कठीण वज्रास भेदूं ऐसे
भले तरी देऊं कासोटीची लंगोटी
नाठाळाचे काठी देऊं माथा ”

संत तुकारामांनी केलेले वर्णन श्री. वसंतरावांस अगदी तंतोतंत लागू पडते. वागण्या-बोलण्यातील खोटेपणा, ढोंग यांचा वसंतरावांस भारी संताप येतो. चूक झालेली कबूल करणे हे त्यांस आवडते पण चूक पांघरण्याकरता कुणी खोटे बोलू लागल्यास त्याची त्यांस मनस्वी चीड येते. गरिबांबद्दलची त्यांची सहानुभूती सदैव सक्रीय असते व त्यांनी केलेली मदत कल्पनेपलीकडील असते. वसंतरावांचे दुसरे असामान्य वैशिष्ट्य म्हणजे केलेल्या मदतीचा उल्लेख त्यांच्याकडून कुठेही केला जात नाही व केलेली मदत सर्वथा निरपेक्ष असते. प्रसंगी अत्यंत मृदु मनाचे वसंतराव तशीच वेळ आली तर वज्राहूनही कठोर बनतात. लोकांचे हेतू हेरण्याचे अजब कौशल्य त्यांच्या स्वभावात असल्याने त्यांना कुणी फसवू शकत नाही. शासन करण्यात व क्षमा करण्यातही ते तितकेच उदार आहेत.

“ अनंत आमुची ध्येयासक्ति
अनंत अन् आशा ”

महत्त्वाकांक्षा व आदर्शवादी विचारसरणी हे त्यांच्या व्यक्तित्वाचे महत्त्वाचे घटक मानण्यास हरकत नाही. कोणतेही काम मग ते सामान्य असो, वा मोठे असो, ते निर्दोषपणे व्हावे याबद्दल त्यांचा कटाक्ष असतो. सूक्ष्म अवलोकन, असाधारण स्मरणक्षमता व मूलगामिनी विचक्षणा यामुळे कारखान्यातील कोणतीही माहिती त्यांच्याकडे कोणत्याही क्षणी मिळू शकते. १९६४ साली स्टॉक किती होता, तो का जास्त होता, किती कमी करावयाचे ठरले होते, त्यावेळी बँकेचा ओव्हरड्राफ्ट किती होता, त्यावर्षी ठेवी किती होत्या, कच्चा माल किती लागला, इत्यादी अचूक आकडे वसंतराव क्षणार्धात सांगून श्रोत्यांस थक्क करून सोडतात व, जे आकडे शोधण्यास अनेक हिशेबांची पुस्तके पालथी घालावी लागतील ते आकडे बिनचूकपणे ते कसे सांगू शकतात याचे आश्चर्य वाटते.

त्यांची डायरी मला एक गूढच वाटते. गारुड्याच्या पोतडीपेक्षाही ती जास्त आश्चर्यकारक आहे. त्यांना कोणताही प्रश्न विचारा, कारखान्याची बिल्टअप एरिया विचारा, १९७२ साली एक्स्पोर्ट अंदाजे किती होईल, मशिनरीचे डेप्रिसिएशन, त्यावेळी कंपनीचे भांडवल किती, त्यावर डिव्हिडंड किती द्यावे लागेल, उत्पादन किती होईल, वेज किती टक्के राहील, यापैकी किंवा इतर कोणताही प्रश्न विचारा, डायरी उघडून ते त्याचे उत्तर देतील. पण तुम्ही डायरी पाहिल्यास तुम्हाला काही उलगडा होईल की नाही कोण जाणे!

इवलेसे रोप लावियेले द्वारी।
त्याचा वेल गगनावरी॥

स्वस्तिकचे हे इवलेसे रोप फोफावून त्याचा आता प्रचंड

अश्वत्थवृक्ष झाला आहे. त्याच्या छायेखाली आज अनेक छोटेमोठे उद्योगधंदे यशस्वी वाटचाल करीत आहेत. एवढ्या मोठ्या कारखान्याची जबाबदारी पेलणे व तेही हसतमुखाने, हे काय सोपे काम आहे ? वसंतरावांची प्रत्येक कृती स्वस्तिकसाठी असते. स्वस्तिकचे हित व वाढ हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय. भिन्नभिन्न उद्योगधंद्यातील व व्यवसायातील लोक त्यांच्या 'लौकिक' मध्ये अनेक वेळा सम्मीलित झालेले दिसतील. स्वस्तिकच्या मोटारगाड्या अनेक वेळा इतर लोकांच्या दिमतीस दिलेल्या दिसतील. पण या सर्व प्रकारामध्ये प्रेरणा एकच व ती म्हणजे स्वस्तिकचे संवर्धन. अनेक ठिकाणी कामात आलेल्या अडचणी केवळ वसंतरावांच्या नामोल्लेखाने निवारण झाल्याचा अनुभव मी अनेक वेळा घेतला आहे. कोणत्याही थरातील व्यक्तीच्या उपयोगी पडणारी व्यक्ती वसंतरावांखेरीज मी दुसरी पाहिली नाही. अनेक लोकांचे दुवे सदैव त्यांच्या पाठीशी असतात. देव व दैव दोन्ही अनुकूल न झाल्यासच आश्चर्य !

न हि सुप्तस्य सिंहस्य।
प्रविशन्ति मुखे मृगाः ॥

श्री. वसंतरावांस हे यश काही केवळ दैवयोगाने मिळालेले नाही. त्यांच्या वैभवाचा व व्यक्तित्वाचा विकास ही केवळ यदृच्छा नसून त्यांच्या प्रयत्नपूर्वक साधनेचा तो परिपाक आहे. स्वस्तिकच्या मध्यंतरीच्या गडद संकटांच्या वेळी ज्या मनोयातना वसंतरावांना भोगाव्या लागल्या त्याचा नुसता विचार केल्यासच हृदयात गलबलू लागते. स्वतःच्या छातीवर शस्त्राचे प्रहार घेऊन गडाचे संरक्षण करणारे बाजीप्रभूचे शौर्य व त्यावेळी वसंतरावांनी दाखविलेले मनोधैर्य, त्यामध्ये कमीअधिक श्रेष्ठता ठरवणे कठीण पडेल. कोणत्याही कठीण प्रसंगी डगमगून न जाता व्यावहारिक दृष्टिकोनातून अडचणी निवारण्यात वसंतरावांचा हातखंडा आहे. अगदी लहानसहान बाबींतही त्यांचा सल्ला बहुमोलाचा ठरतो.

न खलु धीमतां कश्चिद् अविषयः नाम।

वसंतरावांची बुद्धिमत्ता सर्वसंग्राहक व सर्वस्पर्शी आहे. कारखान्याच्या व्यापातील अनेक दालनांचे त्यांचे ज्ञान काटेकोर असते. विक्री खाते, हिशेब खाते, क्रय खाते, उत्पादन, रबराचे तांत्रिक ज्ञान, यांपैकी प्रत्येक शाखेची त्यांची माहिती बिनचूक व स्वयंपूर्ण असते. त्यामुळेच की काय कोण जाणे, कुणाचेही काम त्यांच्या फारसे मनास आल्याचे आढळून येत नाही. चार कौतुकाचे शब्द अपेक्षित ठेवून त्यांच्याकडे जाणारास बऱ्याच वेळा त्याच्या कामातील न्यूनच ऐकावयास मिळून नाऊमेद होऊन तो परत येतो. याचा अर्थ कामातील कौशल्य त्यांच्या नजरेतून सुटते असा मुळीच नव्हे. चांगल्या कामाबद्दल योग्य ती दखल घेतली जाते, याबद्दल खात्रीच आहे. इतकी वरच्या दर्जाची सर्व-संग्राहक बुद्धिमत्ता असणारा कारखान्याचा मालक क्वचितच सापडेल.

वसंतरावांची लोकसंग्राहक वृत्तीही खास नावाजण्याजोगी आहे. सर्व प्रकारची कामे करणारे लोक त्यांच्या पदरी आहेत. कुठले काम कुठल्या व्यक्तीस सांगावयाचे हेही त्यांचे ठरलेले असते, व एकदा त्यांनी सूचना दिल्या की सर्व सूत्रे बिनचूकपणे व वेळच्यावेळीच हलवली जातात व एका ठराविक पद्धतीनेच ते काम केले जाते. गणगोतांच्या लग्नांत वसंतरावांचा नेहमीचाच पुढाकार असतो व मग गुरुजींच्या पोषाखापासून (त्यांनी वाढी केली की नाही) ते स्वागत समारंभाच्या वेळी स्वागत कुणी करायचे, पाहुण्यांना आत कुणी न्यायचे, त्यांच्या चहाफराळाची व्यवस्था कुणी पहायची, अत्तर-गुलाब कुणी द्यायचे, इत्यादी-बारीकसारीक बाबीही ते अगोदर ठरवून त्याप्रमाणे कामे होत आहेत की नाही याकडे बारकाईने पाहातात. ते पाहुण्यांची विचारपूस करीत हॉलमध्ये हिंडतात. त्यांच्या विचारपूस करण्याने पाहुण्यांस धन्यता वाटते. सर्व पाहुणे निघून गेल्याखेरीज घरच्या लोकांनी चहाफराळ करावयाचा नाही हाही एक त्यांचा अलिखित आदेश असतो. त्यामुळे वैद्यांच्याकडील लग्नाच्या रिसेप्शन इतके व्यवस्थित रिसेप्शन कुठेच आढळत नाही, असे असंख्य लोकांनी बोलून दाखवले आहे.

वसंतरावांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या कुठल्याही समारंभात हाच व्यवस्थितपणा असतो. श्री. शंतनुरावांच्या षष्ट्यब्दिपूर्ती समारंभास उपस्थित राहण्याचे भाग्य ज्यांना लाभले त्यांना आदर्श समारंभ कसा असावा, याचे प्रात्यक्षिकच पाहायला मिळाले. अचूक ठोकताळे व शिस्तबद्ध कार्यपद्धती यामुळे कसे यश मिळते, हे प्रथम कै. सदाशिवराव बर्वे व नंतर सौ. तारा सप्रे यांच्या कठीण निवडणूक प्रसंगी त्यांनी सर्वांस दाखवून दिले आहे.

वसंतरावांचे दातृत्व हा एक प्रबंधाचाच विषय ठरेल. त्यांनी दिलेल्या दानाची माहिती ज्यांना दान दिले त्यांनी सांगितली तरच मिळेल. त्यांच्या दातृत्वास मर्यादा नाही. ते कोणासही विन्मुख पाठवत नाहीत. मात्र सत्पात्री दान होत आहे, हे कटाक्षाने पाहतात. कुणाला कुठल्या वस्तूची गरज आहे हे हेरून त्याप्रमाणे ते त्या वस्तू त्याच्याकडे पाठवतील. आपल्या एका भगिनीच्या घरी ते गेले असता त्यांना मनस्वी उकडले. दुसऱ्या दिवशी तिच्या घरी विजेचे पंखे पोचते झाले. त्यांचे मेहुणे डॉ. हर्डीकर यांची पुण्यात घर बांधण्याची फार इच्छा होती. यासाठी वसंतरावांनी मित्र कॉलनीतील स्वतःचा प्लॉट त्यांना देऊ केला होता. दुर्दैवाने ते अनपेक्षितपणे निधन पावले. पण श्री. वसंतरावांनी तो प्लॉट आपल्या भगिनीस दिला व आता त्यावर एक छोटा बंगला उभा राहिला आहे. डॉ. भाऊरावांच्या आत्म्यास यामुळे किती समाधान वाटले असेल, याची कल्पनाच करावी. या प्लॉटची किंमत ४०,००० रुपयांपेक्षा कमी नाही. एवढी मोठी भाऊबीज जगात अद्याप कुणी दिली असेल का ? वसंतरावांचे मन किती मोठे आहे याचे प्रत्यंतर येण्यास एवढे एकच उदाहरण पुरे आहे असे मला वाटते.

छोटे उद्योगधंदे सुरु करणाऱ्या हरहुन्नरी व्यक्तीबद्दल वसंतरावांस फारच आस्था वाटते व त्यांच्या दातृत्वाचा बराच वाटा त्या व्यक्तीकडे जातो. काही मोठ्या लोकांचे औदार्य केवळ त्यांच्या नातेवाईकां-पुरते मर्यादित राहते; पण वसंतरावांमध्ये गुणग्राहकतेस जास्त प्राधान्य आहे. असंख्य व्यक्तींना त्यांनी मदत देऊन धंदे उभारण्यास उत्तेजन दिले आहे. स्वस्तिक-च्या प्रारंभीच्या व पडत्या काळांत ज्यांनी स्वस्तिकला मदत केली त्या व्यक्तीबद्दल तर वसंतरावांना अतोनात कृतज्ञता वाटते व अशा व्यक्तींना उलट मदत करण्याची संधी ते कधीही डावलत नाहीत. श्री.मालोजीराव निंबाळकरांनी फलटण क्लॉथ मिल काढली व तिचे २५,००० रुपयांचे शेअर्स वसंतरावांनी घ्यावे अशी त्यांनी विनंती केली. वसंतरावांचे व्याप व त्यात गुंतवलेले पैसे याचा विचार करता त्यांनी इतके शेअर्स घेऊं नयेत असे मला वाटले व मी तसे वसंतरावांस बोलून दाखविले. पण यावर त्यांनी मला असे उत्तर दिले की मालोजीरावांनी पूर्वी स्वस्तिकला बहुमोल मदत केली आहे; त्याबद्दल कृतज्ञता म्हणूनच मी हे शेअर्स घेत आहे. त्यापासून मला काहीही मिळाले नाही तरी चालेल.




**श्री. वसंतराव व सौ. जयश्रीबाई वैद्य**

महाराष्ट्राचे आर्थिकच नव्हे, तर सांस्कृतिक व सामाजिक जीवनही उंचावण्याची हे दांपत्य बहुमोल कामगिरी करीत आहे.

बेकारांस नोकऱ्या, विद्यार्थ्यांस आर्थिक मदत, कुणास पाहिजे त्या संस्थेत प्रवेश मिळवून देणे, वैद्यकीय मदत करणे, औषधाची व्यवस्था करणे, जितक्या प्रकारांनी म्हणून मदत करणे शक्य आहे तितक्या प्रकारांनी ते करतात व ते सुद्धा यत्किंचितही वाच्यता न करता !

न्यायप्रियता व नि:पक्षपातीपणा हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक आकर्षक पैलू आहे. न्यायबुद्धी त्यांच्यामध्ये अत्यंत प्रबळ आहे. एखाद्यावर अन्याय होत आहे असे निदर्शनास आल्याबरोबर तो अन्याय ते दूर करतील. चूक एकाची व प्रायश्चित्त दुसऱ्याला हा प्रकार श्री. वसंतरावांच्या बाबतीत संभवतच नाही; वावगेपणा न खपणे ही न्यायीपणाचीच एक बाजू आहे. त्यांच्या न्यायप्रियते-मुळेच अनेकवेळा त्यांना वाद सोडविण्याचे काम करावे लागते; ते आनंदाने स्वीकारतात व असे काही त्यामधून शोधून काढतात की दोन्ही पक्ष खुष होतात. परिस्थितीचे आकलन त्यांना तात्काळ होते व त्यातील बारकावेही ताबडतोब ध्यानात येतात व व्यवहारिक दृष्टिकोनातून पाहतात व त्यामधनच मार्ग शोधून काढतात. कामगार सभेबरोबर झालेल्या करारात कामगार व कंपनी यांच्या मतभेदामध्ये श्री. वसंतरावांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील हे कामगारांनी मान्य केले. कामगार कराराच्या इतिहासात हे एकमेवाद्वितीय यश आहे. त्यांच्या न्यायी व नि:पक्षपाती स्वभावावर याने कळस चढविला आहे. आणीबाणीच्या वेळी सरकारने औद्योगिक शांतता समिती स्थापन केली तिच्या अध्यक्षपदी वसंतरावांखेरीज दुसरी योग्य व्यक्ती सापडणे अशक्यच होते. वसंतरावांनी ते काम यशस्वीपणे केले. त्या काळात पुणे परिसरात औद्योगिक शांततेचा भंग कुठेही झाला नाही.

कामाशिवाय उगाच बसणे व उगाच काहीतरी गप्पा मारणे वसंतरावांस आवडत नाही. त्यांचा वेळ कधीही वाया जात नाही. ‘ जो जो दिवस उगवला तो तो ज्ञानदेवे यथार्थ केला ’ असे श्री. वसंतरावांबद्दलही म्हणता येईल. त्यांच्या ऑफिसमध्ये


दीप झळकती स्वाभिमानकांचे ॥
मार्ग उजळती सुखसमृध्दीचे ॥
बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस :
११७७, बुधवार पेठ, पुणे २

काहीतरी विचारायला मी गेलो की पहिल्यांदा जे विचारायचे ते कागदावर लिहून नेतो. कित्येक वेळां ते असे काही अनपेक्षित प्रश्न विचारतात की आपण काय विचारायला गेलो ते विसरतो व पुन्हा त्यांना भेटावयाला जायची पंचाईत वाटते. आपले काम संपल्यावरोबर ते त्यांचे काही काम असल्यास सांगतात व त्यानंतर आपणांस जाण्याची जणु सूचनाच देत आहेस; असा त्यांच्या डोळ्यात भाव दिसतो. श्री. वसंतरावासारख्या प्रेमळ, उदार व प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या सान्निध्यात प्रेशर कसले वाटते याचा अनेक वेळां विचार करूनही मला शोध लागलेला नाही. मनाला काही लागण्यासारखे कठोर ते बोललेले मला अजिबात आठवत नाहीं. मग असे का व्हावे ? त्यामुळे कित्येक वेळा अनेक गोष्टी त्यांच्या बरोबर मोकळेपणाने चर्चा करून उलगडा करून घ्यावा असें वाटते पण धीर होत नाही. कदाचित् ऑफिशिअल नात्यामुळे असे होत असेल. परंतु वसंतरावापासून काही अंतरावर आपण असून मध्ये एक पडदा आहे अशी भावना होते एवढे मात्र खरे.

श्री. वसंतराव सहसा कुणाबद्दलही वाईट बोलत नाहीत. कुणाला नावे ठेवल्याचे मी त्यांच्या तोंडून ऐकले नाही. ते नेहमीच कोणत्या तरी योजनेच्या विचारात गुंगलेले असतात व आपण काही विचारल्यास तेवढ्यापुरते ते त्या विचारांतून बाहेर येतात व पुन्हा गुरफटले जातात. उद्योगधंद्याच्या विकासाचे नवनवीन मार्ग व उद्योगधंद्यातील नवीन दालनें यांचा आविष्कार त्यांच्या या कल्पनाशालित्वातूनच होत असावा.

प्रत्येक प्रश्न वेगळा काढून त्याचा स्वतंत्र विचार करणे, सर्व प्रश्नांची भेसळ करून विचारांचा गोंधळ होऊ न देणे, वसंतरावांना अभ्यासाने साधले असावे. एखादे औद्योगिक प्रमेय त्यांच्या मनात घोळत असेल तर त्यावेळी इतर कोणतेही विचार त्यांच्या मनात येत नाहीत व एकचएक विषयावर ते विचारांचा झोत टाकू शकतात. एकाच वेळी अनेक मोठ्या जबाबदाऱ्या पेलणाऱ्या सर्व व्यक्तीत ही मनोधारणा अत्यंत आवश्यक असते. त्याखेरीज विचारांचे केंद्रीकरण करणें अशक्य होईल. अनेक जबाबदाऱ्या शिरावर असतांनासुद्धा अशा व्यक्ती सहज प्रसन्न व विवंचनामुक्त वाटतात ते याचमुळें.

वसंतरावांची स्मरणशक्ती केवळ असाधारण आहे. १५ वर्षा-पूर्वी अमक्या तमक्या व्यक्तीचे असे पत्र आले होते व ते अर्ध्या कागदावर व हिरव्या शाईने लिहिलेले आहे, अशी ते माहिती देतात व ते पत्र शोधल्यावर ती आठवण तंतोतंत खरी ठरते. स्वस्तिकची स्थापना झाल्यापासून ते आजपावेतो सर्व लहान-मोठ्या घटनांची व विकासातील विविध टप्प्यांची जंत्री त्यांच्या मेंदूत भरली आहे. पत्रातील काही वाक्ये व शब्द त्यांच्या ठामपणे लक्षात असतात व अशा पत्रांचा उल्लेख ते इतक्या सहज करतात पण ती पत्रे शोधून काढण्यास ती फाईल हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांससुद्धा कित्येक दिवस लागतात. कंपनी कायद्याचे सुद्धा त्यांचे ज्ञान व त्यांतील तरतुदींची माहिती त्यांनी केव्हा मिळविली आहे, कोण जाणे. परंतु कंपनीच्या मेमोरँडम व आर्टिकलसमधील नियम त्यांच्याइतके कुणालाच माहीत नसतात. वसंतरावांच्या हाताखाली काम करण्याचे भाग्य लाभले तरी ते सतत पात्रता सिद्ध करूनच टिकवावे लागते. त्यांची कामे करणाराला अनेक प्रकारची अनुषंगिक माहिती मिळवावी लागते व पडेल ते काम जलद करण्याची जिद्द बाळगावी लागते. एखाद्या अधिकाऱ्यास काम सांगितल्यावर त्याबद्दल त्याला पुन्हा सांगावे लागणे वसंतरावांस आवडत नाही. त्या अधिकाऱ्याने आपण होऊन हरतऱ्हेचे प्रयत्न करून ते करणे हे ते महत्वाचे मानतात. त्यामध्ये अडचण आल्यास ते आनंदाने मार्गदर्शन करतील.


स्वच्छता, टापटीप व नीटनेटकेपणा यांची त्यांना विलक्षण आवड. कारखान्यातील स्वच्छतेबद्दल तें अत्यंत जागरूक असतात. त्यासाठी सर्व खात्यांतून दररोज सकाळी एकदा तरी ते फेरी मारून येतात व रबराचे तुकडे कुठे पडलेत; कागद कुठे उडताहेत; खोकी, पिपे अस्ताव्यस्त कुठे आहेत; कचरा कोपऱ्यात कुठे सारून ठेवला आहे हे दाखवून ते तावडतोब साफ करून घेतील. वसंतराव केव्हा फेरी मारतील याचा नेम नसल्यामुळे सर्व खाती नेहमीच स्वच्छ ठेवावी लागतात. वार्षिक संमेलनाच्या वेळी सर्वात स्वच्छ ठरलेल्या खात्यास बक्षिस मिळते. ही पद्धत सगळीकडे सुरू करण्यासारखी आहे.

त्यांची विनोदबुद्धी उल्लेखनीय आहे व तीत खेळकर मिस्किल-पणा आढळतो. वसंतरावांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा निर्व्यसनी-पणा. अनेकवेळा परदेशी वास्तव्य करूनही व अनेक तऱ्हेच्या मंडळींशी निकट संबंध येऊनही त्यांना साध्या सुपारीच्या खांडाचेही व्यसन नाही. मग धूम्रपान, मद्यपान, यांसारखे नावही काढण्यास नको.

वसंतरावांचे मन सागराप्रमाणे विशाल, खोल व अंदाज न लाग-णारे आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील भावाविष्कारावरून त्यांच्या मना-तील विचारांचा अंदाज घेता येणार नाही. कित्येक वेळा अगदी क्षुल्लक चुकीसाठी ते खूप रागावतील व मोठ्या चुकीबद्दल शांत-पणाने समजावून सांगतील. कोणतेही काम सत्वर व्हावे, अशी अपेक्षा असल्याने अनेकवेळा ऑफिस प्रोसीजर बाजूला पडते. अधिकाऱ्याची वाट न पहाता एखादी गोष्ट ते त्यांच्या हाता-खालील लोकांना करायला सांगतील.

चिरतरुणा रे चिररुचिरा रे ।
तुजसन्निध हा वास बरा रे ॥

या पन्नाशी उलटून गेलेल्या वयामध्येसुद्धा वसंतरावांच्या अंगच्या दुर्दम्य उत्साह, चिकाटी व अविश्रांत काम करण्याची जिद्द पाहून आम्हालाही कित्येकदा लाज वाटते. सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठ–नऊ वाजेपर्यंत ते अविश्रांत काम करतात. कित्येकवेळा जेवणासमुद्धा त्यांना फुरसत



सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग् भवेत् ॥
स्टेट बँक
AIYARS-S-120 MR




Kirloskar
'ही दीपावलि आणि नवसंवत्सर
आमच्या असंख्य ग्राहकांस
आनंददायक आणि सुखसमृद्धीपूर्ण
जावो असें आम्ही इच्छितों.'
धि म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेड
यंत्रपूर पी.ओ., हरिहर, म्हैसूर राज्य.
Bensons/11MK-3 Mar

मिळत नाही. भेटायला येणाऱ्या लोकांची इतकी रीघ लागलेली असते की कारखान्याच्या कामासाठीसुद्धा आपणांस कित्येक वेळा भेटणे शक्य होत नाही; पण इतके कष्ट करूनसुद्धा ते कधीही दमल्यासारखे दिसत नाहीत. मन नेहमी फुलासारखे ताजे व प्रसन्न राखणे ही काही सोपी गोष्ट नाही.

परमेश्वराच्या पाठिंब्याखेरीज प्रयत्नास यशलाभ होत नाही, यावर त्यांची श्रद्धा आहे. शनिवार हा सर्व व्यवहारास लाभदायक आहे व शनिमहात्म्य वाचल्याने आत्मिक शक्ती व मानसिक बळ प्राप्त होऊन ईशकृपा लाभण्यास मदत होते, यावर त्यांचा नितांत विश्वास आहे. महत्त्वाची पत्रेसुद्धा शनिवारी लिहावयाची ह्यावर त्यांचा कटाक्ष. मात्र ईश्वरभक्तीसाठी कर्मकांडाची आवश्यकता नाही, असेच त्यांचे मत असावे. धार्मिक विधी करावयाचा ठरल्यास मात्र तो यथासांग झाला पाहिजे, असा सौ. जयश्रीबाईंचाही आग्रह असतो. सौ. जयश्रीबाई यांस सर्व घरगुती बाबतीत सर्वाधिकार आहेत. आपला सर्व घरचा व समाजसेवेचा व्याप संभाळूनही मुलांचे अभ्यास, दिनचर्या, खेळ, इत्यादीतील नियमितपणाबद्दल सौ. जयश्रीबाई अत्यंत जागरूक असतात. सर्व मुलांचे कर्तृत्वही उल्लेखनीय आहे. याचे श्रेय ते सर्वस्वी सौ. जयश्रीबाईंनाच देतात. 'तू सिनेमे फार पाहतोस अशी तुझ्या आईची तक्रार आहे' असे ते मुलांस सांगतील.

अनेक राजकीय पक्षांच्या कार्यास त्यांची सक्रीय मदत असली तरी पक्षीय राजकारणापासून ते सर्वस्वी अलिप्त आहेत. त्यामुळेच सर्व पक्षांच्या पुरस्कर्त्यांस ते सारखेच जवळचे वाटतात.

वसंतरावांसारख्या दीर्घोद्योगी, न्यायी व राष्ट्रीय वृत्तीच्या असाधारण व्यक्ती ज्यावेळी देशाचे नेतृत्व करतील त्यावेळीच देशाची सर्वांगीण उन्नती होईल.

वसंतरावांनी संपादलेला 'लौकिक' अलौकिक नाही असे कोण म्हणेल?

— गि. के. पंडित



'स्वस्तिक'चे जॉ. मॅनेजिंग डायरेक्टर

## श्री. दादासाहेब वैद्य

### यशस्वी जागतिक दौऱ्यावरून परत

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. पुणेचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दादासाहेब वैद्य हे आपला अडीच महिन्यांचा व्यावसायिक जागतिक दौरा पुरा करून दि. २५ ऑक्टोबर रोजी भारतात परत आले. त्यांनी वेगवेगळ्या देशांतील व्यापाऱ्यांशी स्वस्तिकची पादत्राणे, ऑईल सील्स, होजेस आणि इतर अनेक प्रकारची उत्पादने ह्यांच्या विक्रीबाबत उपयुक्त चर्चा केली. श्री. दादासाहेब हे श्री. वसंतरावांचे ज्येष्ठ बंधू. कंपनीचा दैनंदिन कारभार काटेकोरपणे चालविण्याची जबाबदारी ते प्रथमपासूनच पार पाडीत असल्यामुळे कंपनीला उत्पादनाचा व्याप वाढविता आला आहे.

# हेंडेरसन स्कॉलर दीपक वैद्य



"पॉलिमर सायन्सची पदव्युत्तर परीक्षा देऊन तांत्रिक, व्यावहारिक आणि कारभार-विषय ज्ञानाने परिपूर्ण होऊन श्री. दीपक वसंत वैद्य अमेरिकेतून भारतात परत येतील आणि ते त्याला प्रत्यक्ष उद्योगाची जोड देऊन भारतातील जनतेचे राहणीमान सुधारण्यास हातभार लावतील." असे त्यांना १९७०–७१ सालाची हेंडेरसन शिष्यवृत्ती देणाऱ्या इंटर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिंथेटिक रबर प्रोडयूसर्स इनकॉर्पोरेटेडने विश्वासपूर्वक जाहीर केले आहे.

२१ वर्षांच्या ह्या तरुणाने मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिकून केमिकल इंजिनिअरिंगची बी. टेक्. पदवी नुकतीच मिळविली. सुट्टीच्या काळात त्याने लेव्हर-कुसेन (जर्मनी) आणि स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. पुणे येथे काम केले. २० वर्षांपूर्वी एका छोट्या खोलीत फुगे करणाऱ्या ह्या घरगुती उद्योगाचे रूपांतर आता २,००० प्रकारच्या रबरी जिनसा करणाऱ्या प्रचंड कारखान्यात झालेले आहे.

हेंडेरसन शिष्यवृत्तीच्या सहाय्याने एम्. एस. पदवी मिळविल्यानंतर दीपक अमेरिकेतील कृत्रिम रबर कारखान्यात, विशेषत: छोट्या कारखान्यांत, काम मिळवून अधिकात अधिक अनुभव प्राप्त करून घेईल. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूटच्या सभासदांत १५ देशांतील ३९ कंपन्या असून त्यांचे मिळून कृत्रिम रबराचे उत्पादन कृत्रिम रबराच्या जागतिक (रशियाचा गट वगळून) उत्पादनाच्या ८५% आहे. एवढ्या प्रचंड संघटनेचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. राल्फ लॅवरसन ह्यांनी दीपक वैद्य ह्या भारतीय तरुणाचा केलेला गौरव त्याला, त्याच्या माता-पितरांना, 'स्वस्तिक'ला आणि भारताला अभिमानास्पद आहे. ह्यापूर्वी जर्मन, मेक्सिकन, जपानी आणि अमेरिकन तरुणांना ही शिष्यवृत्ती मिळाली होती. भारतातील कारखानदारीत ह्यापुढे भांडवलदारांऐवजी तज्ज्ञ, कार्यकुशलांनाच महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे; त्यांच्याचकडे नेतृत्व येणार आहे. ह्या दृष्टीने श्री. दिपक वैद्य ह्यांच्या कर्तृत्वास येथे मोठीच संधी प्राप्त होणार आहे.



दुरितांचे तिमिर जावो
विश्वस्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो
प्राणिजात
भावी आयुष्य सुख-समृद्धीत आणि
आनंदात जाण्यासाठी
आजच आयुर्विमा घ्या आणि
दीपावलीच्या आनंदात भर टाका.
लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन
ऑफ इंडिया
योगक्षेमं वहाम्यहम्
PRATIBHA-70-2A-MAR

# सहकारी हौसिंग सोसायट्यांत लाखो रुपये कसे खातात ?

*एका सहकारी हौसिंग सोसायटीच्या सभासदांचे लाखो रुपये मॅनेजिंग कमिटीचे सदस्य व अध्यक्ष यांनी गडप केल्याचे प्रकरण नुकतेच महाराष्ट्र विधानसभेत गाजले. म्हणून अशाच काही सोसायट्यांच्या घोटाळ्याबाबत सरकारने नेमलेल्या चौकशी मंडळाचे अहवाल श्री. पां. वा. गाडगीळ यांनी मिळवून वाचले. गैरकारभाराचे प्रकार सर्व प्रकरणात साधारण सारखेच असतात म्हणून दोनच अहवाल उदाहरणादाखल सारांश रूपाने त्यांनी येथे दिले आहेत. अहवालातील खरी नावे देता आली नाहीत, म्हणून टोपण नावे वापरली आहेत.*

'सम' सोसायटी असे या सोसायटीला नाव देऊ. दादर-माहीम भागातली ही सोसायटी. प्रथम कलेक्टरकडून जागा मिळविण्याचा प्रयत्न सोसायटीने केला. पण ती जागा मिळाली नाही. दुसरी एक जागा १२३९ स्क्वे. यार्ड, १०० रु. ला १ स्क्वे. यार्ड दराने मिळणार होती. पण तीवर झोपड्या होत्या. रिकामी जागा मालक देऊ शकला नाही, म्हणून ती जागा नाकारण्यात आली. एका बँकेची ५ हजार स्क्वे. यार्ड जागा घेण्याचे शेवटी ठरले. ही जागा सदर बँकेने ४५ रुपयांना १ स्क्वे. यार्ड या दराने १९४७ साली घेतली होती. १९६२ च्या जुलैमध्ये सदर बँकेने ही जागा विकायला काढून जाहिरात दिली. अ ब क या तिघांनी ती संयुक्तपणे ६० रु. दराने मागितली. इतर अनेकांनी याहून कमी किंमतीला ही जागा मागितली होती. म्हणून मग बँकेने अ ब क ची मागणी स्वीकारली. 'सम' सोसायटी स्थापण्यात 'अ' ने व 'ब' ने पुढाकार घेतला होता. १३-१-६३ रोजी मॅनेजिंग कमिटीच्या सभेत सरकारी जागा मिळत नाही असे कळले. दुसरे दिवशी खास सभा बोलाविण्यात आली. त्या दिवशी "कोणीतरी अडत्यांनी" सदर बँकेची ५ हजार स्क्वे. यार्ड जागा १५० रुपये स्क्वे. यार्ड या दराने देऊ केली असल्याचे चेअरमनने जाहीर केले. सदर जागेवर बँकेचा एक बंगला, एक मोठी चाळ व पन्नास-साठ अनधिकृत झोपड्या होत्या. "योग्य काळात या जागेतली बांधकामे पाडून रिकाम्या जागेचा ताबा देण्याचे अडत्यांनी मान्य केले आहे" असे खजिनदारांनी सांगितले. त्यावरून अडत्याला तावडतोब ३० हजार रु. ॲडव्हान्स म्हणून देण्याचा ठराव मॅ. कमिटीने मंजूर केला. आधल्या दिवशीच्या म्हणजे १३ तारखेच्या सभेत या जागेचा उल्लेखही झाला नव्हता. १४ तारखेच्या सभेत "कोणी तरी" अडत्यांनी जागा देऊ केली व रिकाम्या जागेचा ताबा योग्य काळात देण्याचे आश्वासन मिळाल्याचे सांगण्यात आले. पण जागा आहे कुठे, किती, अडत्ये कोण, किंमत रास्त आहे का, 'योग्य काळा'त रिकाम्या जागेचा ताबा मिळण्याची हमी काय, 'योग्य काळ' म्हणजे किती, ताबा न मिळाल्यास काय तजवीज करायची, याची काहीही चौकशी मॅ. कमिटीने न करता अडत्यांपैकी 'ब' मॅ. कमिटीच्या बैठकीस हजर होते त्यांना मॅ. कमिटीने ३० हजार देऊन टाकले. पूर्वी एक स्क्वे. यार्डास रु. १०० या दराने मिळणारी जागा, तीवर झोपड्या होत्या म्हणून नाकारण्यात आली, पण आता ही रिकामी नसलेली व रिकामी मिळण्याची खास हमी नसलेली जागा रु. १५० दराने घेण्याचे ठरवून इतर काही चौकशीही न करता मॅ. कमिटीने ॲडव्हान्सदाखल ३० हजार रु. देऊनही टाकले हे घडले कसे ?

अ ब क या तिघांनी 'सम' सोसायटीस जागा देऊ केली ती स्वतः अडत्ये या नात्याने की मालक या नात्याने ? कारण, बँकेला त्यांनी ६० रु. दर देऊ केला व बँकेने स्वीकारला एवढेच घडले होते. शेवटी बँकेने जागा विकली तेव्हा अ ब क यांच्या सांगण्यावरून 'सम' सोसायटीलाच जागा विकली. बँकेला अ ब क कडून ६० रु. दराने रु. २,९२,६२० मिळाले तर अ ब क यांना 'सम' सोसायटीकडून रु. १५० दराने रु. ७,३१,५५० मिळाले. जागा रिकामी करण्यासाठी रु. दोन लाख धरण्यात आले होते. तरीही अ ब क यांनी रु. २,३८,९३० काहीही पदरमोड अथवा यातायात न करता मिळविले. ही दलाली म्हटली तरी ७ लाख रु. च्या व्यवहारात २ लाख रु. दलाली घेणे योग्य आहे काय ? आणि तीही 'सम' सोसायटी स्थापण्यात पुढाकार घेणाऱ्याने ? बरे, मॅनेजिंग कमिटी काय करीत होती ? अ ब क या तिघांनी बँकेशी केलेले करारपत्र पाहिल्याशिवाय मॅनेजिंग कमिटीने आपली खरेदी केली कशी ? मॅनेजिंग कमिटीचे सदस्य म्हणतात, "आम्ही ते कागद पाहिले नाहीत म्हणून मूळची खरेदी ६० रु. दराची होती हे आम्हाला माहित नव्हते". पण हेच संशयास्पद नव्हे काय ? मिसेस् एस्. नावाच्या बाईंना २ टक्के दलाली म्हणजे रु. १४,२३१ देण्यात आले. का ? तर म्हणे २०० रु. दराची जागा सदर बाईंच्या मध्यस्थीमुळे १५० रुपये दराने मिळाली. पण रु. ६० हून अधिक दराने कोणीही ती जागा मागत नव्हते हे मॅनेजिंग कमिटीने सदर बँकेला विचारले असते तरी कळले असते.. सदर जागेत चार बांधकामे आहेत. एकेक काढून टाकल्यावर प्रत्येक वेळी ५० हजार रु. अ ब क यांना देण्याचे मॅनेजिंग कमिटीने मान्य केले. 'चार बांधकामे' या शब्दांना काही अर्थच नव्हता. एक बंगला, एक चाळ व ५०–६० झोपड्या ही ती बांधकामे. अ ब क यांनी तीन बांधकाने काढली, असे सांगून दीड लाख रु. घेतले. पण ३३ भाडेकरू असलेली चाळ कायम आहे. तीतले भाडेकरू पैसे मागतात व सोसायटीजवळ आता पैसाच नाही. 'सम' सोसायटीच्या सभासदांची संख्या मोठी असून ज्यांनी प्रत्येकी १० हजार ते १५ हजार रु. भरले आहेत, अशा अनेकांना जागा मिळाल्या नाहीत व पैसे बुडाल्यात जमा आहेत. मिसेस एस्. यांना रु. १४,२३१ जी दलाली दिली ती त्यांनी कोणती

कामगिरी केल्यामुळे ? त्यांनी म्हणे अशी अशी जागा विकाऊ आहे अशी माहिती दिली. पण ही जागा प्रसिद्ध वृत्तपत्रात जाहिरात देऊन विक्रीस काढली होती. मग मिसेस् एस्. यांनी वृत्तपत्र वाचून दाखविले एवढेच ना ?

अ ब क या तिघांतील 'ब' ला १० टक्के कमिशन देखरेखीसाठी यावे असे मॅनेजिंग कमिटीने ठरविले होते. मॅनेजिंग कमिटीच्या ज्या सभेत हे कमिशन मंजूर झाले ती सभा भरली असता अजेंड्यावर हा कमिशनचा मुद्दाच नव्हता, तो आयत्या वेळी घुसडण्यात आला. आयत्या वेळी अध्यक्षांच्या परवानगीने कोणताही विषय घ्यावा असेही अजेंड्यात लिहिले नव्हते. अर्थात ही मंजुरी बेकायदाच झाली. जमीनखरेदी व्यवहारावरील १० टक्के कमिशन ( रु. ७३,००० ) आपण सोडून देतो असे 'ब' याने मॅ. कमिटीस लेखी कळविले होते. पण त्याने आपला शब्द फिरविला आणि मॅ. कमिटीने कमिशन देण्याचा निर्णय कायम ठेवला. काही इमारती बांधल्या गेल्या. त्यात आलेल्यांना अनुक्रमाने जागा देण्याचे ठरलेले असता मॅ. कमिटीच्या एका न झालेल्या सभेत 'झालेल्या' ठरावाने अमुक अमुक सदस्यांनी आपला क्रमहक्क अमक्या दुसऱ्याला दिला आहे अशी पत्रे वाचून दाखवून दुसऱ्यांना जागा देववल्या, असे चौकशीअंती कळून आले. सभासद करून घेताना मॅ. कमिटीने दोन अज्ञान मुलांना नियमांचे उल्लंघन करून सभासद करून घेतले. 'वय सांगितले ते बरोबर आहे की नाही हे पाहायचे राहून गेले' असे मॅनेजिंग कमिटीचे सदस्य सांगतात. जागा 'सम' सोसायटीच्या नावे झाल्यानंतर तीवरील पाडण्यात आलेल्या इमारतीचे जुने सामान निदान दोन हजार रुपयांचे तरी झाले असेल. पण मॅनेजिंग कमिटीने त्यावर हक्क न सांगता अ ब क ना ते नेऊ दिले.

शेवटी, 'सम' सहकारी हौसिंग सोसायटीच्या कारभारात घोटाळे असून सदस्यांचे नुकसान झाले आहे, चौकशी व्हावी, अशी मागणी काही सदस्यांनी सहकारी खात्याकडे केली. तेव्हा सहकार खात्याने एकसदस्य चौकशी समिती नेमली. समितीने सरकारला सादर केलेल्या अहवालातील ठळक मुद्दे सारांशरूपाने वर दिले आहेत. समितीचा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

( १ ) ज्यांनी जमीन 'सम' सोसायटीला विकली त्यांनी ती रु. २,९२,६२०ला मूळ खरीदली व सोसायटीला रु.७,३१,५५० ला विकली. असे करताना पदरचा एक पैसाही न खर्चता त्यांनी फक्त आपला खरेदीचा हक्क विकला व स्वतःला रु. ४,३८,९३० मिळविले. सोसायटीने दिलेल्या किंमतीतील २५ टक्के कमिशन व जागा रिकामी करण्यासाठी दोन लक्ष रु. वजा केले व मूळ खरेदीची रक्कम वजा केली तरी रु. १,६५,७७५ नुकसान 'सम' सोसायटीचे झाले आहे. मॅनेजिंग कमिटीत अ ब क यांच्याशी संगनमत करून 'सम' सोसायटीच्या सभासदांच्या हजारो रुपयांचा हा अपव्यय केला. मॅनेजिंग कमिटीच्या पहिल्या सदस्यांनी हा सर्व व्यवहार केला असल्याने त्या सदस्यांनी ही नुकसानभरपाई केली पाहिजे.

( २ ) मिसेस् एस्. यांना दिलेली दलाली त्यांनी काहीही केले नाही तरी दिलेली आहे. ते रु. १४,२३१ परत घेतले पाहिजेत.

( ३ ) जागेवरील इमारत पाडण्यात आली. त्या पाडलेल्या साहित्याचे दोन हजार रु. सोसायटीकडे आले पाहिजेत.

( ४ ) 'ब' यांना जमीनखरेदीवर रु. ७३,१५५ कमिशन देण्यात आले हा सोसायटीवर अन्याय आहे. ते पैसे सोसायटीला परत मिळाले पाहिजेत.

( ५ ) देखरेखीदाखल 'ब' यांना जे ५ टक्के कमिशन देण्यात आले तेही सोसायटीवर अन्याय आहे. ते पैसे सोसायटीला परत मिळाले पाहिजेत.

( ६ ) मजुरीविषयक कंत्राटे फाजील दराने देण्यात आली. त्यात योग्य अशी कपात करून तो पैसा सोसायटीस परत मिळाला पाहिजे.

( ७ ) बँकेने सिक्युरिटी म्हणून रु. १५,००० दिले होते. ते मॅ. कमिटीने अ ब क यांच्या खिशात जाऊ दिले. ते सोसायटीचे आहेत, ते सोसायटीला परत मिळाले पाहिजेत.

( ८ ) गरजू लोक ज्या क्रमाने सदस्य झाले त्या क्रमाने राहण्याच्या जागा वाटायचे ठरले असता एका 'न झालेल्या' सभेत आधीच्या सदस्यांनी नंतरच्या सदस्यांना, म्हणे, आपल्या क्रमांकाच्या जागा दिल्या. हे सारे खोटे आहे या लोकांना बाहेर काढून क्रमांकानुसारच जागा दिल्या पाहिजेत.

पहिल्या मॅनेजिंग कमिटीवर ज्या नुकसानीची जबाबदारी टाकण्यात आली आहे त्या सर्व नुकसानीस 'ब' हा जबाबदार आहे असे चौकशी समिती म्हणते. चौकशी समितीच्या मते पहिल्या मॅनेजिंग कमिटीने जमिनीच्या खरेदीत सोसायटीचे हित पाहिले नाही आणि व्यवहार निष्कलंकपणे केला नाही. पैशाच्या व्यवहारात अफरातफर आणि फसवणूक करण्यात आली असून जुनी मॅनेजिंग कमिटी व अ ब क यांनी संगनमताने हे गुन्हे केले असल्याचा संशय चौकशी समितीने व्यक्त केला आहे. पण समितीकडे गैरकारभार, नुकसान व त्याची जबाबदारी एवढेच मुद्दे चौकशीसाठी सोपविले होते. गुन्हा-संशोधनाचे काम सोपविले नव्हते; म्हणून चौकशी-समितीने चौकशी मुद्याबाबत स्पष्ट मत देऊन गुन्हेगारीबद्दल फक्त संशय व्यक्त केला आहे.

### दुसरा एक गोंधळ

कोणाचीही नावे देणे सुरक्षित नसल्याने 'स्वम्' सहकारी हौसिंग सोसायटी असे नाव या सोसायटीला या लेखापुरते देऊ. गैरकारभाराचे पुष्कळसे प्रकार वरच्या सोसायटीतल्या सारखेच असल्याने या अहवालातली फक्त नवी वैशिष्ट्ये देतो. १९६३ साली ही सोसायटी स्थापन झाली आणि १९६९ साली पहिल्या मॅनेजिंग कमिटीने सहकार खात्याकडे चौकशीची मागणी केली. सभासदांचे हजारो रु. बुडाले. त्यांना भूलवून फसविण्यात आले

आणि अनेकांना घरे मिळालीच नाहीत. मिळाली त्यांना अर्धवट स्थितीतली मिळाली. झालेले सर्व बांधकाम फाजील खर्चाने व वाईट झाले आणि पैसे संपून गेले व काम उरले आहे. हौसिंग फेडरेशनने अफाट कर्ज दिले, तेही बुडाले आहे. एका बड्या पुढाऱ्याच्या आशिर्वादाने व प्रोत्साहनाने या सोसायटीचे काम चालले. त्यांच्या नेतृत्वाखालील एका बड्या संस्थेच्या नियंत्रणाने व मार्गदर्शनाने या संस्थेचे काम चालले होते. देखरेखीच्या नावाने सोसायटीच्या पैशातून हजारो रुपये या संस्थेला मिळाले. सदर पुढाऱ्याला सोसायटीने १९६७ च्या निवडणुकीसाठी जीप घेऊन दिली. सदर पुढारी या सोसायटीत कोणीही नव्हता. पण तो मॅनेजिंग कमिटीच्या व जनरल बॉडीच्या सभेला हजर राहत असे आणि मॅनेजिंग कमिटीच्या अध्यक्षाचा प्रामाणिकपणा व कर्तृत्वाची प्रशंसा करून लोकांत त्याचेबद्दल विश्वास निर्माण करीत असे. ऐसोसायटीची पहिली मॅनेजिंग कमिटी व तिचे अध्यक्ष यांनी १६ लाख रुपयांबाबत फसवणूक व अफरातफर केली असून वर उल्लेखिलेल्या पुढाऱ्याच्या माहितीने व भागिदारीने हे प्रकार झाले असावे असे चौकशी समिती म्हणते. पण गुन्हेगारीबद्दल या समितीलाही चौकशी अधिकार नसल्याने तिने फक्त संशय व्यक्त केला असून फक्त गैरकारभार व नुकसानी एवढ्याच संबंधाने स्पष्ट मत मांडले आहे.

या सोसायटीने मुलुंड, वडाळा, अशा दूरदूरच्या जागी प्लॉट्स् घेतले व आणखी अशाच दूरदूरच्या जागा घेण्याचे योजले होते. सोसायटी स्थापन केल्यावर आकर्षक जाहिराती देऊन सभासद बोलविले व त्यांच्याकडून हजारो रुपये जमविले. जमिनींना अवास्तव किंमती दिल्या आणि जमिनीवर काही बोजे आहेत याची दखलच घेतली नाही. हे बोजे दूर करण्यासाठी सरकारी मदत मिळाली ती बहुधा त्या पुढाऱ्याच्या वशिल्यामुळे. सहकारी हौसिंग फिनॅन्स फेडरेशनने कामाच्या मानाने अवास्तव कर्ज दिले तेही त्या पुढाऱ्याच्या वशिल्यामुळे. संशयास्पद वर्तनाच्या कंत्राटदाराला मॅ. कमिटीने काम दिले. पुढे तो दुसऱ्या एका प्रकरणी तुरुंगात गेला. दुसऱ्या एका स्वतंत्र बांधकाम कंपनीला खूप मोठे काम देण्यात आले. ही कंपनी अनुभवी व यशस्वी आहे अशी तिची जाहिरात करण्यात आली. पण मॅनेजिंग कमिटीतल्याच काही सभासदांनी ही कंपनी काढली होती. त्यांना अनुभव काहीही नव्हता. या कंपनीने कमिशन घेऊन दुसऱ्या कंपनीला काम दिले. त्या दुसरीने आपले कमिशन ठरवून तिसरीला काम दिले शेवटी, जे झाले ते काम सारे वाईट झाले. स्टेशनरी व विविध साहित्य मॅनेजिंग कमिटीच्या अध्यक्षाच्या दुसरीकडच्या दुकानदारीतून घेण्यात येई.

पहिल्याने हिशेब चोख ठेवल्याचा देखावा करण्यात आला. पण पुढे हिशेब दाखविण्याचे बंद झाले. जनरल बॉडीच्या सभेत प्रश्न न विचारले जावे असे दडपण येऊ लागले. दीर्घकाळ सदस्यांनी विश्वास टाकून डोळे बांधून घेतले होते. वर उल्लेखिलेल्या पुढाऱ्याने आपल्या वजनाचा उपयोग करून सदस्यांची ही नजरबंदी घडवून आणण्यात मोठे साहाय्य दिले असे चौकशी समितीने म्हटले आहे. हे पुढारी शेवटच्या काही सभांना आले नाहीत त्यावेळी त्यांची खुर्ची रिकामी ठेवलेली असे. सोसायटीचे या गैरकारभारामुळे साडे सोळा लाख रु. चे नुकसान झाले. या गैरकारभाराला व नुकसानीला पहिली मॅनेजिंग कमिटी जबाबदार आहे असे चौकशी समिती म्हणते. हा गैरकारभार जाणूनबुजून कट करून करण्यात आला असा समितीचा आरोप आहे.

म्हणून पहिल्या मॅनेजिंग कमिटीने एकूण साडे सोळा लाख रु. नुकसानभरपाई सोसायटीला द्यावी असे समितीने ठरविले असून एकट्या अध्यक्षावर ६० टक्के म्हणजे सुमारे १० लाख रुपये लादण्यात आले आहेत. बाकीच्या नऊ सदस्यांकडून निरनिराळ्या प्रमाणात साडेसहा लाख रु. वसूल करायचे आहेत. मॅनेजिंग कमिटीच्या गैरकारभारातील गुन्ह्यांचे संशोधन झाले पाहिजे असा चौकशी मंडळाचा आग्रह आहे. ज्या पुढाऱ्यावर चौकशी मंडळाने गैरकारभारातील भागीदारी लादली आहे तो सोसायटीत प्रत्यक्ष पदाधिकारी नसल्याने चौकशीमंडळाच्या चिमट्यातून शेवटी निसटलाच आहे.

विधानसभेत एका सहकारी हौसिंग सोसायटीचे प्रकरण नुकतेच बरेच गाजले. म्हणून काही सोसायट्यांच्या गैरकारभाराचे चौकशी अहवाल मी मिळविले. चार अहवाल मला मिळाले व ते मी वाचले. गैरकारभाराचे प्रकार सर्वांत साधारण सारखेच आढळले म्हणून फक्त दोनच अति संक्षिप्त रूपात वर दिले आहेत. खरी नावे वापरता येत नाहीत म्हणून टोपण नावे दिली आहेत. घरासाठी हजारो रुपये गुंतविणारे लोक सोसायटीच्या कारभाराबद्दल बेफिकीर असतात म्हणून गैरकाभार घडतात असे सर्व अहवालात म्हटले आहे. चौकशी अहवाल पूर्ण निर्दोष आहेत असे मात्र मला पटलेले नाही. याची आजच विशेष चिकित्सा न करता उदाहरणादाखल एकच मोठी उणीव सांगतो. मुंबईत माझ्या माहितीतल्या निदान दोन कर्तबगार इसमांनी पुढाकार घेऊन शेकडो कुटुंबांना सहकारी घरे बांधू न दिली. त्यांनी स्वतः प्रामाणिकपणा सोडला नाही. पण म्युनिसिपल परवानग्या व साहित्य खरेदी यांसाठी हजारो रु. ची लाच दिल्यावाचून प्रामाणिक माणसालाही घर बांधता येत नाही असे हे लोक सांगतात. चारही चौकशी अहवालात चौकशी अधिकाऱ्यांनी या मुद्याचा उल्लेखही केला नाही, याविषयी माहिती मागितलीच नाही. सरकारनेही त्यांना ही माहिती मिळविण्यास सांगितले नाही. यामुळे हे अहवाल. अपुरे व एकांगी आहेत असे म्हणावे लागते.

('सहकारी महाराष्ट्र')

# दि कागल को-ऑप. बँक लि., कागल

( जि. कोल्हापूर )

स्थापना : १९१७

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. १,१६,४४० |
| रिझर्व्ह फंड व इतर निधी | रु. १,८७,००० |
| ठेवी | रु. ११,००,००० |
| कर्जे ( येणे ) | रु. ९,००,००० |
| खेळते भांडवल | रु. १४,५०,००० |

ऑडिट वर्ग अ

बँकेच्या कागल येथील ऑफिसमध्ये सेफ डिपॉझिट लॉकर्सची अद्यावत सोय आहे.

जी. एच. शिंदे — मॅनेजर
एम. ए. आलासकर — प्रेसिडेंट

# कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

हेड ऑफिस, बिंदू चौक, कोल्हापूर

शाखा : ४०

फो.नं. ३४२, २०११, १०१८

शाखा : शाहूपुरीमध्ये लॉकरची सोय आहे.

सहकारी समाज-रचनेच्या ध्येयवादाने प्रेरित होऊन जिल्ह्यातील शेती, मजूर, कारागीर, वगैरे अनेक विविध सहकारी संस्थांना अधिक उत्पादनाकरिता पत-पुरवठा करणारी पश्चिम महाराष्ट्रातील अग्रगण्य बँक.

| | |
|---|---|
| भाग-भांडवल | रु. १ कोटी, ५६ लाख |
| ठेवी | रु. ८ कोटींचे वर |
| खेळते भांडवल | रु. १६ कोटी |

जी. एम. जोशी — जनरल मॅनेजर
एस. एस. बांद्रे — व्हा. चेअरमन
यू. एन. गायकवाड — चेअरमन

दूरध्वनी : ५४५१९

# श्री सुवर्ण सहकारी बँक लिमिटेड

७५९/५१ डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४

दर रविवारी आपल्या सेवेस सज्ज

कामाच्या वेळा:
- रोज सकाळी ९ ते १०-३०
- संध्याकाळी ५-३० ते ७-३०
- रविवारी सकाळी ९ ते ११
- साप्ताहिक सुट्टी : बुधवार

खेळते भांडवल ३० लाख रु. चे वर

* आमचे ठेवीचे दर *

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | ४% |
| रिकरिंग ५ वर्षासाठी | ८% |
| मुदत ठेवी : मुदतीप्रमाणे | ६% ते ८% |

ज्ञानेश्वर आगाशे — चेअरमन
विलास एकबोटे — व्हा. चेअरमन
बी. बी. पुरोहित — मॅनेजर

# रत्नागिरी अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय – रत्नागिरी

स्थापना : १३–७–१९१४ — शाखा संख्या ५
दूरध्वनी क्रमांक ९३ — तार – अर्बन बँक

* आर्थिक-अप्रगत समाजाचे उत्थापनाला साह्य करते.
* विविध प्रकारच्या ठेवींवर आकर्षक दराने व्याज देते.
* सभासदांना तारणावर व पतीवर कर्जे देते.

तपासणी वर्ग : अ

| | |
|---|---|
| खेळते भांडवल | रु. ६७ लक्ष |
| ठेवी | रु. ५६ लक्ष |
| भाग-भांडवल व निधी | रु. ५ लक्ष |

आपली बचत, चालू, सयमी, स्वल्प बचत, मुदतीचे अगर नेहमीचे बचत ठेवींमध्ये गुंतवा.

वि. वि. भाटवडेकर — मॅनेजर

# खासगी सेक्रेटरीचे काम करणाऱ्या तरुणीची निवड

## वरिष्ठांनी कोणती दक्षता घ्यावी ? कोणती पथ्ये पाळावी ?

**व्यापारी कंपन्यातून सेक्रेटरी म्हणून काम करणारी एखादी तरतरीत व चुणचुणीत तरुणी आपल्या धन्याशी अगर एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी विवाहबद्ध झाल्याचे एखाद्या चित्रपटात दाखविण्यात येते. अशा तरुण सेक्रेटरींविषयी कचेऱ्यांतून काम करणाऱ्या पुरुष कारकुनांच्या काही वेगळ्याच कल्पना असतात. त्यांना असे वाटते की आपली बढती करून घेण्याचे काम तिच्यामार्फत सहज करता येईल. पण खाजगी चिटणीसाचे काम करणारी तरुण स्त्री खरोखर कशी असते ?**

अमेरिकेच्या नॅशनल सेक्रेटरीज असोसिएशनने असा निष्कर्ष काढला आहे की १० चिटणिसांतून एखादीच चालकाचे व्यवहारकुशलत्व अंगी असलेली आढळून येते. कंपन्यांच्या चालकांना अशा लायक तरुणी हव्या असतात हे खरे; पण, ह्या बाबतीत त्यांची अपेक्षा पुरी होण्याचा फारसा संभव नसतो. कारण, बहुतेक चालक अगर वरिष्ठ अधिकारी ह्यांना सेक्रेटरी कसा निवडावा ह्याचे फारसे ज्ञानच नसते. होते ते असे : आलेल्या उमेदवारांची ते मुलाखात घेतात, त्यांच्याविषयी काही आडाखे बांधतात, क्वचित् थोडीबहुत चाचणी घेतात आणि मग त्यांच्यापैकी निवड झालेल्या उमेदवाराला एकदम कामाला बसवतात. काम समाधानकारक व्हावे अशी त्यांची अपेक्षा अर्थातच असते. ही अपेक्षा पूर्ण झाली नाही की पुन्हा पहिल्यापासून सुरवात, पुन्हा पहिल्यासारखाच अंधार.

### जरूरीप्रमाणे हुशारी हवी

कोणत्या प्रकारच्या तरुणी-सेक्रेटरीची निवड करावयाची ते चालकांनी कामाच्या स्वरूपावरून ठरवावयास पाहिजे. एखादी तरुणी बुद्धिमान आणि कामात तरबेज झालेली असेल तर ती साचेबंद कामाच्या चाकोरीत फार काळ फिरत राहण्याची अपेक्षा रास्त ठरणार नाही. उलटपक्षी, अधिकारी तडफेचा आणि झपाट्याने काम करणारा असला आणि सेक्रेटरी बेताच्या वकुबाची असली तरीही ती फार काळ टिकणार नाही. म्हणून सेक्रेटरीला कामावर ठेवण्यापूर्वी अधिकाऱ्याला कशा प्रकारचे माणूस पाहिजे त्याची कल्पना असली पाहिजे. स्वतंत्रपणे काम करणारी पाहिजे की सांगकामी पाहिजे ? आज्ञाधारक, गरीब पाहिजे की स्वतःची मते असणारी आणि ती बोलून दाखविण्याचे स्वातंत्र्य हवी असणारी पाहिजे ? सकाळी ९ पासून सायंकाळी ५ पर्यंत ठराविक वेळात काम करणारी पाहिजे की जादा काम असले तर कामाच्या वेळेपेक्षा अधिक थांबून काम करण्यास तयार असणारी पाहिजे ? अशा अनेक प्रश्नांचा विचार अधिकाऱ्यांनी करावयास पाहिजे. अधिकारी शहाणा असेल तर एखादी सेक्रेटरी तरतरीत असूनही तिला नाकारील. कारण ती वाजवीपेक्षा अधिक हुशार असण्याची शक्यता असते. अशा तरुण सेक्रेटरी फारशा उपयोगी पडत नाहीत असा अनुभव आहे. एकतर त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असते; शिवाय, कचेरीत चलाख पुरुषांचे प्रमाण पुरेसे नसले तर त्यांचे कामावर नीट लक्ष लागत नाही आणि त्यांना कंपनीचे काम त्यांच्या अपेक्षेच्या मानाने कंटाळवाणे व सामान्य वाटू लागते.

### योग्य सेक्रेटरीचा शोध

खाजगी चिटणिसाचे काम करण्यास योग्य स्त्री बहुधा ३५ ते ४५ ह्या वयांतील असावी. तिचे लग्न झालेले असावे आणि तिला मुलेही झालेली असावीत. ह्या स्त्रियाच चिटणिसाचे काम करण्यात यशस्वी होण्याची शक्यता असते. कारण घरकामापलीकडे आणखी कामे करण्याची आपली पात्रता त्यांना दाखवावयाची असते. दुसरे असे की त्यांचा विवाह होऊन बरीच वर्षे लोटलेली असतात. तेव्हा पुरुषांच्या लहरीपणामुळे मनाचा तोल ढळू न देण्यास त्या साहजिकच शिकलेल्या असतात. अशा स्त्रियांचे यजमान नोकरीत स्थिर झालेले मात्र असावेत; नाहीतर घरच्या कटकटीमुळे त्यांच्या कामावर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते. त्यांचे पती कोणते काम करतात ह्याला फारसे महत्त्व नाही. परंतु यजमान मॅनेजरच्या जागेच्या खालच्या हुद्यावर असतील तर अशा स्त्रिया अधिक निष्ठेने काम पार पाडतात. अर्थात् अशा स्त्रिया नेहमीच मिळतील असे नाही. त्यांच्या अभावी अविवाहीत अगर घटस्फोटित पण त्याच वयाच्या गटातील स्त्रिया चालतील. मात्र त्या जरठ कुमारी अगर जीवनाला विटलेल्या मात्र असता कामा नयेत. बहुधा असे आढळून येते की अशा वयातील विवाहित स्त्रीने बरेच वर्षे काहीच काम केलेले नसते. असे असले तरी तिच्याजवळ कचेरीत लागणारी कुशलता असेल आणि ती हुशार व एकनिष्ठेने काम करणारी असेल तर हरकत घेण्याचे कारण नाही. इतकी बाकी घालून, अशी स्त्री सेक्रेटरी एखाद्या तरुण मुलीपेक्षा अधिक बरी ठरण्याची शक्यता असते. तथापि अगदीच मवाळ व होयबा वृत्तीची स्त्रीही कामावर घेणे बरोबर होणार नाही. कारण, अशा स्त्री-सेक्रेटरीला आपल्या वरिष्ठाची चूक सांगण्याचे धैर्यच होणार नाही. वरिष्ठ कधी चुका करीतच नाहीत असे अर्थातच नाही.

### निर्णय घेण्याची पात्रता

उलटपक्षी, स्वतःविषयी भलताच आत्मविश्वास असणाऱ्या

*Bank To Bank And Service To Satisfaction ...*

# THE BELGAUM BANK LIMTED

**Estd. 1930 : Scheduled Bank**

Registered Office : 659-60, Raviwar Peth, BELGAUM

| | | |
|---|---|---|
| Share Capital | Rs. | 8,11,000/- |
| Reserves | Rs. | 9,10,000/- |
| Deposits | Rs. | 6 Crores & 43 Lakhs. |

**S. Y. KAMAT** General Manager

**K. B. KIRTIKAR** Chairman

39 Branches in the States of Mysore & Maharashtra and Goa Territory — Our Bombay office at Mandvi, Bombay No. 9.

आमच्या हजारो खातेदारांचे नि हितचिंतकांचे

दिपावली निमित्त अभिष्ट चिंतन

# दि सांगली बँक लिमिटेड

[ शाखा ५८ ]

: मुख्य कचेरी :

राजवाडा चौक : सांगली

आपली भविष्य कालीन सुखस्वप्ने केवळ बचतीमुळेच साकार होतील. ती साधण्यास आमच्या छोटी बचत, रिकरिंग, कॅश-सर्टिफिकेटस् वगैरे योजनांचा आश्रय घ्या.

( बचत : एक राष्ट्रीय गरज )

चेअरमन

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे २.

दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला ।
द्वैत न मोडिता केला । आपण पै पार्थु ॥ —श्रीज्ञानेश्वरी

**साखरेचा १९७०–७१ चा नवीन हंगाम दि. २ ऑक्टोबर, १९७० रोजी सुरु झाला. मद्यनिर्मितीच्या कारखान्याचे सर्व काम पुरे झाले असून, सायलेंट स्पिरिटच्या उत्पादनास लवकरच सुरवात होईल.**

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

**शं. ल. लिमये,** बी. एस्सी., एलएल. बी., वकील.
अध्यक्ष.

तरुण स्त्रीच्या जाळ्यातही सापडू नका; कारण, मवाळ तरुणी-पेक्षा ती अधिक चांगली असेलच असे नाही. एका नोकरीवरून दुसऱ्या नोकरीवर भटकणाऱ्या फुलपाखरी वृत्तीच्या सेक्रेटरीबद्दल तर बोलणेच नको. निर्णय घेण्याची पात्रता असलेल्या सेक्रेटरीचा शोध अधिकारी नेहमीच करीत असतात. पण, त्यांना तशी माणसे क्वचितच सापडतात. अधिकारी नेहमीच कार्यमग्न असतात. घाईगर्दीच्या वेळी त्यांची सेक्रेटरी किरकोळ बाबतीतील निर्णय स्वतः न घेता जर त्यांच्याकडे आली तर ते काहीसे चिडतात. निदान चिडण्याचा संभव असतो. स्वतंत्रपणे विचार करणे आपल्या वरिष्ठाला आवडते हे जर तिला माहीत असेल तर तिला तसे उत्तेजन देण्यास काय हरकत आहे? समजा, एखाद्या किरकोळ बाबतीत तुमचा निर्णय घेण्यास ती तुमच्याकडे आली तर 'ह्या बाबतीत तुम्हीच काय ते ठरवा' असे म्हणण्यास अडचण पडू नये. लहानसहान बाबतीत निर्णय घेण्याचे तिच्यावर सोपविले तर हळूहळू अधिक महत्त्वाचे निर्णयही तिला घेता येणे शक्य होईल.

### मुलाखती आणि निवड

तेव्हा तुम्हाला पाहिजे तशी सेक्रेटरी मिळण्यापूर्वी तुम्हाला बरेच डोके खाजवावे लागेल. एखाद्या वेळी असे होते की तुम्ही ह्या निवड करण्याच्या प्रयत्नामुळे थकून जाता. पाचसहा मुलींच्या मुलाखती तुम्ही घेता; मग तुम्हाला कंटाळा येतो; ह्या कामात रस वाटत नाही; आणि मग नंतर मुलाखतीला येणारी तरुणी साधारण बरी वाटली की तुम्ही तिला कामावर ठेवता. पण हे बरोबर नाही. खरे म्हणजे सर्व अर्जांची छाननी करण्यात आली पाहिजे. ज्या उमेदवारांच्या अर्जांचा विचार करण्याचेच कारण नाही ते बाजूला ठेवले गेले पाहिजेत. त्यांची मुलाखत घेण्याचीही जरुरी नाही. उरलेल्या अर्जासंबंधी तुमच्या हाता-खालच्या माणसांनी जी छाननी केली असेल त्यावर विसंबून राहता येईल किंवा अर्जदारांच्या अर्जांचा व त्यासोबतच्या शिफारसपत्रांचा विचार तुम्हाला करता येईल. ह्या चाळणीतून जे उमेदवार शिल्लक राहतील त्यांची मुलाखत घेता येईल. प्रत्येक उमेदवाराबद्दल स्वतःचे मत तयार करता येईल; आणि मग त्यातून अखेरची निवड करता येईल.

### स्त्री-सेक्रेटरी कामे का सोडतात?

नोकरीतील प्रलोभनाविषयी भलताच ग्रह निर्माण करू नका. पुष्कळदा नोकरीच्या जाहिरातीत 'प्रवासाची भरपूर संधी, मनासारखे काम, जबाबदारीचे काम' अशी आकर्षणे दाखविलेली असतात. प्रलोभने खरोखर असतील तर ठीकच, पण नसताना तशी जाहिरात करू नका. एखादी तरुणी जर प्रथम लघुलेखिका म्हणून काम करणार असेल तर तिला तसे स्पष्ट सांगा. तिला नेहमीच्या कचेरीत बसावयाचे असेल तर उगाच स्वतंत्र खोली देण्याचा देखावा करू नका. तुमच्याखेरीज दुसऱ्यांसाठीही जर तिला काम करावयाचे असेल तर तिला तसे स्पष्ट सांगा. थोडक्यात म्हणजे नोकरीची आकर्षकताच भलती भडक रंगात दाखवू नका. काही तरुण स्त्रियांना मानसिक ताण वाटतो. काही कामाला बऱ्या असतात पण त्यांना जबाबदारी पेलत नाही. काहींना निर्णय घेणे आवडते; पण लाजाळूपणामुळे लोकांशी संबंध नको असतो. म्हणून कोणती तरुणी नोकरीच्या कामासाठी योग्य आहे याची कल्पना असली पाहिजे. थोडक्यात म्हणजे उमेदवारांना योग्य मार्गदर्शन करा. नोकर पुरविणाऱ्या एका एजन्सीने असा निष्कर्ष काढला आहे की नोकरीत बढती देण्याबाबत नीटसे धोरण नसल्यामुळे बऱ्याच स्त्री-सेक्रेटरी काम सोडतात. ह्या बाबतीत पाहणी करण्यात आली तेव्हा मालकाने पगाराविषयी दिलेली अभिवचने पाळण्यात आली नाहीत म्हणून १२ टक्के नोकरांनी नोकरी सोडल्याचे आढळून आले. २० टक्के सेक्रेटरींना काम आवडले नाही अगर कचेरीतील माणसे आवडली नाहीत; आणि १६ टक्क्यांना अधिक जबाबदारीची कामे पाहिजे होती, म्हणून त्यांनी नोकऱ्या सोडल्या होत्या. ६ टक्क्यांना जादा कामाबद्दलचे कंपनीचे धोरण आणि इतर परिस्थिती मान्य नव्हती. ५ टक्क्यांना कचेरीची जागा पसंत नव्हती. इतरांनी विवाह, गर्भारपण, बदली, इत्यादी कारणांनी नोकऱ्या सोडल्या होत्या.

### वरिष्ठांचे कोठे व काय चुकते?

एकाच हाताने टाळी वाजत नाही ह्या न्यायाने वरिष्ठांनी कोणत्या चुका टाळाव्या यांची अनुभवसिद्ध यादी पुढे दिली आहे. खाली दिलेल्या प्रश्नांत तुम्ही कोठे बसता ते ठरवा.

(१) सेक्रेटरींना पुष्कळदा कामाच्या नेहमीच्या वेळेनंतरही काम करावे लागते; म्हणून संध्याकाळच्या आत गेलेच पाहिजे असे टपाल उशिरा तयार करण्याऐवजी दुपारीच तयार ठेवण्याची दक्षता घेतली जाते का?

(२) एखाद्या पत्रातील किरकोळ चुका दाखविण्यासाठी त्याच पत्रावर खाडाखोड करून तुम्ही त्या चुका दाखविता का?

(३) जी कामे सुटीच्या दिवशी अगर घरी करण्यास तुम्ही स्वतः नाखूष असता, ती कामे सेक्रेटरीला तशी करण्यास तुम्ही सांगता का?

(४) तुमच्या चुकीचे खापर सेक्रेटरीच्या माथी फोडता का?

(५) तशी तातडीची जरूरी नसताना सेक्रेटरीला तिचा स्वतःचा काही कार्यक्रम बदलण्यास सांगता का?

(६) दुसऱ्यांच्या देखत सेक्रेटरीवर टीका करता का?

(७) तुमच्या मनातील गोष्ट सेक्रेटरीने ओळखली नाही तर तुम्ही त्रासिकपणा दाखविता का?

(८) जी अप्रिय कामे तुम्हीच करावयास पाहिजेत ती करण्यास सेक्रेटरीला सांगता का? उदाहरणार्थ, एखादी अप्रिय बातमी सांगण्याचे अगर नको असलेल्या आगतांना वाटेला लावण्याचे काम.

---

फोन नं. ४४१

## यशवंत सिमेंट वस्तु निर्मिती सहकारी सोसायटी लिमिटेड.,

औद्योगिक वसाहत, सांगली

◆ गेल्या दहा वर्षात देशाच्या अन्नधान्य आघाडीवर सेवा करून आम्ही हजारो एकर जमीन पाण्याखाली आणण्यास उभे ठाकलो त्याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो.

★ अनुभवी शेतकरी असाच सल्ला आपल्या सोबत्यांना देतो की, "जर तुम्हांस 'यशवंत' व्हायचे असेल तर सांगली औद्योगिक वसाहतीमधील कामगारांनी चालविलेल्या यशवंत सिमेंट वस्तु-निर्मिती सहकारी सोसायटीचेच सिमेंट पाईप घेऊन आपली पाणीपुरवठा योजना पुरी करा.

◆ आमच्या सर्व शेतकरी ग्राहकांची व सल्लागार-सहानुभूतीदारांची नवीन वर्षी सुखसमृद्धीने भरभराट होवो, हीच सदिच्छा.

आपले,

नामदेव कराडकर — सेक्रेटरी
रघुनाथराव भिडे — चेअरमन

यशवंत सिमेंट वस्तु-निर्मिती सहकारी सोसायटी लि., सांगली

---

हेड ऑफिस टे. नं. २२ मिश्रखत विभाग टे. नं. ५६
माल खत वि विभाग टे. नं. ५८ ऑईल मिल टे. नं. ५८
गुळ साखर विभाग टे. नं. ५०

शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी निर्मित

## पैसाफंड मिश्रखत

| | |
|---|---|
| १५ : ५ : ५ | १२ : ६ : ० |
| १० : ५ : ५ | ६ : १२ : ० |
| ९ : ९ : ५ | ९ : ९ : ० |

सर्व पिकांना वापरणे पसंत करतात. आपण एकवेळ अनुभव घेतल्यास कमी पैशांत भरपूर मोबदला मिळाल्याचे समाधान आपणासही लाभेल. एक वेळ वापरून खात्री करा.

डी. बी. देमाण्णा — शेती अधिकारी
आ. बा. नाईक — मॅनेजिंग डायरेक्टर

एल. वाय. पाटील — चेअरमन

दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.,
हुपरी, जिल्हा—कोल्हापूर.

---

## दि नासिक मर्चन्टस्
### को-ऑपरेटिव्ह बँक लि., नासिक

( स्थापना : दि. ९-८-१९५९ )

[ ३०-६-७० चे प्रगतीचे आकडे ]

| | | |
|---|---|---|
| [१] भाग-भांडवल | .... | रु. २,२७,००० |
| [२] निधी | .... | रु. १,१०,००० |
| [३] ठेवी | .... | रु. ३१,७७,००० |
| [४] दिलेली कर्जे | .... | रु. २९,०३,००० |
| [५] खेळते भांडवल | .... | रु. ४४,६७,००० |

मु. शं. औरंगाबादकर — ऑ. मॅ. डायरेक्टर
प्र. अ. मोडक — अध्यक्ष
व. के महादेवकर — मॅनेजर
ग. वि. अष्टपुत्रे — उपाध्यक्ष

---

अल्पावधीत नेत्रदीपक यश पटकावून आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली आणि सामान्य जनता-जनार्दनाच्या गरजा सातत्याने भागविण्यासाठी अहर्निश झटत असलेली

## जनता सहकारी बँक लि., सांगली

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )
( स्थापना १७-१२-१९६० )

—प्रगतीपथावरील बोलके आकडे—

| | |
|---|---|
| (१) सभासद-संख्या | १८०१ |
| (२) शेअर-भांडवल | रु. ३,८९,४१५ |
| (३) रिझर्व्ह व इतर फंडस | रु. ३,९०,०२४ |
| (४) ठेवी | रु. ४४,११,०५३ |
| (५) खेळते भांडवल | रु. ६३,०७,४७९ |
| (६) वार्षिक उलाढाल | सतरा कोटींचे वर |

श्री. वा. आ. कवाडे बी.ए., बी. कॉम. — मॅनेजर
श्री. यु. भा. कात्रा — व्हा. चेअरमन

श्री. अण्णासाहेब कराळे — चेअरमन



# होर्डिंगच्या व्यवसायातील यशस्वी

# श्री. बी. के. नाईक


*आज मोठमोठ्या जाहिरातींची रंगीबेरंगी होर्डिंग्ज मोक्याच्या जागी लावलेली ठिकठिकाणी दिसतात. श्री. बाबुराव नाईक ह्यांनी होर्डिंगच्या व्यवसायास प्रारंभ केला, तेव्हा होर्डिंगचा प्रकार नवीनच होता आणि श्री. नाईक ह्यांनी हा नवा व्यवसाय हाती घेऊन यशस्वी केला, ही त्यांची खरी कर्तबगारी. कंपन्यांना होर्डिंगचे महत्व पटवून देण्याची आवश्यकता असण्याचा तो काळ होता. शून्य भांडवलावर सुरु केलेल्या त्यांच्या व्यवसायाची प्रगती वाचकांना उद्बोधक वाटेल, ह्यात संशय नाही.*

श्री. बाबुराव नाईक ह्यांचा जन्म १५ जुलै, १९१० रोजी भुसावळ येथे झाला. वडील शाळामास्तर होते. गरिबीमुळे फारसे शिक्षण घेता न आल्याने बाबुरावांनी १९२७ मध्ये हायस्कूल सोडून सिनेमागृहे, बालगंधर्व नाटक मंडळी, वगैरेकडे पेंटिंग, डोअर कीपर, इत्यादी किरकोळ कामे करण्यास आरंभ केला. नंतर ते फ्रेममेकिंगही करू लागले. त्यानंतर, १९२८ मध्ये, त्यांनी भुसावळ येथे पेंटिंगचे दुकान सुरू केले, पण दुकान नीट चालेना. म्हणून त्यांनी मथुरा येथे सुखसंचारक कंपनीत पेंटिंगची नोकरी पतकरली. परंतु,लवकरच त्यांनी ही नोकरी सोडली आणि त्याच कंपनीचे महाराष्ट्रात ठिकठिकाणच्या भिंती रंगविण्याचे काम सुरू केले. हळूहळू इतर कंपन्यांचेही भिंती रंगविण्याचे काम मिळू लागले आणि भुसावळ येथे एक आणि नागपूर येथे एक, अशी दोन दुकाने सुरू केली. मुंबई प्रांत, मध्य प्रदेश, संयुक्त प्रदेश, इत्यादी ठिकाणच्या प्रमुख शहरात जाहिरातदारांच्या भिंती स्वत: रंगविण्यास त्यांनी प्रारंभ केला. हळूहळू त्यांचे कार्यक्षेत्र गुजरात, कर्नाटक येथवर गेले. भिंती रंगविण्याच्या धंद्यात स्पर्धा जाणवू लागली आणि त्यातच दरवर्षी पावसाळ्यात काम बंद पडायचे.

धंद्याची ही परिस्थिती लक्षात घेऊन बाबुरावांनी जाहिरातीचाच दुसरा म्हणजे होर्डिंगचा धंदा हाती घेतला. मोक्याच्या जागा भाड्याने घेऊन त्या ठिकाणी मोठाले बोर्ड्स बसविणे आणि ते वेगवेगळ्या कंपन्यांना जाहिरातीसाठी भाड्याने देणे, हा होर्डिंगचा धंदा त्यांनी सुरू केला. ह्या धंद्यात जोखीम असते, कारण आपण भाडे भरून कंपन्यांना ते बोर्ड भाड्याने देता आले नाहीत, तर भाडे अंगावरच पडते. भांडवलही गुंतवावे लागते. धूतपापेश्वर, आफालि, द. कृ. सांडू ब्रदर्स, अलेंबिक, इत्यादी कंपन्यांचे साहाय्य बाबुरावांना मिळाले आणि भुसावळ येथे मोठा बोर्ड लावून त्यांनी ह्या नव्या धंद्यास १९३७ साली प्रत्यक्ष प्रारंभ केला. परंतु, तुटपुंज्या भांडवलामुळे फारशी प्रगती करता आली नाही. एवढ्यातच वडील निवर्तले आणि पाच भावंडांची जबाबदारी येऊन पडली. अशा बिकट परिस्थितीत भुसावळ येथेच जेमतेम एक वर्ष उपजीविका केली.

१९३८ मध्ये बाबुराव मद्रास येथील अमृतांजन कंपनीकडे भिंती रंगविण्याच्या कामास गेले असताना आयत्या वेळी काही मतभेद होऊन काम मिळाले नाही. भुसावळला परत जाताना पुण्यात त्यांनी नव्या पुलाजवळ कुलकर्णी मोटार स्कूलचे श्री. दादासाहेब कुलकर्णी ह्यांच्या आवारात एक पाटी लावली होती, ती बाबुरावांच्या नजरेस पडली. त्या पाटीवर लिहिले होते, "जाहिरातीसाठी जागा देणे आहे". बाबुराव दादासाहेबांना भेटले. त्यांना जवळ होते ते १० रु. दिले आणि उरलेले ९० रु. एका महिन्यात देऊन भाडे पुरे करावे, नाहीतर १० रु. परत मिळणार नाहीत, ह्या अटी मान्य केल्या. तेथून बाबुराव सिटी पोस्टाजवळील धूतपापेश्वरच्या दुकानी जाऊन श्री. बाबुराव खऱ्यांना भेटले. "कुलकर्णी ह्यांचे जागेत एक जाहिरातीचा बोर्ड लावायचा आहे; आपणांस (म्हणजे धूतपापेश्वराला) तेथे जाहिरात करावयाची असल्यास देऊ. तेव्हा, ती जागा पसंत असेल तर कंपनीला तसे पत्र लिहा." अशी त्यांना विनंती केली. त्याप्रमाणे श्री. खरे ह्यांनी पत्र लिहिले, ते बाबुरावांनी

श्री. नाईक ह्यांची एक कलाकृती




खंडाळा घाटातील मोक्याच्या जागी उभे केलेले ७५ फूट लांबीचे व १५ फूट उंच अक्षरांचे हे प्रचंड होर्डिंग आगगाडीतून जाताना लक्ष वेधून घेते.

समोरच्याच पोस्टाच्या पेटीत टाकले आणि ते भुसावळला परतले. पाठोपाठ धूतपापेश्वर कंपनीचे पत्र आले, "आम्ही बोर्ड भाड्याने घेतला". बाबुरावांना खूप आनंद झाला.

आता प्रश्न आला भांडवलाचा. पुण्याला जाऊन ९० रुपये भाडे भरावयाचे, २४ फूट लांब आणि १२ फूट रुंद असा बोर्ड तयार करून तो रंगवायचा, त्याचा फोटो काढून कंपनीला मंजुरीसाठी पाठवायचा, ह्यासाठी लागणारे कमीत कमी चार-पाचशे रुपये कसे उभे करायचे ? म्हणताताना की, वेळ आली की सर्व काही जुळते. त्याप्रमाणेच झाले. त्यांचे शेजारी श्री. तिवारी मामा ह्यांना बाबुरावांनी सर्व हकीकत सांगितली आणि त्यांनी मागचा-पुढचा काहीही विचार न करता त्यांना २०० रु. तावडतोब दिले. बाबुरावांनी आपला इमानी नोकर श्री. आर. एस. कुलकर्णी ह्यांना पुढे पुण्यास पाठविले आणि बाबुराव १ एप्रिल, १९३८ रोजी, चैत्र शु. १ च्या शुभदिवशी, पुण्यात दाखल झाले. तेव्हापासून आजवर कामाची कधीच कमतरता पडली नाही. उलट, कामे पुरी करण्यासाठी धावपळ करावी लागते. धूतपापेश्वर, ओगले, अलेंबिक, बिटको, आफ्लालि, अमृतांजन, एल. आय. सी., गौतम, किर्लोस्कर, लकाकी, साठे, पार्ले, शालिमार, स्वस्तिक, आशा, इत्यादी अनेक नामवंत कंपन्यांची कामे सतत येत आहेत.

आता बाबुरावांचे दोघे चिरंजीव दत्तात्रय (विजयकुमार) आणि प्रभाकर, ह्यांनी व्यवसायाची जबाबदारी घेतली असल्यामुळे बाबुराव हळूहळू निवृत्त होत आहेत. दोघेही चिरंजीव वडिलांच्या हाताखाली व्यवहारदक्ष झाले असूनही वडिलांचे मार्गदर्शन त्यांना मोलाचे वाटते आणि त्याचा ते नेहमी आदर करतात. त्यामुळे, बाबुरावांची व्यावसायिक निवृत्तीची वाटचाल समाधानाची झाली आहे.

बाबुरावांचे आता ईश्वराजवळ एकच मागणे आहे; "आहे तेवढे पुरे. जास्त नको, परंतु आहे त्यापेक्षा कमी नको. आपलेपासून इतरांना त्रास नको, परंतु इतरांचा देखील आपणांस त्रास नको. आमचे गुरू घराणे श्रीक्षेत्र पैठण नाथांचे. त्याशिवाय श्रीगोन्दवलेकर महाराज यांचेबद्दलचे मनन व त्यांचे बद्दलची अढळ श्रद्धा. एकूण सुरुवातीला एक साधा पेन्टर, नोकरी साध्या शिपायापासून पेन्टर पावेतोची. त्यानंतर धंद्यात आज-पावेतो खूप धावपळ करून आज आहे त्या परिस्थितीत अत्यंत समाधान आहे,"""ईश्वर कृपेने व वडिलांच्या कृपेने व जनता जनार्दनाचे कृपेने""""घरदार, जमीन, शेतीवाडी, मोटार"""वगैरे सर्व त्यांचेच कृपेने मिळाले असून आता कोणताच हव्यास राहिला नाही. आहे तो हा की""""आपणांस आता जेथे जावयाचे आहे त्या ठिकाणी जाणेसाठी काय काय करावयाचे आहे, कसे वागायला पाहिजे, त्याबद्दलची चिंता व शक्य तो त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करणेचा पाहात आहे. अखेरीस त्या प्रभूने माझे नशिबी काय लिहून ठेवले आहे ते त्यालाच माहिती".

---





लक्ष्मी चंचल असते

खरे आहे, पण ती तुमच्याकडे ठेवाल तर!




उलट आपल्याजवळची लक्ष्मी बँकेत ठेवल्यास ती अधिक स्थिर होते. एवढेच नव्हे तर प्रतिदिनी वाढत रहाते. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर लक्ष्मीची वाढ करण्यासाठी आमच्या 'धनवर्धिनी' योजनांची माहिती घ्या व त्यांचा पुरेपूर फायदा घ्या.

आपणास माहिती देण्यासाठी आमच्या ४१ शाखा आपल्या सेवेस हजर आहेत.




दि पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

लक्ष्मी रोड, पुणे.

सा. मा सातकर, अध्यक्ष — दि ना कायदे, कार्यकारी संचालक

आवर्तक ठेवी

| मुदत महिने | मासिक हप्ता रु. ५ भरल्यास मिळणारी रक्कम | मासिक हप्ता रु.१० भरल्यास मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| १२ | ६२ | १२४ |
| २४ | १२८ | २५६ |
| ३६ | १९८ | ३९६ |
| ४८ | २७३ | ५४६ |
| ६० | ३५५ | ७१० |

बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांस ही दीपावलि व नूतन वर्ष सुखाचे व भरभराटीचे जावो.

दि. ना. कायदे, कार्यकारी संचालक

साहेबराव मा. सातकर, एम. एल. ए., अध्यक्ष

वि. चिं. गरुड, व्यवस्थापक

वि. ल. पारखी, ॲडव्होकेट, उपाध्यक्ष

# परदेशी पाहुण्यांनी केलेल्या स्तुतीमुळे आपली दिशाभूल

## ते स्वदेशी परतल्यावर तेथे काय बोलतात, त्याचा हा नमुना पाहा

भारतात येणारे परदेशी पाहुणे आपल्याविषयी जे बोलतात, ते आपल्याला स्तुतीपर वाटते. आपणच त्यांना विचारतो, "आवडले का जेवण? आवडला का कार्यक्रम?" पाहुण्यांना काही तरी उत्तर द्यावेच लागते; त्या उत्तराचा गर्भितार्थ आपल्या लक्षात न घेता, वरवरच्या अर्थाने आपण भारून जातो; आणि पाहुण्यांच्या स्तुतीने भारून जाऊन त्यांचे कौतुक करीत सुटतो. त्यामुळे, आपलीही जाहिरात आपोआपच होते!

### जाणवणारी लाचारी

एका अमेरिकन प्राध्यापकांना मुद्दाम खोदून विचारले, तेव्हा ते म्हणाले, "खरं सांगू का? इथून मी केव्हा परत जाईन असं मला झालं. मनातील ही कल्पना काढून टाकायला आणि इथल्या परिस्थितीशी जुळते करून घ्यायला, शिकायला तब्बल एक महिना लागला. इथे कुणाच्या शब्दावर विसंबून असण्याची सोयच नाही, हे मला भारी खटकलं."

"एन्‌काउंटर" ह्या लंडनमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या मासिकातील प्रा. जॉन वेन ह्यांच्या एका लेखाने ह्या प्रश्नाकडे पुनः लक्ष वेधले. 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम'च्या निमंत्रणावरून इंग्लंडमधील इंग्रजीच्या ह्या प्राध्यापकाने भारताला भेट देऊन दौरा केला होता. हिंदी लोकांच्या लाचारीचा त्यांना फारच राग आला. "हिंदी लोक संख्येने इतके मोठे आहेत, ते इतके थोडे मागतात, ते मातीतून वर येतात आणि मातीला पुनः मिळतात; त्यांच्यापुढे आम्ही कोण? प्रत्येकाची वेगळी मुखचर्या असणारे, प्रत्येकाला स्वतंत्र नाव असणारे, आमच्या शरीराची काळजी वाहण्यासाठी डॉक्टर असणारे, आमची मने दुरुस्त ठेवण्यासाठी मानसशास्त्रज्ञ असणारे आम्ही, ह्या भारतात कुठेच बसू शकत नाही" असा त्यांनी आपल्या लेखाचा प्रारंभ केला आहे. "भारतातील सर्वांत सुखी प्राणी, म्हणजे पक्षी; कारण खालची घाण आणि कर्कश आवाज ह्यातून मुक्त होण्यासाठी तो आकाशात उंच जाऊ शकतो, त्याच्या तीक्ष्ण नजरेला खाली कुठे भक्ष्य दिसले की ते उचलून पुनः तो पसार होऊ शकतो!" हे त्यांच्या लेखाचे सूत्र आहे.

### विद्येच्या माहेरघरी

विद्या आणि संस्कृती ह्यांचे माहेरघर असलेल्या पुणे शहराविषयीचा त्यांचा अनुभव आता आपण पाहू या. "गव्हर्नरांच्या पूर्वीच्या निवासस्थानात पुणे विद्यापीठाचे मध्यवर्ती केंद्र आहे. तेथे घाईने येणाऱ्या-जाणाऱ्या चष्मेवाल्या प्राध्यापकांची बरीच गर्दी असते. माझे व्याख्यान ठरले होते, पण विद्यापीठाची कोणतीच इमारत मोकळी नव्हती. तेव्हा ते एका शाळेच्या, पत्र्याच्या शेडमध्ये झाले! शाळा नुकतीच सुटलेली असल्यामुळे शेजारचे खेळाचे मैदान आरडाओरडा करणाऱ्या मुलांनी भरून गेले होते. पत्र्याच्या शेडकडे मला प्रिन्सिपॉल घेऊन चालले, तेव्हा आजूबाजूची मुले आपला खेळ थांबवून, मी दृष्टिआड होईपर्यंत माझ्याकडे बघत राहिली. हल्ली इंग्रजांचे दर्शन पुण्यात इतके दुर्मिळ झाले आहे की काय? आफ्रिकेत अशी प्रतिक्रिया ठीक होती. पण खरेच, हा ग्रामीण भारत आहे; विद्यापीठ असो वा नसो, खेडवळपणा सर्वत्र भरलेला आहे! माझे व्याख्यान चालू असताना हळूहळू अंधार पडला असताना आणि माझ्या डोक्यावरील कैच्यातली वटवाघळे जागी होऊन ओरडू लागली. त्यांचे पंख फडफडायला लागले. 'आधुनिक इंग्रजी वाङ्मयीन टीकाप्रकार' ह्या विषयावरील माझ्या भाषणातील वाक्यांना वरून वटवाघळांचा ठेका मिळत होता, समोरच्या बाकावरील विद्यार्थी आणि प्राध्यापक शांत बसले होते; छपरात वटवाघळांचे चिरचिरणे चालू होते, मुले क्रीडांगणावर आरडाओरडा करीत होती आणि आयुष्यातील मूल्ये आणि वाचनाच्या सवयी, ह्यावर माझे भाष्य चालू होते! भाषण झाल्यानंतर प्रिन्सिपॉलच्या कचेरीत जमलेल्या 'विद्वानां'शी माझे इकडच्या तिकडच्या विषयावर बोलणे झाले, तो बाहेर दोन शाळकरी मुले, मला नेहरू-गांधी ह्यांची चित्रे भेट म्हणून द्यायला उभी होती. मला कदाचित् कोणता फोटो कुणाचा हे ओळखता येणार नाही, म्हणून त्याच्याखाली नावेही लिहिलेली होती.

### पाहुणचाराचा अजब प्रकार

सर्व योजनाच बिघडली होती. ज्या प्राध्यापकाने मला रात्री जेवायला बोलावले होते, त्याची आई इस्पितळात आजारी होती. तेथे त्याला सबंध रात्र काढावी लागली. तेव्हा हे काम छोट्या प्रिन्सिपॉलकडे आले. तो जरा घाबरट दिसला. पण त्याने त्याला शक्य ते सर्व केले. भारतीयांखेरीज दुसऱ्यांशी बोलण्याचालण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग असावा! त्याने मला एका रेस्टॉरंटमध्ये नेले, तेथे कॉलरा आणि अतिसार हेच मेनूतले मुख्य पदार्थ होते! त्यानंतर प्रिन्सिपॉल, त्यांची पत्नी व मी गर्दीच्या रस्त्यांनी त्यांच्या घरापर्यंत चालत गेलो. वाटेत आम्ही शिक्षणावर बोलत होतो. कारण ते सुधारण्याचा त्यांचा निश्चय दिसला! तो गृहस्थ हुशार आहे किंवा नाही, हे मी सांगू शकत नाही. कारण त्याचे इंग्रजी मला कळत नव्हते. (त्याची पत्नी इंग्रजी बोलूच शकत नव्हती) दहाच्या सुमाराला आम्ही प्रिन्सिपॉलच्या घरी पोहोचलो आणि त्यांनी चहाचा आग्रह केला. रात्री चहा घेतल्यावर मला झोप येत नाही तरी पण मी चहा प्यालो. इतक्यात इतस्ततः झुरळे वावरू लागली. एका झुरळाला मी चुकवले, पण दुसरे पुनः माझ्यावर हल्ला करायला आले. झुरळे मला आवडत नाहीत, आणि ती नावड मी लपवू शकत नाही.

मी एकदम खोलीच्या मध्यभागी जाऊन उभा राहिलो; पण प्रिन्सिपॉलला त्यात विशेष असे काहीच वाटले नाही. इंग्लंडमध्ये उभे राहण्याची तशीच पद्धत असावी अशी त्याची कल्पना झाली की काय, कोण जाणे! आता निजायची वेळ झाली आहे, हे त्यांनीच ठरवून, टॅक्सी आणवीपर्यंत मी तसाच झुरळे चुकवीत उभा होतो!

### धन्यतेच्या उलटसुलट तबकड्या

"दुसऱ्या दिवशी सकाळी मला स्टेशनवर घेऊन जाण्यासाठी प्रिन्सिपॉल आले. गाडी सुटायच्या आधी तब्बल अर्धा तास आम्ही स्टेशनवर पोचलो. गाडीत मला जागा मिळवून दिल्यावर आम्ही डायनिंग कारमध्ये जाऊन कॉफी मागविली, एकमेकाकडे बघत आम्ही बसलो; आम्हापैकी कोणालाच, काहीच बोलण्याजोगे नव्हते.

हिंदी शिक्षणाचे दर्शन ह्या छोट्या माणसाच्या स्वरूपात, त्याच्यावरील कामाच्या ताणात, त्याच्या दारिद्र्यात, त्याच्या झुरळांनी भरलेल्या बिऱ्हाडात, मला झाले! पण तोही बोलेना आणि मीही बोलेना.

अखेर, मी उठून जाऊन एक वृत्तपत्र विकत घेतले आणि त्यातील बातम्यांच्या शीर्षकांच्या आधारे कसेबसे बोलणे चालू ठेवले. गाडी केव्हा सुटेल, असे मला होऊन गेले. इतक्यात प्रिन्सिपॉलनी एक छोटेसे वक्तव्य करून, माझ्याशी चर्चा करण्यात त्यांना किती धन्यता वाटली, ह्याचे वर्णन केले. काय उत्तर द्यावे हेच मला कळेना तेव्हा मीही त्यांच्या भाषणाची उलट रेकॉर्ड त्यांना ऐकवली. गाडी सुटायची वेळ झाली. तशी प्रिन्सिपॉलनी खाली उतरून खिडकीतून माझ्याशी हस्तांदोलन केले. प्रिन्सिपॉलसाहेब! आता मी ज्या कित्येक भारतीय गोष्टींविषयी अनादरावाने बोलण्याचे बंद करीन, त्यात हिंदी शिक्षणाची भर पडली आहे. माझा निश्चय टिकला, तर कदाचित् झुरळेही आवडायला मी शिकेन."

प्रा. जॉन वेन ह्यांच्या प्रत्येक शब्दाचा अर्थ नीट समजला, तर आपल्याविषयी पाश्चात्य पाहुण्यांना काय वाटते ह्याची पुरी कल्पना येईल. पुण्यातील हा त्यांचा अनुभव; मग इतर ठिकाणी काय झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी! त्यांना सौजन्य लपविणेसुद्धा किती अवघड जाते, त्याचा किती ताण पडतो, आणि आपण त्याचा अर्थ कसा अगदी वेगळा करतो, हे लक्षात आले म्हणजे अतिशय खेद होतो. पाश्चात्त्य आणि भारतीय पद्धती वेगळ्या असणे स्वाभाविक आहे, पण त्यांची पातळी किती भिन्न असावी आणि त्याबाबत आपले अज्ञान किती काळ कायम राखावे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रा. जॉन वेनसारखे पाहुणे हे येथे काय बोलले किंवा काय बोलले नाहीत, ह्यापेक्षा त्यांनी स्वदेशी परतल्यावर स्वकीयांना काय निवेदन केले, ते तरी आपण अभ्यासायला हवे. कारण त्यांच्या येथील बोलण्यातल्या खाचाखोचा समजण्याइतकी आपल्यापैकी कित्येकांची मानसिक तयारीच नाही.

---


# दि बँक ऑफ कराड लि.

–कराड–

(शेड्यूल्ड बँक)

(रजिस्टर्ड ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड)

शाखा : मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटे, कोल्हापूर, मलकापूर व भोर

ठेवींवरील व्याजाचे दर

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव | ४ | टक्के |
| १ वर्ष ते २ वर्षांपर्यंत | ६ | टक्के |
| २ वर्षे ते ३ वर्षांपर्यंत | ६½ | टक्के |
| ३ वर्षे ते ५ वर्षांपर्यंत | ७ | टक्के |
| ५ वर्षे ते ६ वर्षांपर्यंत | ७½ | टक्के |
| ६ वर्षांवरील | ७½ | टक्के |

कराड येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे. तसेच इस्लामपूर व तासगाव येथे सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

म. वि. खंडकर, चेअरमन



ही दीपावली, आमच्या सर्व सभासदांस, ठेवीदारांस व ग्राहकांस आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो हीच शुभेच्छा.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याची, त्यांच्या आर्थिक प्रगतीस व विकास कार्यात मदत करीत असलेली व ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेली......

## नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, नासिक

केंद्र कार्यालय, नासिक-आग्रारोड, नासिक-१

—(शाखा ४९)—

बँकेच्या केंद्र कार्यालयाचे इमारतीत सुरू करण्यात आलेल्या सेफ डिपॉझिट लॉकर्स व्यवस्थेचा अवश्य फायदा घ्या.

तु. मो. सोनवणे — मॅनेजर
त्र्यं. रा. पाटील (पवार) — व्हा. चेअरमन
मा. त्र्यं. पाटील — चेअरमन

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नासिक

# गिऱ्हाइकांच्या तक्रारींचे स्वागत करून दखल घ्या

## रुसवे घालविण्याचे तंत्र शिका

बँकेच्या गिऱ्हाइकांनी केलेल्या तक्रारीमुळे चालकांना नेहमीच फार चिंता वाटते आणि बँकांत काम करणारा नोकरवर्ग त्यांच्यामुळे डिवचला जातो. बँकेच्या कौंटरवर बसणाऱ्या स्त्री-पुरुष नोकरांपासून तो तहत जनरल मॅनेजरपर्यंत प्रत्येकजण तक्रारींना जागा राहू नये म्हणून पराकाष्ठा करीत असतांनासुद्धा एखादी तक्रार करण्यात आली तर त्याबद्दल चीड येणे मनुष्य स्वभावाला धरूनच होईल. परंतु, एखाद्या वेळी एखादा त्रासलेला अगर थ्यालेला कारकून तक्रारीची नीट दखल घेत नाही; आणि त्याच्या ह्या वागण्यामुळे एखाद्या क्षुल्लक तक्रारीचा मोठा बाऊ होऊन बसतो. परिणामी, बँकेच्या संघटनेचे मनापासूनचे प्रयत्नही अपुरे पडल्यासारखे दिसतात. तक्रारी ह्या गिऱ्हाइकांच्या असमाधानाच्या द्योतक असू शकतात; किंवा गिऱ्हाइकांच्या अस्वस्थ मनाचे प्रतिबिंबही असू शकतात; त्यांचे स्वरूप कसेही असले तरी त्यांची गंभीरपणे दखल घेतली गेली पाहिजे. तुमच्या दृष्टीने एखादी तक्रार अगदी किरकोळ असेलही. तरीसुद्धा तिचे निराकरण करतांना निष्काळजीपणा दिसता कामा नये. ती तक्रार तुम्हाला कितीही क्षुल्लक वाटत असली तरी गिऱ्हाइकांच्या दृष्टीने ती डोंगराएवढी मोठी असू शकेल. एखादी चूक अशी असते की तिची दुरुस्ती थोड्याशा कौशल्याने अगदी सहज करता येते. तरी पण ती किरकोळ आहे, असे गिऱ्हाइकाला वाटता कामा नये. गिऱ्हाइकांची सगळीच नाखुषी खरी असते असे नाही. नाखुषीची पुष्कळशी कारणे अतीरंजितच असतात. कांही वेळा तर ती कल्पनासृष्टीतीलच असतात. कांही तर मुद्दाम बनविलेलीही असतात. तरी सुद्धा कंपनीचे हित लक्षांत घेऊन अत्यंत चांगल्या रीतीने नाखुषीच्या कारणांचे निराकरण करण्यात आले पाहिजे.

### तक्रार : असंतोषाची निशाणी

कांही जण असे म्हणतील की बहुसंख्य गिऱ्हाइके जर तक्रारी करत नसतील तर एखाद्दुसऱ्याने केलेल्या तक्रारीबद्दल चिंता करण्याचे कारण काय ? पण असे म्हणून चालणार नाही. हिमनगाचा एकदशांश भागच पाण्यावर दिसतो. नऊ दशांश भाग पाण्याखालीच असतो. त्याप्रमाणे एखादी तक्रार सुद्धा न दिसणाऱ्या असंतोषाची निशाणी असू शकेल. एखाद्या गिऱ्हाइकाचा बँकेशी असलेला संबंध फारसा लाभदायक नसेल पण म्हणून त्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष होता कामा नये. कंपनीशी व्यवहार करणाऱ्या प्रत्येकाला आपले काम महत्त्वाचे वाटते आणि ते बरोबरही आहे. त्याच्या तक्रारीची योग्य ती दाद काळजीपूर्वक घेण्यात आली तर तो नेहमी तुमच्या पाठीशी उभा राहील. धंदा वाढविण्याची हीच चांगली रीत आहे. नेहमीची गिऱ्हाइके ही कंपनीचा सर्वात चांगला मित्रपरिवार असतो. त्यांना राजी राखण्यासाठी तक्रारींना जागाच देऊ नये. कंपनीच्या कामकाजाबद्दल त्यांचा आदर आणि विश्वास वाढला पाहिजे; तरच कंपनीचा पाया भक्कम होऊ शकतो. तक्रारी ज्यामुळे उद्भवतात अशा गोष्टी घडूच न देणे हा तक्रारी हाताळण्याचा सर्वात चांगला मार्ग आहे. रास्त तक्रारीला कारणच न देण्याची काळजी घेणे हे सर्वात उत्तम. गिऱ्हाइकांच्या हिताचा विचार करणे हा कंपनीच्या हिताच्या संरक्षणाचा सर्वात चांगला उपाय आहे. सर्वच धंद्यांचे हे प्रमुख तत्त्व आहे.

### तक्रारी उद्भवू देऊ नका

प्रत्येकाला आपल्या कामाचे तंत्र तर अवगत असलेच पाहिजे; पण तेवढ्याने भागणार नाही. दैनंदिन किमान कामापलीकडील अधिक माहितीही त्याला असणे आवश्यक आहे. कंपनीच्या धोरणाची त्याला समज हवी. शिवाय आपल्या खात्याच्या इतर खात्यांशी असलेल्या संबंधाची जाणीवही असली पाहिजे. अशी जाणीव असेल तर त्याला व्यवहारांचे परस्पर संबंध नीट समजतात आणि त्यांची दिशा कळते. अर्थातच प्रश्नांच्या सोडवणुकीचे काम सोपे होते. गिऱ्हाइकांच्या गरजा आणि अपेक्षा ह्यांचे ज्ञान त्याने करून घेतले पाहिजे. कारण, समाधानी गिऱ्हाइकांमुळेच धंद्याला यशाचा लाभ होतो. गिऱ्हाइकाची मजल तक्रार करण्यापर्यंत जायच्या आतच त्याच्या असमाधानचा वास तुम्हाला आला पाहिजे. निदान तसा प्रयत्न करण्यात आला पाहिजे. गिऱ्हाइकाच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो मार्गच स्वीकारण्यात येत आहे अशी तुमची खात्री गिऱ्हाइकाला पटली पाहिजे. प्रत्येक वेळी त्याला असे वाटले पाहिजे की त्याला भरपूर महत्त्व देण्यात येत आहे. सध्याचे युग दुसऱ्यांच्या विचारांना महत्त्व देण्याचे आहे. तरी सुद्धा जुन्या सवयीच्या बऱ्याच लोकांना असे वाटते की गिऱ्हाइकाला त्याच्या पैशाचा मोबदला दिला, त्याची सेवा तत्परतेने, चतुराईने केली म्हणजे झाले. जुनी गिऱ्हाइके टिकविण्याचा व नवीन मिळविण्याचा हाच राजमार्ग आहे असे त्यांना वाटते. परंतु गिऱ्हाइक तुमच्या नेहमीच्या मामुली कार्यक्षमतेकडे फारसे लक्ष देत नाही. ती तो गृहीतच धरतो. त्यापलीकडे जाऊन गिऱ्हाइकाच्या हिताची खरी कळकळ, त्याविषयीची आस्था आणि समज, गिऱ्हाइकाची जास्तीत जास्त सेवा करण्याची इच्छा, संबंधित ज्ञान, ह्यांचीही अपेक्षा करण्यात येत असते. गिऱ्हाइकांशी वागण्याची रीत म्हणजे प्रसंगानुरूप चढविलेला पोषाख नाही. तुमच्या अंगातील गुणाने बनलेले तुमचे व्यक्तित्वच गिऱ्हाइकांशी वागता-बोलताना साकार झालेले असले पाहिजे. ह्या गुणांत ज्ञान, कुशलता आणि प्रांजळपणा हे महत्त्वाचे

आहेत. काही लोकांना व्यक्तित्व म्हणजे मामुली सौजन्य असे वाटते. पण तसे नाही. गिऱ्हाइकाचे स्वागत करताना ज्या हास्याची अपेक्षा असते ते हास्य काम करणाऱ्याने केवळ सवयीने केलेले असता कामा नये. गिऱ्हाइकांना मदत करण्यात होणाऱ्या संतोषात, कंपनीच्या प्रामाणिकपणाच्या आत्मविश्वासात आणि सेवा करण्याच्या पात्रतेत त्याचा उगम झालेला असला पाहिजे. गिऱ्हाइकांना अशा पद्धतीने वागविण्यात आले तर त्यांना तक्रार करण्याचे कारणच पडणार नाही.

### तक्रारींना महत्त्व आहे

जेव्हा जेव्हा तक्रारी करण्यात येतात तेव्हा तेव्हा विधायक पद्धतीने धंद्याची घडण करण्याच्या संधीच प्राप्त होत असतात. ज्या कामाबद्दल फारशी आस्था वाटत नाही अशा कामाचे गोड भाषेत वर्णन करण्याचा हा प्रकार आहे असे मात्र नाही. ते एक पूर्ण सत्य आहे. तुमच्या स्नेहभावामुळे, आस्थेमुळे आणि अवधानामुळे एखाद्या नाखुष गिऱ्हाइकाचा रुसवा घालवून त्याला सुखी करण्यापेक्षा अधिक समाधान कशात लाभू शकेल? तक्रार कोणतीही असली तरी गिऱ्हाइक आणि कंपनी ह्यांच्यामधील सदिच्छा वाढीस लागेल अशा तऱ्हेने तिचे निराकरण करणे शक्य असते. रोजच्या व्यवहारातील कार्यक्षमता वाढविण्यास कोठे आणि कसा वाव आहे त्याचा बोध होण्यास तक्रारींचा चांगला उपयोग होतो. सुधारणा करण्यास नेहमीच जागा असते हा नियम धंद्यातील मूलभूत स्वरुपाचा नियम आहे. तुमच्या धंदेवाईक संघटनेतील एखाद्या कच्च्या दुव्याकडे तक्रारीमुळे लक्ष जाते आणि मग तुमच्या उत्पादनात, सेवेत आणि लोकमतात सुधारणा करण्याची संधी तुम्हाला मिळते. म्हणूनच अगदी भित्री माणसे सोडली तर तक्रारींचे सर्व जण स्वागतच करतात. एखादी तक्रार तुमच्यापुढे आली तर शांतपणे तिचा स्वीकार करा, खरी वस्तुस्थिती स्पष्ट करून घ्या आणि तिचा तारतम्याने विचार करा. कोठल्याही गिऱ्हाइकाला धुडकावून लावू नका अगर हास्यास्पद ठरवू नका अगर त्याची उपेक्षा करू नका. थिल्लरपणाचा काही उपयोग होणार नाही.

### माफी मागा; चूक सुधारा

'चुका करणे हा मानवी स्वभाव आहे' अशा प्रकारची बोधवचने त्याला ऐकवून त्याची टीका सांदें उडवून डावलू नका. त्यामुळे त्याचे समाधान होणार नाही. उडवाउडवी आणि चुकवाचुकवी मुळांतच खोटी असतात; ती उघडी पडतातच. 'कंपनीचे धोरण' अगर 'नेहमीची कार्यपद्धती' अशा फसव्या शब्दप्रयोगामागे दडू नका. त्यामुळे गिऱ्हाईक उलट चिडेल. त्याला असल्या अबोध शब्दांची पर्वा वाटत नाही. त्याच्या तक्रारीची दाद घेऊन तिचे निराकरण करण्यास तुम्ही तयार आहा का नाहीं, एवढेच त्याला जाणावयाचे असते. तुम्ही अगर तुमच्या कंपनीने एखादी चूक केली असेल तर सरळ


"ब्रिटिश राजवटीत सहकारी म्हणून केवळ शेतकऱ्यांचा कारखाना कायद्याने रजिस्टर करता आला नाही तरी भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना कोणता असे मला कोणी विचारले तर मी सासवड शुगर फॅक्टरीचा उल्लेख करीन" —नामदार यशवंतराव चव्हाण

(रौप्यमहोत्सव समारंभातील भाषण १९५९)

सहकारी तत्त्वावर एकत्रित येऊन शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीचा
शेतकऱ्यांनी चालविलेला भारतातील पहिला

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, जि. सोलापूर

हा साखर कारखाना आता

दि सासवड माळी सहकारी साखर कारखाना लि.

म्हणून रजिस्टर होत आहे.

ही घोषणा दिवाळी निमित्त करताना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

संचालक मंडळ

चेअरमन
श्री. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे
श्री. हरिभाऊ बळवंतराव गिरमे, संचालक
श्री. भगवंतराव गेनूजी गिरमे, संचालक
श्री. शंकरराव भाऊराव राऊत, संचालक

व्हा. चेअरमन
श्री. विजयराव नारायणराव बोरावके
श्री. कृष्णाजी लक्ष्मणराव गिरमे, संचालक
श्री. चंद्रकांत शंकरराव कुदळे, संचालक B. Sc. Agri. (Hons), LL. B.
श्री. शंकरराव मारुतिराव गिरमे, संचालक

श्री. व्ही. एल. तनपुरे, B. A. (Hons), फॅक्टरी मॅनेजर

माफी मागणेच उचित होईल. अशा वेळी काही हातचे राखून न ठेवता दिलगिरी व्यक्त करण्यास अनमान करू नका. चटदिशी चूक सुधारून घ्या; आणि तीही स्नेह भावनेने. चूक कुरकुरत सुधारली तर ती न सुधारल्यासारखीच होते. कारण, चूक सुधारण्याचा महत्त्वाचा उद्देश गिऱ्हाइकाची सदिच्छा टिकविण्याचा आणि वाढविण्याचा असतो. सुधारणा करण्यास उशीर लागणार असेल तसा खुलासा करा. तक्रारीची पोच न देणे ही फार मोठी चूक आहे. त्यामुळे तक्रार करणाऱ्याला ती मनात घोळविण्यास वेळ मिळतो आणि दुखावलेल्या भावनांना प्रमाणाबाहेर महत्त्व देण्यास तो प्रवृत्त होतो. तक्रार कितीही अयोग्य असली तरी तिची जाणीव दाखविताना घाई अगर त्रासिकपणा दाखवू नका. अयोग्य तक्रारीसुद्धा शांत चित्ताने हाताळण्यात आल्या पाहिजेत.

### तक्रारींची वासलात

धंदा करणाऱ्या कंपनीचे लोकांशी व दुसऱ्या कंपन्यांशी संबंध येत असतात. ह्या संबंधाविषयीचे धोरण ठरलेले असले पाहिजे. विशेषतः तक्रारीसंबंधीचे धोरण असे असले पाहिजे की त्यात गिऱ्हाइकांची सेवा करण्याची भावना स्पष्टपणे दिसली पाहिजे. ह्या धोरणाला पर्याय फक्त धंदा गमावण्याचाच आहे. पण तक्रारीसंबंधी उगीच गुंतागुंतीची कार्यपद्धती नसावी. ती सोपी असावी. मात्र कंपनीतील पर्यवेक्षकांनी नवीन येणाऱ्या नोकरांना मधून मधून हे स्पष्ट करावे की गिऱ्हाइकांशी चांगले वागण्यास कंपनी सर्वात अधिक महत्त्व देते. मग काही मूलभूत नियम घालून देण्यात यावेत आणि प्रत्येक नोकराला त्याच्या जबाबदारीच्या क्षेत्राची जाणीव करून देण्यात यावी. तक्रारीकडे लक्ष देण्याचे शिक्षण नोकरांना देण्याची व्यवस्था नसणे अदूरदर्शीपणाचे आहे. किंबहुना ते आंधळेपणाच होईल. एखाद्या कनिष्ठ नोकराकडे तक्रार करण्यात आली असली आणि त्याला जर शिक्षण मिळालेले असेल तर तो चूक दुरुस्त करू शकतो; त्याने तसे केलेही पाहिजे. पण बाब त्याच्या अधिकाराच्या बाहेरची असेल, अगर त्याच्या कुवतीपलीकडची असेल तर त्याने ती आपल्या वरिष्ठाकडे न्यावी. कनिष्ठाने तक्रार उडवून लावली तर तक्रार करणारा ती वरिष्ठ पातळीवर पोचविण्याचा प्रयत्न करील. मग तक्रारीचे मूळचे स्वरूप तर कायम राहतेच; पण शिवाय कनिष्ठाविरुद्ध अकार्यक्षमतेच्या आक्षेपात आणि वरिष्ठाविरुद्ध केलेल्या टीकेत तिचे रूपांतर होते. प्रत्येक तक्रार ही विधायक सेवा करण्याची संधी आहे असे समजून तिचे स्वागत करण्यात आले पाहिजे, ही गोष्ट चालकांनी नोकरांना स्पष्ट केली पाहिजे. तक्रार करणाऱ्याला नोकरांनी सहानुभूती दाखविली पाहिजे. आपल्याला गैरवागणूक मिळाली अशी भावना झाल्यासेरीज तक्रार करणारा उगाच श्रम घेणार नाही ह्याची जाणीव नोकरांनी ठेवली पाहिजे. तक्रारीची पूर्ण चौकशी करण्याची एकदम तयारी दाखवा आणि चूक दुरुस्त करा. खरी परिस्थिती नीट समजून घ्या. नुकसानीची कल्पना करून घ्या. वाद घालू नका. गिऱ्हाइक अप्रामाणिक आहे अगर निष्काळजी आहे असे चुकूनसुद्धा भासवू नका. गिऱ्हाईक जर बरोबर असेल तर चुकीची दुरुस्ती चटकन आणि सौजन्याने करा. गिऱ्हाइकाची चूक असेल तर तुमचा निर्णय त्याला सोप्या रीतीने कारणासहित समजावून सांगा. अशा वागण्याने तुम्ही तुमची व्यथा तर प्रकट करताच पण शिवाय गिऱ्हाइकांच्या न्यायबुद्धीलाही आवाहन करता.

### विधायक वृत्ती ठेवा

नेहमी विधायक वृत्ती ठेवा. तक्रार करणाऱ्याचा मान राखा आणि त्याच्या बोलण्याकडे लक्ष द्या. त्यामुळे त्याच्या अहंकाराचा पारा खाली येतो आणि तो तुमच्याशी सहमत होणे सुलभ होते. वावदूकपणा, हुषारीचा आविर्भाव, टीकाकाराला कमी लेखणे, त्रासिकपणा, ह्या गोष्टी टाळा. असे केले तर एरव्ही एखादी अशक्य असलेल्या विनंतीची सुद्धा चर्चा करून उभयतांना समाधानकारक रीत्या वासलात लावता येते असे आढळून येईल. तुम्ही सुचविलेली एखादी सूचना गिऱ्हाइकाला पसंत नसेल तर दुसरा पर्याय शोधा. अर्थात कंपनीचे नुकसान न होता गिऱ्हाइकाचा मान राखण्याची दक्षता मात्र घेण्यात आली पाहिजे. एखादी अशक्य वाटणारी मागणीही गिऱ्हाइकांच्या म्हणण्याला योग्य मान देऊन नाकारता येणार नाही असे नाही. नव्हे, नकार देताना असाच प्रयत्न व्हावयास पाहिजे. कटुता उत्पन्न न करता हे साध्य करता आले तर गिऱ्हाइकाला कंपनीशी व्यवहार करावा असे वाटत राहण्याची शक्यता असते. तुमची वागणूक नेहमी सभ्यपणाची व सौजन्याची असली पाहिजे. दुसरा धसमुसळेपणाने वागला म्हणून तुम्ही तसे वागता कामा नये. धोरणी वागणूक आणि सौजन्य ह्यामुळे तक्रारीचा जोर ओसरतो. प्रकरण दर वेळेला मिटेलच असे नाही; पण मिटण्यास मदत तरी खासच होईल. तक्रारीसंबंधीची तुमची बाजू मांडताना ती बेताबाताने मांडा. उगाच आरडाओरडा करू नका. शांत युक्तिवादाचाच अधिक परिणाम होतो हे लक्षात ठेवा. धंद्यात अगर व्यवसायात ज्याला यश मिळवावयाचे असेल त्याला ह्या गोष्टींना महत्त्व द्यावेच लागते.

धोरणीपणाने वागण्याची कला ही सर्व कलांची कला आहे. त्यासाठी परिस्थितीची अचूक पारख करून कृती करण्याची हातोटी साधली पाहिजे. शिवाय दुसऱ्याच्या म्हणण्याचा विचार करण्याची वृत्ती व प्रसंगानुरूप उक्ती व कृतीही करता आली पाहिजे. तक्रारीची दखल आणि निवारण पत्रव्यवहाराने करतानाही ह्याच तत्त्वांचा आश्रय घेण्यात आला पाहिजे. नाही तर गिऱ्हाईक प्रत्यक्ष हजर नसल्यामुळे गैरसमज उत्पन्न होण्यास आणि वाढण्यास वाव मिळत राहतो.

---

# इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

स्थापना ७ फेब्रुवारी १९६३ टेलिफोन नं. २१९१

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ४,६७,५५० |
| राखीव इतर निधी | रु. ३,००,४१२ |
| ठेवी | रु. ६६,४०,५४५ |
| खेळते भांडवल | रु. ८४,४४,२५० |

केवळ आठ वर्षांचे अल्पावधितील प्रगती

★ स्वतःची पाच मजली भव्य इमारत

★ लघु उद्योगधंद्यांना संपूर्ण पतपुरवठा या ध्येयास वाहून घेतले आहे.

★ ठेवींवर आकर्षक व्याज दिले जाते.

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा :

आर. पी. कुलकर्णी, मॅनेजर
के. बी. आवाडे, चेअरमन

# ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे

दूरध्वनी क्रमांक ५९३८३६ ५९३०१४
तार : "ठाणकोबँक"
केंद्र कार्यालय : १५/४ छत्रपती शिवाजी पथ, ठाणे.

शाखा २८

जुन, १९७० अखेरची सांपत्तिक परिस्थिती

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ५७·०० लाख |
| ठेवी | ... | रु. ३५७·०० लाख |
| गुंतवणूक | ... | रु. ९०·०० लाख |
| कर्ज | ... | रु. ३५३·०० लाख |
| खेळते भांडवल | ... | रु. ४९०·०० लाख |

बँकिंगची सर्व प्रकारची सेवा तत्परतेने केली जाते.

ना. पां. हसमनीस, मॅनेजर
वि. द. खाडे, व्हा. चेअरमन
मा. प. मेहेर, चेअरमन

"सहकार ही देशाच्या भरभराटीच्या यशाची गुरुकिल्ली"

# दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, बीड

*केंद्र कार्यालय : ( चंपावती ) बीड*

तार :-"बीड बँक" पोस्ट बॉक्स नंबर १२ फोन नंबर ३५

सहर्ष जाहीर करीत आहोत, नवीन क्षितीजे

सहकारी तत्त्वावर जिल्ह्यात साखर कारखाने उभारणीबाबत आणि इतर अनुषंगिक जोड व्यवसायाचा योजनाबद्ध कार्यक्रम

( आकडे लाखांत )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ... | ... | ... | १००·०० |
| वसूल भाग भांडवल | ... | ... | ... | ८०·७५ |
| गंगाजळी व इतर निधी | ... | ... | ... | १७·८२ |
| ठेवी | ... | ... | ... | २१६·३५ |
| खेळते भांडवल | ... | ... | ... | ४९८·०० |

आपल्या ३२ शाखांच्या मार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार करीत असलेली व जिल्ह्यातील शेतकऱ्यांची एकमेव आधारस्थान असलेली ही बँक म्हणजेच सहकाराचा शिरोमणी.

## दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड

मुख्य कार्यालय ( चंपावती ) बीड

ना. वि. पांडे, बी. ए. व्यवस्थापक
श्री. श्रीपतराव कदम, बी. ए. एलएल. बी. ( ॲडव्होकेट ) अध्यक्ष

# कुटुंबनियोजनाच्या पाच वर्षांची फलश्रुती

## यशापयश ठरविण्याचे गमक कोणते ?

*संततिप्रतिबंधक साधनांच्या वापराचा प्रसार करून दरहजारी जननाची संख्या मर्यादित प्रमाणात कमी करता येते. परंतु जननाचे दरहजारी प्रमाण ठरविण्यात इतर अनेक कारणे काम करीत असतात. दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने त्यांचाही विचार कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात करण्यात आला पाहिजे.*

हिंदमधील कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला कितपत यश आले आहे असा प्रश्न केला तर त्याचे उत्तर देणे कठीण आहे. पण ह्या प्रश्नाविषयी अनेकांना आस्था आहे ह्यात मात्र शंका नाही. काहींचे म्हणणे असे आहे की कार्यक्रमाला यावे तसे यश आलेले नाही. नजरेसमोर ठेवलेली उद्दिष्टे पूर्णतेने साध्य झालेली नाहीत. उलटपक्षी, अवघ्या ४ वर्षांच्या अवधीत जननक्षम जोडप्यांपैकी १० ते १२ टक्के जोडपी कुटुंबनियोजनाच्या कक्षेत आणण्यात आली ही काही लहानसहान कामगिरी नाही, असेही काही जण म्हणतात.

### टीकाकारांची टीका

टीकाकारांचे म्हणणे असे आहे की कुटुंबनियोजनावरील वार्षिक खर्चात वाढ होत चालली आहे; पण प्रत्यक्ष काम मात्र कमी होत चालले आहे. ह्या टीकेला उत्तर देताना कार्यक्रमाच्या बाजूने बोलणारे असे प्रत्युत्तर देतात की ह्या खर्चापैकी बराचसा खर्च कार्यक्रमाच्या प्राथमिक तयारीवर होत आहे. कार्यक्रमासाठी माणसे तयार करणे, त्यांना शिक्षण देणे, इस्पितळांच्या इमारती बांधणे आणि इतर अनुषंगिक कामे ह्यांवर सध्या पैसा खर्च होत आहे. ह्या खर्चापासून होणाऱ्या फलनिष्पत्तीला निदान ५ ते १० वर्षांचा काळ लागणे अपरिहार्यच आहे. म्हणून ह्या खर्चाबद्दल कुरकुरून चालणार नाही. कार्यक्रमाचे टीकाकार असेही म्हणतात की कार्यक्रम अमलात येत असून सुद्धा भारतातील जननाचे प्रमाण कमी झालेले नाही. उलट, लोकसंख्येच्या वाढीचा वेग वाढतच चालला आहे. ह्यावर कार्यक्रमाची तरफदारी करताना असे सांगण्यात येते की भारतामधील जननाच्या दराचे आकडे इतके अपूर्ण आहेत की जननाच्या प्रमाणात झालेली वाढ अगर घट सिद्ध करून दाखविता येणे अवघड आहे. म्हणून कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करताना भावी मुलांची जी जननसंख्या टाळण्यात आली तिचा अधिक प्रामुख्याने विचार झाला पाहिजे. केवळ जननाच्या दराचा विचार करून चालणार नाही. लोकसंख्या शास्त्राचे अभ्यासक आणखीही एका मुद्याचा निर्देश करतात. ते म्हणतात की भारताची लोकसंख्या वाढण्याचा दर अधिक होत आहे, हे खरे आहे. परंतु त्याचे कारण जननाचा दर आणि मृत्यूचा दर ह्यांच्यामधील रुंदावत जाणारी तफावत हे आहे. मृत्यूचे प्रमाण झपाट्याने कमी झाल्याने जननाचे प्रमाण वाढल्यासारखे दिसते. खरे तर कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम अंगिकारला नसता तर जननाचा दर आणि अर्थातच जननाच्या वाढीचा दर आहे ह्यापेक्षाही अधिक झालेला दिसला असता. कुटुंबनियोजनाच्या प्रचारामुळे कुटुंबातील व्यक्तींची संख्या मर्यादित ठेवता येणे शक्य आहे ह्याची जागीव लोकांना पूर्वीच्या मानाने कितीतरी अधिक झाली आहे.


### धोरणा पूर्वीच स्वीकारले; मोहीम नवी

जिल्ह्याजिल्ह्यातून, प्राथमिक केंद्रातून आणि उपकेंद्रातून लागणाऱ्या अनेक प्रकारच्या प्रशिक्षित लोकांची संख्या ज्या मानाने उपलब्ध होत जाईल त्या मानाने कुटुंबनियोजनासाठी येणाऱ्या लोकांच्या संख्येतही वाढ होत जाईल. मतामतांच्या ह्या गलबल्यात सामान्य माणूस गोंधळून गेल्यास नवल नाही. अविकसित देशांतील कुटुंबनियोजनाची मोहीम अगदी अलिकडची आहे. तिला प्रारंभ होऊन सहा वर्षांपेक्षा अधिक काळ लोटलेला नाही. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाने युरोपमधील प्रगत देशात आणि उत्तर अमेरिकेत १९व्या शतकातच मूळ धरले. ह्या उलट, विकसनशील देशांनी हे धोरण १९६४ सालानंतर स्वीकारले. भारताने १९५० मध्येच कुटुंबनियोजनाला पोषक असे धोरण स्वीकारले हे खरे असले तरी १९६५ साली कार्यक्रमाचा प्रारंभ विशेष जोराने करण्यात आला हे लक्षात घेतले पाहिजे. त्यावर्षी कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाकडे केवळ वैद्यकीय दृष्टीने न पाहता अधिकाधिक लोकांत ह्या कार्यक्रमाचा प्रसार करण्याची दृष्टी स्वीकारण्यात आली. लोकांनी अपत्यांच्या नियंत्रणात वाढत्या संख्येने सामील व्हावे म्हणून त्यांना जागे करण्यासाठी प्रचारकांच्या मोठ्या प्रमाणात नेमणुका करण्यात आल्या. त्यांनी प्राथमिक केंद्रांतून आणि उपकेंद्रांतून काम करण्यास प्रारंभ केला.


### प्रचाराचा दृश्य परिणाम

सरकारी यंत्रणा प्रत्येक पातळीवर अधिक बळकट करण्यात आली. खेडेगावांत प्रथमच कुटुंबनियोजनाचे लोण पोचविण्यात आले. त्याचा परिणाम ताबडतोब दिसून येऊ लागला. १९६५–६६ पूर्वीच्या १० वर्षांत फार तर १० लाख नीर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. पुढील पाच वर्षांत म्हणजे १९६५–६६ ते १९६९–७० ह्या अवधित ५७ लाख शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याशिवाय ३० लाख स्त्रियांनी संततिनिरोधक

आमच्या हितचिंतकांस ही दिवाळी आणि नवे वर्ष सुखाचे जावो !




इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.



कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३१ तार : Vijayplow



**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह मा. लि. [ तार–सरदारगृह

. क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.






**GADRE BROTHERS**

**ENGINEERS & FOUNDERS**

**MADHAVNAGAR (S. Rly.)**

Phone : 318 Gram : 'SEWA

@Sangli Madhavnagar

उपाय स्वतः वर करून घेतले. त्याशिवाय आणखी १० लाख लोक नेहमीची संततिनिरोधक साधने वापरीत आहेत आणि २५ लाख लोक निरोध वापरत आहेत. ह्याचाच अर्थ असा की देशांतील १० कोटी जननक्षम जोडप्यांपैकी १० ते १२ टक्के जोडपी गेल्या पाच वर्षांत कुटुंबनियोजनाच्या प्रत्यक्ष कक्षेत आली आहेत. केवळ संख्येच्या दृष्टीने पाहिले तर विकसनशील देशांत भारताचे कार्य सर्वांत अधिक आहे. परंतु एकूण लोकसंख्येशी कुटुंबनियोजनात सामील झालेल्या लोकांच्या प्रमाणाच्या दृष्टीने पाहता कोरिआ, तवान, हाँगकाँग व पाकिस्तानसारखे काही छोटे देश भारताच्या पुढे आहेत. तरीसुद्धा निर्बीजीकरणाऱ्या शस्त्रक्रियेच्या बाबतीत भारताचे कार्य तुलनेने खूपच अधिक आहे. गेल्या दोन वर्षांत 'निरोध' ह्या साधनाच्या प्रसाराच्या बाबतीत खूपच वेगाने प्रगती झाली आहे. नित्योपयोगी वस्तू तयार करणाऱ्या काही खाजगी मालकीच्या कंपन्यांचे ह्या बाबतीत चांगले साह्य झाले आहे. ब्रुक बाँड, हिंदुस्थान लिव्हर, इंपीरियल टोबॅको, लिप्टन, टाटा ऑइल, युनिअन कार्बाइड, इत्यादी कंपन्यांच्या विक्रीच्या मोठ्या संघटना आहेत. त्यांचा फायदा घेऊन निरोधाच्या वाटपाचे कार्य सार्वजनिक सेवा म्हणून करण्यात येत आहे.

### साधनांच्या वाटपाची संघटित व्यवस्था

दहाहजार अगर अधिक लोकसंख्या असलेल्या गावांतून ह्या साधनांचे वाटप सुरळीत सुरू आहे. पाच ते दहा हजार लोकवस्ती असलेली काही गावेही वाटपाच्या कक्षेत आणलेली आहेत. साधने लोकांना देण्यासाठी १,५०,००० केंद्रे आहेत. त्यामुळे मागणी असेल तर कोठल्याही खेडेगावात निरोध साधने पुरविण्याची व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. साधने पुरविणाऱ्या केंद्रात वाढ करण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत. जानेवारी १९७१ पर्यंत अशा केंद्रांची संख्या २ लाखापर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. 'निरोध' साधनांचा स्वीकार करणारांची संख्या वाढत चालली आहे. हे साधन उपलब्ध नव्हते तेव्हा संततिप्रतिबंधक उपायांचे स्वागत करणारांची संख्या दरमहा अंदाजे २ लाख, ८० हजारांच्या आसपास होती. आता त्यांची संख्या दरमहा ८ लाखांपर्यंत वाढलेली आहे. शिवाय हे साधन मुंबईसारख्या शहरातील रेल्वे फलाटावरील केंद्रांतून मोफत वाटण्याचीही सोय करण्यात आली आहे. सरकारी आकड्याप्रमाणे १९६९-७० साली ७ ते ८ कोटी निरोध साधने वाटण्यात आली. ही साधने वाटण्याची संघटित व्यवस्था करण्यात आल्यामुळे लोकांची मागणी ज्या मानाने वाढेल त्या मानाने वाटप करता येणे शक्य झालेले आहे. ह्या साधनाचा प्रसार दुपटीने वाढविता येणे फारसे अवघड जाणार नाही.

### काही अडचणी

असे असले तरी सरकारने ठरविलेली उद्दिष्टे गाठण्याच्या बाबतीत कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला अपयश आलेले आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. ह्या अपयशाचे एक कारण म्हणजे पुरेशा वैद्यकीय सेवकांचा अभाव. शहरातील कुटुंब नियोजन केंद्रांत काम करण्यास जरूर तितकी माणसे उपलब्ध झालेली आहेत. शहरांतील केंद्रांपैकी ९६ टक्के केंद्रे पुरेशा नोकरांच्या साह्याने काम करीत आहेत. परंतु ग्रामीण भागांतील केंद्रात वैद्यकीय नोकरांचा पुरेसा पुरवठा अजून झालेला नाही. तथापि १९६९-७० सालात जरूर तो नोकर वर्ग मिळविण्याच्या बाबतीत बरीच प्रगती झालेली आहे. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात आता ८२५ डॉक्टर्स, ४ हजार माहिती देणारे प्रशिक्षित, २ हजार महिला हेल्थ व्हिजिटर्स, २० हजार दुय्यम सेवक आणि २५ हजार दाया काम करीत आहेत. पण अजूनही ५०० प्राथमिक केंद्रांना डॉक्टर्सची वाण भासत आहे. शिवाय शक्यतर ४,००० स्त्री-डॉक्टरांची आणि त्यांच्या दुप्पट स्त्री-आरोग्य निरीक्षकांची व दायांची किमान गरज आहे. ही माणसे मिळण्यासाठी पैसा कमी पडत आहे अगर नोकरांच्या जागा भरण्याची सरकारला इच्छा नाही असे नाही. ज्या परिस्थितीवर सरकारचे नियंत्रण चालू शकत नाही अशा परिस्थितीमुळे प्रशिक्षित माणसांचा हा तुटवडा पडला आहे. एकतर प्रशिक्षित सेवकांचा मुळातच तुटवडा आहे. डॉक्टर्स, दाया आणि इतर नोकर ग्रामीण भागात काम करण्यास उत्सुक नसतात. कारण तेथे शहरांतील आधुनिक सोयी फारच अल्प प्रमाणात असतात उपलब्ध असतात अगर नसतात सुद्धा. काही राज्य सरकारे ग्रामीण भागांतील काम अधिक आकर्षक करण्याची खटपट करीत आहेत. काही सरकारे ग्रामीणभत्ता म्हणून दरमहा ५० ते १०० रुपये देण्यास व पगाराच्या एकतृतियांश रक्कम खाजगी धंदा न करण्याच्या अटीवर देण्यास तयार आहे. कधीकधी राहण्याची मोफत जागा अगर ती मिळत नसेल तेथे पगाराच्या १०० टक्के भत्ता देण्याचीही तयारी दाखविण्यात येत आहे. प्रत्येक विकासगटातील कुटुंबनियोजन शाखेसाठी आणि त्यात काम करणाऱ्या नोकरांसाठी इमारती बांधण्यासही भारत सरकारने मंजुरी दिली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभी ४,३०० कुटुंबनियोजन केंद्रे व १०,३५० उपकेंद्रे होती. त्यांपैकी फारच थोड्या केंद्रांना व उपकेंद्रांना स्वतःच्या इमारती होत्या. इमारतींच्या तुटवड्यांची ही अवघड परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने ४०० कोटी रुपये येणारी बांधकाम योजना हाती घेतली आहे.

### कार्यकर्त्यांना संधी

प्रशिक्षित नोकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षणाच्या सोयींतही विस्तार करण्यात येत आहे. तरीसुद्धा प्रशिक्षित माणसांची टंचाई चालूच राहण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपुढारी आणि राजकीय कार्यकर्ते ह्यांना ही चांगली संधी आहे. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम लोकप्रिय करण्याच्या कामात त्यांना महत्त्वाचा कामगिरी बजावता येण्यासारखी आहे. प्रशिक्षित

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



बक्स सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०३

भागूसत्रळाची वाण अंशत: भरून काढण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी अंगावर घेतल्यास त्याचा फार फायदा होईल. तामीळनाडूमधील एका गावच्या पुढाऱ्यांनी प्रयत्न केल्यामुळे त्या गावातील ७० टक्के ग्रामस्थांनी कुटुंबनियोजनाचा स्वीकार केला. हे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पुष्कळांची अशी गैरसमजूत झालेली असते की जननसंख्येत घट घडवून आणणे हा कुटुंबनियोजनाचा प्रमुख हेतू आहे. परंतु तसे म्हणता यावयाचे नाही. कारण जननसंख्येत घट होण्यास अनेक कारणे असू शकतात विवाहाचे वय, विधवा होण्याचे वय, विधवाविवाहांची संख्या, मुलांना अंगावर पाजण्याचा मातांचा काळ, मृत्यूची संख्या, संततिप्रतिबंधक साधनांचा उपयोग, इत्यादी अनेक कारणे जननसंख्येतील घटीला कारणीभूत होत असतात. त्यांपैकी कोणत्याही एका कारणामुळे जननसंख्येत घट होणे अगर ती वाढणे संभवते. संततिनियमनाच्या साधनाचा वापर हे त्यातील एक कारण आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील दरहजारी मृत्यूचे प्रमाण बरेच एकदम कमी झाले आहे. १९६१ साली ते दरहजारी २१ होते. सध्या ते १४–१५ इतके कमी झाले आहे. अर्थातच समाजातील विधवांचे प्रमाण कमी झाले आहे. विवाहित महिलांची संख्या वाढली आहे. ह्याचा परिणाम जननाचे प्रमाण वाढण्यात होईल. शिवाय आधुनिक विचारास अनुसरून अधिक विधवा पुन्हा विवाह करू लागल्या आहेत आणि मुलांना अंगावर पाजण्याचा मातांचा काळ कमी होत चालला आहे. परिणामी जनन संख्येत वाढ होत आहे. १९६६ ते ७० ह्या काळात संततिनियमनाच्या साधनांच्या वापरामुळे दरसाल सरासरी १५ लाख भावी मुले जन्माला आली नाहीत असा अंदाज करण्यात आला आहे. त्यामुळे जननसंख्येच्या प्रमाणात २ टक्क्यांनी घट झाली आहे. पण ह्याचा अर्थ जननसंख्येचे असणारे दरहजारी ४१ चे प्रमाण ३९ वर आले आहे असा मात्र तर्क करता येत नाही. कारण ते प्रमाण वाढण्याची इतर कारणे आहेत.

### संततिनियमनांच्या साधनांचा किती उपयोग होतो?

ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जननसंख्येत घट अगर वाढ होणाऱ्या प्रत्येक कारणाचा प्रभाव किती होतो ह्याची चिकित्सा करण्यात आली पाहिजे. असा अंदाज करणे भारतात फारसे सोपे नाही. पण इतरही देशांच्या बाबतीत अशीच स्थिती आहे. लोकसंख्येच्या प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांचे मताने संततिनियमनाच्या साधनांच्या जननसंख्येवरील परिणामाची छाननी करण्याचे काम बरेच गुंतागुंतीचे आहे. तैवान हा देश लहान असून तेथे कुटुंबनियोजन विषयक आकडे चांगले कसोशीने ठेवण्यात आले आहेत परंतु तेथे सुद्धा अशी बिनचूक छाननी करणे शक्य झालेले नाही. एकंदरीत तेथील जननसंख्येत घट झाली आहे. परंतु कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला प्रारंभ होण्यापूर्वीही तेथे घट होतच होती. हाँगकाँगबाबत अशीच परिस्थिती आहे. तेथील दरहजारी जननसंख्या १९६१ मध्ये ३५·५ होती, ती १९६६ साली २५·८ इतकी उतरली आहे. परंतु ह्या घटीपैकी बरीचशी घट कुटुंबनियोजनामुळे झाली नसून इतर कारणांनी झाली असावी असा कयास आहे. संततिक्षम वयातील तरुण स्त्रियांची संख्या घटल्यामुळे आणि तशीच विवाहित स्त्रियांची संख्याही घटल्यामुळे जननसंख्येच्या प्रमाणात मोठी घट झाली असावी असा अंदाज करण्यात आला आहे. जननसंख्येचे प्रमाण घटविण्यावरच फक्त लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे भारतामधील कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाची फार हानी झाली आहे. इतर कारणांकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे कार्यक्रमाच्या परिणामकारकतेबद्दल निष्कारण वाद माजला आहे, आणि जी कामगिरी खरोखर झाली आहे तिकडे मात्र लक्ष दिले गेलेले नाही. दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने जननसंख्येचे प्रमाण कमी करण्याच्या उद्दिष्टावर नजर ठेवणे कदाचित जरुरही असेल; परंतु देशाच्या काही मर्यादित भागांत झालेल्या जननसंख्येच्या प्रमाणातील घटीवरून अनुमान काढून कार्यक्रमाचे यशापयश अजमावणे मात्र धोक्याचे ठरणारे आहे.

---

### एक्स्पो प्रदर्शनासाठी भारताचा २ कोटींचा खर्च

जपानमध्ये ओसाका येथे भरविण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भारताने आपला प्रासाद उभारला होता. ही इमारत उठविण्यासाठी परदेशीय चलन आणि हिंदी चलन ह्या स्वरूपात सुमारे दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले. प्रासादाची देखभाल करण्यासाठी आणि इतर व्यवस्था राखण्यासाठी झालेला खर्चही त्यात समाविष्ट आहे. प्रदर्शन पाहाण्यासाठी सुमारे १ कोटी लोक येऊन गेले. त्यांपैकी एक लाख, वीस हजार लोक हिंदी होते. भारतामधून प्रदर्शन पाहाण्यासाठी गेलेल्या व परदेशातील भारतीयांचा त्यात समावेश आहे. प्रदर्शन पाहाण्यासाठी निरनिराळ्या राज्यांतील मंत्री, सरकारी अधिकारी व उद्योगधंद्यांचे प्रमुख आले होते. प्रदर्शनात उभारलेले रेस्टॉरंट व इतर करमणुकीची साधने ह्यांच्यापासून भारताला जवळ जवळ खर्चाइतकी प्राप्ती झाली. प्रदर्शन पाहाण्यासाठी भारत सरकारचे दोन मंत्री आणि दोन उपमंत्री गेले होते. त्याशिवाय पंजाब, म्हैसूर, आंध्रप्रदेश आणि गोवा राज्यांचे मुख्यमंत्री प्रदर्शन पाहाण्यास गेले होते. आणखी काही प्रमुख व्यक्ती पुढील प्रमाणे :–दिल्ली राज्याचे प्रमुख, मुंबई व दिल्ली शहरांचे मेयर, पार्लमेंटचे ३० सभासद आणि राज्य विधानसभेचे २४ सभासद. सरकारी अधिकारी किती गेले ते नक्की सांगता येत नाही. व्यापार व उद्योगधंद्यांच्या १८ प्रतिनिधीमंडळांनी प्रदर्शनाला भेट दिली, त्याशिवाय व्यक्तिश: अनेक धंदेवाल्यांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला. प्रदर्शनात अनेक देशांच्या विविधतेने नटलेल्या इमारती उभारण्यात आल्या होत्या. आर्किटेक्टच्या व्यवसायांतील लोकांना त्या पाहाण्यात मोठाच लाभ होता. भारतामधून ३३ आर्किटेक्ट प्रदर्शन पाहाण्यासाठी गेले होते. १२ खास विमाने प्रदर्शनाला जाण्यासाठी उद्योगपतींनी भाड्याने घेतली होती.

इचलकरंजीतील छोट्या–मोठ्या उद्योगधंद्यांस भांडवल पुरवठा करणारी एकमेव नागरी बँक

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. ३६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर्स भांडवल | रु. | १०,००,००० |
| भरलेले भांडवल | रु. | ६,७०,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३,८४,००० |
| इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,१२,६५,००० |

ठेवींचे दरः— चालू १ टका
सेव्हिंग्ज ४ टक्के
मुदत ठेव ६ ते ८ टक्के
कॉल डिपॉझिट ५ ते ५॥ टक्के
कर्जाचा दर ८ ते ११ टक्के

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवींच्या निरनिराळ्या आकर्षक योजनांसाठीं बँकेचे कार्यालयात समक्ष चौकशी करावी.

श्री. ज. दांडेकर — मॅनेजर
सदाशिव मारुती मुरदंडे — चेअरमन



विना सहकार–नहि उद्धार

विहीर खोदाई, ऑईल इंजिन, इलेक्ट्रिक मोटार्स व शेतीची मशागत औजारे यांच्यासाठी शेतकऱ्यांस शेतीचे तारणावर दीर्घ मुदतीचे, कमी व्याजाचे व सवलतीच्या वार्षिक हप्त्याने परतफेड करता येईल असा कर्जपुरवठा करणारी—

## परभणी जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, परभणी

शिवाजी रोड, परभणी.

नोंदणी क्र. २०६५५ नोंदणी दिनांक २२–८–१९५२
फोन नंबर ९५.

जिल्ह्यात सोळा शाखांसह सेवेस तयार आहे.

व. रं. वराडे, जी. डी. सी. ॲंड ए. — व्यवस्थापक
द. ज. अदकिणे, बी. ए. — अध्यक्ष

परभणी जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, परभणी



ही दिवाळी आमचे हितचिंतकांस समृद्धीची जावो !

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जमखंडी

स्थापना : १९४० ] मुख्य कचेरी : जमखंडी [ शाखा : बनहट्टी
[ ३० जून, १९७० चे आकडे ]

| | | |
|---|---|---|
| * वसूल भाग भांडवल | रु. | २,२०,५०० |
| * गंगाजळी व इतर निधी | रु. | ५,१४,१३९ |
| * सर्व प्रकारच्या ठेवी | रु. | ४३,००,१९३ |
| * कर्जव्यवहारातील गुंतवणूक | रु. | २६,४२,७१३ |
| * रोखे वगैरेतील गुंतवणूक | रु. | ८,५६,६२५ |
| * ठेवीवरील व्याजाचे दर | रु. | १ ते ७॥ टक्के |
| * डिव्हिडंड | रु. | ६½% |
| * ऑडिट वर्ग | | "अ" |

स्वतःच्या मालकीची ऑफिस-इमारत व गोडाऊन्स, सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वृ. खाडिलकर — मॅनेजर
एम. ए. शहा — चेअरमन



आमचे हितचिंतकांस नवीन वर्ष सुखाचे जावो !

स्थापना : १९१७ फोन नं. २४१

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

ऑडिट वर्ग सतत ३८ वर्षे 'अ'

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | १,८१,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३,२६,००० |
| इतर फंडस् | रु. | १०,४८,००० |
| ठेवी | रु. | ९६,९९,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,१६,६८,००० |

♣ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
♣ ठेवीवर वाढवलेले व्याजाचे आकर्षक दर.
♣ अद्ययावत सेफ डिपॉझिटची सोय.

अधिक चौकशीसाठी संपर्क साधा.

शं. पु. कुलकर्णी — मॅनेजिंग डायरेक्टर
वि. कृ. तांबवेकर — चेअरमन

# भारताच्या अर्थव्यवस्थेत पोलाद कारखान्यांचे स्थान

## पोलादाच्या उत्पादनांत भारत अजूनही मागे

*विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेत पोलादाच्या धंद्याला मूलभूत महत्त्व आहे. कारण, जगात त्याच्या मरमराटीवरच विकासाच्या पायऱ्या अवलंबून आहेत.*

कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात, सर्व प्रकारच्या भांडवली मालाच्या उत्पादनासाठी पोलादाची आवश्यकता असते. भांडवली मालाच्या उत्पादनाचा मूलभूत कच्चा माल म्हणूनच पोलादाचा उल्लेख करावा लागेल. कारखान्यांची अनेकविध यंत्रसामग्री, रस्ते बांधण्यासाठी लागणारी अवजारे, पाटबंधाऱ्यांसाठी आणि विजेच्या निर्मितीसाठी लागणारी यांत्रिक साधने तयार करण्यासाठी पोलाद लागते. तसेच ते नित्योपयोगी वस्तू तयार करण्यासाठीही लागते. व्यापारी कचेऱ्यांसाठी आणि घरबांधणीसाठीही पोलादाची गरज असते. शेतीसाठी लागणारी अनेक प्रकारची साधनेही पोलादाचीच असतात. उदा. यंत्रचलित नांगर, पिकांचे रक्षण करण्याची उपकरणे, इत्यादी. वाहतुकीच्या क्षेत्रांत रेल्वेचे डबे, बोटी, मोटारी, सायकली, इत्यादीसाठीही पोलाद लागते. पाणीपुरवठा व वीजनिर्मिती ह्या क्षेत्रांतील जनरेटर्स, ट्रॅन्सफॉर्मर्स, मोटार्स, पाणी उपसण्याचे पंप, इत्यादी साधनेही पोलादाचीच बनविण्यात येतात.

### कारखान्यांची स्थापना

भारताच्या औद्योगिक नकाशात पोलादाचे आगमन होऊन ५० वर्षांवर काळ लोटला आहे. टाटा आयर्न अँड स्टील कंपनी जमशेटजी टाटा ह्यांनी स्थापन केली. व्यापारी पायावर पोलाद तयार करण्याचा भारतामधील हा सर्वांत यशस्वी आणि लक्ष वेधण्या सारखा प्रयत्न होता. १९०८ साली कंपनीने आपला कारखाना साकची येथे स्थापन केला. १९११ साली भिडाचे लोखंड तयार करण्यात आले आणि पोलादाचा पहिला ठोकळा एक वर्षानंतर बनविण्यात आला. कलकत्ता येथील ब्रिटिश धंदेवाल्यांनी १९१८ साली इंडियन आयर्न अँड स्टील कंपनी हा दुसरा कारखाना उभारला. १८ वर्षांनंतर ह्याच कंपनीने स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉल ह्या आणखी एका कंपनीची पोलाद तयार करण्यासाठी स्थापना केली. १९५२ अखेर ह्या दोन्ही कंपन्या एकमेकात विलीन करण्यात आल्या. म्हैसूर राज्यात भद्रावती येथे म्हैसूर आयर्न वर्क्सची स्थापना १९२१ साली करण्यात आली. १९३४ साली ह्याच कारखान्याला एका पोलादाच्या कारखान्याची जोड देण्यात आली. कारखान्याच्या स्थापनेचे श्रेय सर. एम्. विश्वेश्वर अय्या ह्या एंजिनिअर-मुत्सद्याला द्यावे लागते. त्यांच्या दूरदृष्टीनेच कारखाना उभा राहिला. १९६६ साल अखेरच्या माहितीप्रमाणे पोलादाच्या धंद्यात १,२०६ कोटी रुपयांचे उत्पादक भांडवल गुंतलेले आहे. पोलादाच्या कारखान्यांची नोंदणी झालेली संख्या ७४१ होती आणि त्यात २ लाख, ९३ हजार कामगारांना व तंत्रज्ञांना रोजगार मिळत होता. १९५१ साली सुरू झालेल्या दशकाच्या मध्यापर्यंत भारताने स्वतःच्या पोलादाच्या गरजा आपल्या उत्पादनाने भागविल्या. त्या वेळी देशाची आर्थिक वाढ खालच्या पातळीवर होती. नित्योपयोगी वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांचीच काय ती मागणी पोलादाला त्यावेळी भागवावयाची होती. १९५४ नंतर मात्र भारतामधील पोलादाचा खप लक्षात येण्याइतका वाढला.

### नवे पोलादाचे कारखाने

पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात पोलादाचे उत्पादन वाढविण्यासाठी फारशी तरतूद करण्यात आली नाही. त्या अवधीत खाजगी मालकीच्या काही पोलाद कारखान्यांचा विस्तार करण्यासाठी मदत मात्र देण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात ह्या धंद्याने धडाक्याने प्रगती केली. ह्या कार्यक्रमात सार्वजनिक मालकीच्या विभागात तीन पोलादाचे कारखाने स्थापन करण्यात आले. ओरिसात जर्मनीच्या मदतीने राउर केला येथे एक कारखाना काढण्यात आला. मध्यप्रदेशात रशियाच्या मदतीने भिलई येथे दुसरा कारखाना स्थापन करण्यात आला आणि पश्चिम बंगालमध्ये दुर्गापूर येथे ब्रिटनच्या मदतीने तिसरा कारखाना उभारण्यात आला. ह्या प्रत्येक कारखान्याची सुरवातीची उत्पादनक्षमता १० लाख टनांची होती. अशा रीतीने दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ह्या धंद्याची उत्पादनक्षमता १५ लाख टनांवरून ६० लाख टनांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. म्हणजे पाच वर्षांत चौपट उत्पादन वाढ करण्याचे ठरविण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात उत्पादनाचा विस्तार ६० लाख टनांवरून ९०·२ लाख टनांपर्यंत वाढविण्याचा आणि त्यात विविधता आणण्याचा विचार करण्यात आला. हे साध्य करण्यासाठी सार्वजनिक मालकीच्या विभागातील तीन कारखान्यांची क्षमता दुप्पट करण्यात आली आणि १० लाख टन उत्पादनक्षमतेचा आणखी एक कारखाना बोकॅरो येथे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. नियोजनाच्या पहिल्या १५ वर्षांच्या कालात पोलादाचे प्रत्यक्ष उत्पादन पुढील प्रमाणे वाढले: १९५०–५१ साली १·०४ दशलक्ष टन होते, ते १९५५–५६ साली १·३० दशलक्ष टन झाले. १९६०–६१ साली २·३९ दशलक्ष टन झाले. १९६५–६६ साली ४·५१ दशलक्ष टन

# औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., औरंगाबाद

**केन्द्र कार्यालय : अदालत रोड, औरंगाबाद**

टेलिफोन नं. २०९१ ] पो.बॉ.नं. ३ [ तारेचा पत्ता–सहकारबँक

## बँकेची सर्वसाधारण माहिती

ऑगस्ट १९७० अखेर (आकडे लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | ... | रु. | १३८·०६ |
| गंगाजळी व इतर निधी | ... | रु. | ४२·३३ |
| एकूण ठेवी | ... | रु. | ३६०·३८ |
| एकूण दिलेली कर्जे | ... | रु. | ९४९·३२ |
| खेळते भांडवल | ... | रु. | ११८६·९७ |

: ठेवीचे दर :

| | |
|---|---|
| चालू खाते | १/४ टक्का |
| बचत खाते | ३ ३/४ टक्के |
| मुदत ठेवी | ३ ते ६ ३/४ टक्के |

रिकरिंग डिपॉझिट स्कीमचा पुरेपूर लाभ घ्या.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक आपले मुख्य कार्यालय आणि ५६ शाखांद्वारे जिल्ह्यांत कार्य करीत आहे. बँकेच्या अदालत रोड शाखेत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.

**पी. डी. पाठक** — एम्. कॉम्., सी. ए. आय आय. बी. — मॅनेजर

**बाळासाहेब पवार** — एम्. एल्. ए. — चेअरमन

नूतन दीपावली वर्ष सर्वांना सुखाचे, भरघोस यशाचे व समृद्धीचे जावो !

# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

आपल्या माधवनगर, खणभाग, गावभाग, विश्रामबाग, बुधगाव, कसबेडिग्रज व मराठवाड्यातील बीड व परभणी येथील शाखांसह, समाजातील सर्व लहानसहान घटकांपर्यंत आपली सेवा अखंडपणे रुजू करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. | ९,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. | ५,५२,२७० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | ११,९७,४०८ |
| ठेवी | ... | रु. | २। कोटीपर्यंत |
| कर्जे | ... | रु. | १॥। कोटीपर्यंत |
| निव्वळ नफा (३०।६।७० चा) | | रु. | १,३९,९६१ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

*वि. ह. माईणकर* — बी. एस्सी., एल्एल्. बी. — कार्याध्यक्ष

*ल. य. लागू* — बी. ए., एल्एल्. बी. — व्यवस्थापक



झाले आणि १९६८–६९ साली ४·७ दशलक्ष टन झाले. पोलाद निर्माण करणाऱ्या देशात भारताचा अनुक्रम नववा लागतो आणि पोलादाच्या खपाच्या बाबतीत आठवा लागतो. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात भारतात २२·०३०३ दशलक्ष टन पोलाद खपले. दुसऱ्या व पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळातील हे आकडे अनुक्रमे ११·३८२ दशलक्ष टन आणि ७·०८८ दश लक्ष टन असे आहेत. तथापि देशाचा मोठा विस्तार आणि झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता ही कामगिरी मनात भरण्यासारखी म्हणता येणार नाही. कारण, पोलादाच्या निर्मितीत एकंदरीने वाढ झालेली असली तरी दरडोई खपाच्या दृष्टीने भारत अद्याप १५ किलोग्रॅमपर्यंतच घोटाळत आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. दरडोई खपाचे पुढारलेल्या देशातील आकडे असे आहेत. अमेरिका ५४० ते ६६७ किलोग्रॅम, रशिआ ३४४ ते ४१५ किलोग्रॅम. जपानमधील दरडोई खप १९६३ मध्ये २५८ किलोग्रॅम होता तो १९६७ मध्ये ५१३ किलोग्रॅम इतका वाढला. ह्या तुफान वाढीमुळे जपानच्या औद्योगीकरणाचा विलक्षण वेग सहज लक्षात येतो.

## तुटवडा आणि किमतीत वाढ

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कितीतरी वर्षे भारतात पोलादाचा तुटवडा होता. १९५० च्या दुसऱ्या सहामाहीत तुटवडा फारच जाणवण्याइतका होता. १९६६ ते ६८ च्या मंदीच्या काळात सुद्धा काही प्रकारच्या पोलाच्या मालाची टंचाई होती. १९६९ च्या तिसऱ्या तिमाहीपर्यंत पोलादाला मागणी बेताचीच होती. पण नंतर ती जोराने वाढू लागली म्हणून पोलादाची टंचाई निर्माण झाली. पोलादाचे उत्पादन उद्दिष्टा-इतके झाले नाही आणि मागणी मात्र एकदम वाढली. त्यामुळे पोलादाच्या किंमती वाढल्या आणि मागणी-पुरवठ्याचा नियम काम करू लागला. मागणी व पुरवठा ह्यांच्यामधील वाढत जाणारी तफावत भरून काढण्यास जरूर त्या प्रमाणात आयात करणे हाच एक मार्ग होता. परंतु आयात ही परदेशीय चलनाच्या उपलब्धतेवर अवलंबून होती. तथापि, भारत सरकारने ३० डिसेंबर १९६९ रोजी पोलादाच्या किंमतीत टनामागे सरासरी ७५ रुपये भाव वाढवून दिला. त्याशिवाय एंजिनिअरिंगच्या निर्यात मदत फंडासाठी म्हणून टनामागे आणखी रुपये २·५० वाढवून दिले. ह्या किमती १ जानेवारी, १९७० पासून अमलात आल्या. १९६७ मध्ये पोलादावरील किमतीचे नियंत्रण झाल्या-पासून किमतीत झालेली ही चवथी वाढ होती. म्हणजे निर्नियंत्रण झाल्यापासून पोलादाच्या किमती टनामागे १९०·५० रुपयांनी वाढल्या. किमती वाढल्यामुळे भारी आणि हलक्या एंजिनिअरिंग धंद्यातील मालाच्या किंमतीही वाढल्या, कारण त्यांचा मुख्य कच्चा माल पोलादच आहे.

## पोलादाची व लोखंडाची आयात व निर्यात

उत्पादनाची उद्दिष्टे साध्य न झाल्यामुळे आणि मागणी वाढत चालल्यामुळे लोखंडाची व पोलादाची मोठ्या प्रमाणावर आयात करणे अपरिहार्य झाले. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमानंतर औद्योगी-करणाचा वेग वाढल्यामुळे हे साहजिकच होते. पण अपुरे उत्पादन हच केवळ गेल्या काही वर्षातील मोठ्या प्रमाणा-वरील आयातीचे कारण नव्हते. काही विशेष प्रकारच्या पोलादाची गरजही त्याला जबाबदार होती. पोलादाचा तुटवडा सर्व जगभरच भासत आहे. जगातील उद्योगधंद्यांतील वाढत्या उलाढालीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोलादाची मागणी वाढली आहे मागणीच्या मानाने पुरवठा अपुरा पडत असल्यामुळे किंमती भडकल्या आहेत. अर्थातच मागणीच्या मानाने जादा पुरवठा व उतरत्या किमतीचीही दिशा बदलली आहे. १९५० पासून सुरू झालेल्या दशकात पोलादाच्या धंद्याला गंभीर अड-चणीला तोंड द्यावे लागत आहे. पोलादाच्या जागतिक बाजार-पेठेची व्याप्ती वाढली आहे. शिवाय भारताचे पोलाद जगातील किमतीच्या मानाने स्वस्त आहे. त्यामुळे भारताच्या पोलादाला अधिक वाव मिळत आहे. भारताच्या पोलादाच्या किंमतीतून अबकारी कर, वाहतुकीचे दर, इत्यादी बाबी वगळल्या तर कित्येक प्रकारच्या पोलादाच्या मालाच्या किंमती इतर देशांच्या मालाच्या किमतीपेक्षा आणखीच कमी होतात. भारतामधून मुख्यत: चिडाचे लोखंड, बांधकामाचे पोलाद, कांबी, सळ्या व रेल्वेचे रूळ हा माल निर्यात करण्यात येतो १९६९–७० मध्ये सुमारे ५० वर देशांनी भारताकडून लोखंड व पोलादाचा माल खरेदी केला. ह्या निर्यातीमधील सर्वात अधिक भाग इराणच्या आखातातील देश, संयुक्त अरब प्रजासत्ताक, इराक, सुदान व उत्तर अरब देश ह्या देशांनी घेतला. १९६८–६९ साली नेहमीच्या निर्यातीपेक्षा वेगळ्या प्रकारची निर्यात करून जे परदेशीय चलन मिळाले त्यापैकी सर्वात मोठा हिस्सा लोखंड व पोलादाच्या निर्यातीने मिळालेला होता.

## मागणीचे व उत्पादनाचे अंदाज

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेने १९७०–७१ साली देशातील पक्क्या पोलादाची मागणी ७·१२५ दशलक्ष टन असेल असा अंदाज केलेला आहे. १९७५–७६ साली ही मागणी १०·५१२ दशलक्ष टन आणि १९८०–८१ साली १५·२७५ दशलक्ष टन असेल असा हिशेब करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय उत्पन्न आणि पोलादाचा वापर ह्यांच्यात इतर देशात असलेल्या प्रमाणाच्या जवळपासच भारतामधील प्रमाण आहे. ह्या आधारावर वरील अंदाज करण्यात आला आहे चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील अंदाजाप्रमाणे १९७३–७४ च्या सुमारास पक्क्या पोलादाची देशातील मागणी १·९५ दशलक्ष टन असेल. लोखंड आणि पोलादाचे

# दि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

स्थापना : १३-९-१९५७ मुख्य कचेरी :-गरुड बाग, धुळे (पोस्ट बॉक्स नं. ३)

★ ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.

★ बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाच्या दराने स्वीकारते. वाढत्या प्रमाणात ठेवी ठेवून जिल्ह्यात शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांस मदत करा.

| | | ता. ३१-८-१९७० |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १ कोटी, ५० लाख |
| भरपाई झालेले भाग भांडवल | ... | रु. ९४ लाख |
| ठेवी | ... | रु. ३ कोटी, ८३ लाख |
| कर्जे | ... | रु. ५ कोटी, ६७ लाख |
| खेळते भांडवल | ... | रु. ७ कोटी, ५९ लाख |

जिल्ह्यात ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३० शाखा अविरत कार्य करीत आहेत.

—आवाहन—

**बँकेच्या अल्पठेव योजनेवर सर्वसाधारण जनता बेहद्द खुष आहे.** कारण

पैसे भरण्यासाठी बँकेत जावे लागत नाही, चलन भरावे लागत नाही, एवढेच नव्हे बँकेचे अधिकारी घरी अगर दुकानावर येऊन पैसे घेऊन जातात व आवश्यक ते (नोंदणी पत्रक) तेथे भरून देतात.

रोज २५ पैसे किंवा त्याच्या पटीवर म्हणजे ५० पैसे, ७५ पैसे अगर १ ते १०० रु. पर्यंत रकमा स्वीकारल्या जातात. या खात्यात दर महिन्यास रु. ५ आणि रु. ५ च्या पटीत रकमा ठेवता येतात आणि तसेच आपली ही बँक रिकरिंग डिपॉझिट खात्यावर ७ टक्क्यापर्यंत व्याज देते.

आपण एक वेळ येऊन आपले व आपल्या मित्राचे खाते उघडा व या अमूल्य संधीचा फायदा घ्या.



शेती सुधारण्याकरिता व पर्यायाने आर्थिक पातळी उंचावण्याकरिता सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आशास्थान असलेली

# सोलापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, सोलापूर

र. नं. :— २४९३० ◆ दिनांक :— १-१-१९५१ ◆ दूरध्वनी क्र. :— २८६५

शाखा :—सांगोला, करमाळा, माढा, पंढरपूर, वार्शी, मोहोळ, मंगळवेढा, अकलूज, अक्कलकोट, द. सोलापूर व उ. सोलापूर

(१) वसूल झालेले भाग भांडवल रु. ९०लाख ५०हजार
(२) खेळते भांडवल रु. ६कोटी ९५लाख १५हजार
(३) सभासद संख्या ३६,८०००
(४) आतापर्यंत वाटलेली कर्जे रु. ९कोटी ४८लाख

नवीन विहिरी :— १४,९९०
जुन्या विहिरी :— ४१८३
ऑईल इंजिन व पंपींग सेटस् :— ७०४३

वरील तगाई योजनेशिवाय जमीन सुधारणा, जमीन खरेदी, जुने कर्ज निवारण, ट्रॅक्टर खरेदी, उपसा जलसिंचन योजना व विशाल विहीर योजना वगैरेसाठी अल्प दराच्या व्याजात दीर्घ मुदतीची कर्जे देते.

बँकेच्या आर्थिक मदतीनें सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६६ हजार एकर जिराईत जमिनीचे बागायत जमिनीत रूपांतर होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात सुमारे ६६ लाख रुपयांची वाढ झालेली आहे.

महाराष्ट्र सरकारकडून मंजूर झालेली "विशेष भू-संवर्धन योजना" बँकेने हाती घेतलेली असून या योजनेखाली बँकेने सुमारे ५३ लाख, ७८ हजार रुपयांचे कर्ज मंजूर केलेले आहे.

रा. बा. टोणपे, बी. कॉम. व्यवस्थापक

किसनलाल रामचंद्र मारवाडी, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए. उपाध्यक्ष

शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील, एम. एल. ए., (अकलूज) अध्यक्ष

उत्पादन जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीने चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील विस्ताराच्या योजना आखण्यात आलेल्या आहेत. देशातील गरज भागविण्याच्या दृष्टीने आणि पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात लागणाऱ्या पोलादाच्या जादा पुरवठ्यासाठी प्राथमिक तयारी करणे असा ह्या विस्तारयोजनेचा उद्देश आहे. भिलाई येथील कारखान्याचा विस्तार करण्यात यावयाचा असून बोकॅरो येथील कारखान्याचा १·७ दशलक्ष टन पोलादाचे ठोकळे तयार करणारा पहिला टप्पा पुरा करण्यात यावयाचा आहे. भिलाई येथील कारखान्याच्या विस्ताराच्या पहिल्या योजनेत उत्पादन २·५ दशलक्ष टनांच्या जागी ३·२ दशलक्ष टन करण्याचा उद्देश होता. परंतु उत्पादन ४·२ दशलक्ष टनांपर्यंत वाढविण्याच्या एका पर्यायी योजनेच्या सध्या विचार चालू आहे. शिवाय बोकॅरो येथील कारखाना विस्ताराचे काम चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमातच हाती घेण्यात यावे आणि १९७३–७४ पर्यंत २·५ दशलक्ष टन उत्पादन करण्याकडे दृष्टी ठेवावी अशी एक सूचना आहे. ह्या विस्ताराच्या कार्यक्रमासाठी १२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विस्तारयोजनेत तांत्रिक सुधारणांकडे आणि चालू पोलाद कारखान्यांची कार्यक्षमता वाढविण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावयाचे आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील तरतुदीप्रमाणे १९६८–६९ मध्ये असलेली अंदाजे ९ दशलक्ष टन पोलादाची उत्पादनक्षमता १९७३–७४ च्या सुमारास १२ दशलक्ष टनांपर्यंत वाढविण्यात यावयाची आहे. बिडाच्या लोखंडाचे उत्पादन त्याच सुमारास ३·८ दशलक्ष टन होईल असा अंदाज आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस पक्क्या पोलादाची निर्यात १० लाख टन आणि लोखंडाची १५ लाख टन होण्याची अपेक्षा आहे. पोलादाची भविष्य कालीन गरज भागविण्यासाठी चौथ्या कार्यक्रमाच्या काळातच प्राथमिक तयारी करणे जरुरीचे आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन जादा पोलादाच्या निर्मितीची वाढ करण्यासाठी ११० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोणत्या योजना हाती घेण्यात याव्यात ह्या विषयी तपशीलवार अभ्यास करण्यात येत आहे. १९७३–७४ साली मिश्र पोलाद आणि विशेष प्रकारचे पोलाद ह्यांची मागणी २,९४,००० टन होईल असा अंदाज आहे. दुर्गापूर येथील संबंधित कारखाना, म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स आणि खाजगी पोलाद कारखाने ही मागणी बहुतांशी भागवू शकतील. पोलादाची वाढती मागणी लक्षात घेऊन आणखी तीन पोलादाचे कारखाने सार्वजनिक विभागात काढण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टम, म्हैसूर राज्यातील होसपट आणि तामिळ नाडूतील सेलम येथे ते काढण्यात यावयाचे आहेत. हे कारखाने काढताना कच्च्या मालाची जवळील उपलब्धता, वाहतुकीच्या सोयी आणि बाजारपेठ ह्यांचा विचार करण्यात आला आहे. कारण, उत्पादनाच्या खर्चावर ह्या घटकांचा परिणाम होत असतो.

**पोलादाचा दरडोई खपाचा तक्ता : ( किलोग्रॅमचे आकडे )**

| देशाचे नाव | १९६३ | १९६४ | १९६५ | १९६६ | १९६७ |
|---|---|---|---|---|---|
| कॅनडा | ३५७ | ४४५ | ५३१ | ४८९ | ४४६ |
| सिलोन | ९ | ७ | ७ | ८ | १० |
| कांगो | ५ | ५ | ३ | ५ | ४ |
| झेकोस्लोव्हाकिआ | ४८७ | ४९८ | ५९४ | ५४५ | ५८३ |
| डेनमार्क | २५६ | ३३५ | ३६१ | ३२१ | ३२७ |
| फ्रान्स | ३२६ | ३५६ | ३३१ | ३४७ | ३६० |
| घाना | १० | १२ | १३ | ५ | ६ |
| भारत | १६ | १६ | १६ | १४ | १३ |
| जपान | २५८ | ३२४ | २९४ | ३६९ | ५१३ |
| पश्चिम जर्मनी | ४७३ | ५७९ | ५४० | ५११ | ४७६ |
| स्वीडन | ५४५ | ६२३ | ६८२ | ६४८ | ५८९ |
| रशिआ | ३४४ | ३५५ | ३७६ | ३९६ | ४१५ |
| ब्रिटन | ३६८ | ४३८ | ४२४ | ३८७ | ३८८ |
| अमेरिका | ५४० | ६१५ | ६५६ | ६६७ | ६३४ |


विविध प्रकारच्या कापडाच्या ' क्वालिटी ' व ' गॅरंटी ' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापडदुकान
★ ★ ★ ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स ★ ★ ★
' होम ऑफ क्वालिटी अँण्ड व्हरायटी '
पेरूगेट रोड, पुणे ३०. ( फोन नं. ५७३१८ )

# शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर

**प्रमुख कचेरी :**
जुना राजवाडा, कोल्हापूर
तार : "शेतकरी" कोल्हापूर
फोन : १२५. ६२६. १११.

**मुंबई शाखा कचेरी :**
८७ ए, राज चेंबर्स,
मरोच स्ट्रीट, मुंबई नं. ९
तार : "को-ऑपसंघ", मुंबई
फोन : ३२८३९२. ३२१५५०

**शेतकरी-ग्राहक यांचे जीवनाशी निगडित झालेली, शेती माल विक्री, ग्राहक व्यवहार, प्रक्रिया, इत्यादी विविध व्यवहार करणारी महाराष्ट्रातील प्रमुख सहकारी संस्था.**

१९६९–७० विक्री व्यवहार १५.९ कोटींचे वर

कॅ. ग. स. घाटगे
जनरल सेक्रेटरी

वि. शं. शिंदे, नेसरीकर
कार्यकारी संचालक

ल. य. पाटील
अध्यक्ष



# रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक लि., रत्नागिरी

तार : सँको बँक ] जवाहर रोड, रत्नागिरी [ टे. नं. ९६

रत्नागिरी शहरांतील लोकांना खुषखबर :—बँकेच्या जवाहर पथावरील ( रत्नागिरी नगरपालिकेच्या कंपौंड समोर ) नव्या भव्य वास्तूमध्ये वीज बिलांचे वसुलीचे काम तसेच सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्याचे, चेक्स व बिले वसुलीची कामे सुरू झाली आहेत. तरी शहरातील त्या भागांतील सर्व लोकांनी याचा अवश्य फायदा घ्यावा अशी विनंती आहे. तसेच याच वास्तुमध्ये शहरात प्रथमच सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था केली आहे. गरजूंनी अवश्य फायदा घ्यावा. तपशीलासाठी कृपया चौकशी करावी.

दिनांक ३१ ऑगस्ट, १९७० अखेरचे प्रगतीचे बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | ३२,११,००० |
| एकूण निधी | रु. | ७,८५,८४५ |
| ठेवी | रु. | २,३५,७१,००० |
| खेळते भांडवल | रु. | ४,०४,३२,००० |

जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत काम करणारी जिल्ह्याची एकमेव सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक लि.
राज्य वीज मंडळाची बिले वसुली या बँकेमार्फत केली जाते.
जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे एकमेव बँकर्स.

म. चिं. सांखळकर
बी. ए. (ऑनर्स), एच. डी. सी.
जी. डी. सी. अँड ए. मॅनेजर

सु. कृ. शेटये
अध्यक्ष

भा. या. चिटणीस, उपाध्यक्ष



# बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी

घोडे गल्ली, सोमवार पेठ, बार्शी (जि. सोलापूर)

दूरध्वनी
बार्शी : २०२
वैराग : ४३

स्थापना – १९०६

शाखा
वैराग
ता. बार्शी

३० जून, १९७० अखेरची स्थिती

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | २,२०,३६० |
| गंगाजळी | रु. | ४,५९,१०४ |
| ठेवी | रु. | २८,३४,१६२ |
| गुंतवणूक | रु. | १२,३८,५१२ |
| खेळते भांडवल | रु. | ३९,०२,२९९ |

सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली आमचे सभासद, खातेदार व हितचिंतकांस सुखाची व समृद्धीची जावो, हीच सदिच्छा

व. ह. उटगीकर
B. Com.
मॅनेजर

☆

मा. वि. विश्वरूपे
B. Sc., L.L. B.
चेअरमन



## सोलापूर शहरातील नागरी सहकारी बँक

# दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

( स्थापना ६–६–१९२९ )

हेड ऑफिस – ३६९ द. कसबा फोन नं. ४३७४
शाखा – साखरपेठ, फोन नं. ३९४२ (२) अक्कलकोट, ६२

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ३,४६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,३०,९८१ |
| ठेवी | रु. | ३८,१८,७९५ |
| एकूण खेळते भांडवल | रु. | ४६,११,२७८ |

डिव्हिडंड सन १९६९–७० सालाकरिता ८%

**आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात**

सोने-चांदीच्या जिनसांच्या, व्यापारी मालाच्या व मुदत ठेव व गव्हर्नमेंट सिक्यु. तारणावर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

( १ ) के. जी. जानकर, ऑ. मॅ. डायरेक्टर, ( २ ) ग. रा. वाळी, ( ३ ) मा. ह. कौतम, ( ४ ) वा. द. आराध्ये, ( ५ ) ना. वि. वुदगीकर, ( ६ ) ति. बा. भोळा, ( ७ ) ज. मा. शहा, ( ८ ) ग. रा. खडकीकर,

कृ. ल. सिद्रम, मॅनेजर. सि. आ. अष्टुगरळा, प्रेसिडेंट.

# चित्रपटांच्या चंदेरी दुनियेमागील कठोर व्यवहार

## ह्या धंद्याला धंदा म्हणावे की जुगार !

*चित्रपटाच्या धंद्याबद्दल बऱ्याच गूढरम्य पण अवास्तव कल्पना सामान्य प्रेक्षकांच्या डोक्यात घोळत असतात. लोकप्रिय नट-नटी, त्यांची संपत्ती, त्यांच्या गाड्या, त्यांचे आत्मवृत्त, अशा हजारो गोष्टींविषयी प्रेक्षकांना विलक्षण कुतूहल असते. चंदेरी दुनियेत वावरणाऱ्या लोकांबद्दलची जिज्ञासा आळशी मनोरंजनाच्या स्वरूपाचीच असते. ह्या झगमगणाऱ्या पडद्यामागील रुक्ष व्यवहार कसा असतो ते पहा.*

हिंदमधील चित्रपटाचा धंदा अडचणीच्या परिस्थितीत सापडला आहे. गेली कित्येक वर्षे त्याची वाटचाल ह्याच दिशेने चालू आहे. म्हणूनच की काय कोण जाणे; पण धंद्याच्या भवितव्याविषयी सरकारला अगर चित्रपटाच्या धंद्यातील दादांना काही चिंता वाटत असल्याचे दिसत नाही. चित्रपटाचा धंदा हा झगमगणारा म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या झगमगाटावरच तो चालू राहात असला तरी त्यावर पडलेल्या दाट सावटाचे निराकरण करण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाही. ह्या धंद्याला सिनेगृहाच्या गल्ल्यात जमा होणाऱ्या पैशाच्या रूपाने दरसाल सुमारे १३० कोटी रुपयांची प्राप्ती होते ही गोष्ट खरी आहे. धंद्यात १०० कोटी रुपयांपेक्षा काहीसे कमी भांडवल गुंतलेले आहे. स्टुडिओ, जमीन, चित्रपट-निर्मितीची उपकरणे, इत्यादी कायम स्वरूपात ते गुंतलेले आहे. इतक्या भांडवलावर त्याला होणारी प्राप्ती चांगल्या दराने होते असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु व्यथा अशी आहे की धंदा चालविला जातो तो धंद्यासारखा चालविला जात नाही, जुगाराच्या अड्ड्यासारखा चालविला जातो.

### धंदा नव्हे, जुगार !

१९३० च्या आगेमागे हा धंदा १०-१२ चांगल्या रीतीने व्यवस्थापन केल्या जाणाऱ्या कंपन्यांच्या हाती होता. ह्या कंपन्या दरसाल सुमारे १५० चित्रपट निर्माण करीत असत. आता परिस्थिती पालटली आहे. चित्रपटांची वार्षिक निर्मिती ३०० च्या आसपास घोटाळत आहे. निर्मात्यांची संख्या मात्र १,५०० च्या घरात पोचली आहे. अल्पावधीत गबर होण्याच्या हेतूने झपाटलेले साहसी लोक ह्या धंद्यात उतरले आहेत आणि त्यांनी सगळा गोंधळ उडवून दिला आहे. सर्व जगातच चित्रपट आणि जोखीम घेणारे भांडवल ह्यांचे संबंध कमी-अधिक प्रमाणात नेहमीच जडलेले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे १९४६ साली भारतात ही गोष्ट लाजिरवाण्या रीतीने उघड झाली. त्या वेळी ह्या धंद्यात १०२ निर्माते वावरत होते. त्यांपैकी निम्मे-अधिक निर्माते व्यवसायातून एकदम बाद झाले. लगेच त्यांची जागा नव्या आणि संख्येने अधिक निर्मात्यांनी घेतली. त्याच वेळी ह्या धंद्याला एक प्रकारचा मोठा उत्साहजनक धक्का बसला. चित्रपटासाठी लागणाऱ्या कच्च्या फिल्मचा सुकाळ झाला आणि दडविलेली उत्पन्नेही वाढू लागली. त्यामुळे चित्रपटांची निर्मिती एकाएकी दुप्पट होऊ लागली. पण युद्धोत्तर तेजीच्या वातावरणाचा फायदा घेण्यासाठी ह्या धंद्यात नव्याने पडलेल्या प्रत्येकी चार निर्मात्यांपैकी तिघा जणांना पहिला चित्रपट तयार केल्याबरोबर लगेच आपला गाशा गुंडाळावा लागला. त्यांपैकी फक्त १८ निर्मात्यांना ओळीने चार वर्षे धंदा करण्याचे जमले. बाकीचे सत्र बारगळले. तेव्हापासून ह्या धंद्यातील बालमृत्यूंचे प्रमाण खूपच टिकून राहिले आहे. इंडिअन मोशन पिक्चर प्रोड्युसर्स असोसिएशन ह्या संघटनेच्या सदस्यांची जी उलाढाल होत आहे यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. ही संघटना एक फार जुनी संघटना असून तिची अंदेवाईक इभ्रत चित्रपटांच्या दुनियेत चांगली आहे. तरीसुद्धा संघटनेतील सदस्यांच्या एकूण संख्येपैकी एकचतुर्थांश सभासदांची नावे पटावरून दरसाल काढून टाकण्यात येतात. का, तर अवघी २०० रुपयांची वार्षिक वर्गणी न दिल्याबद्दल ! आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. आज घडीला ५०० अपूर्ण चित्रपट डब्यांत पडून आहेत. त्यांपकी बहुतेक चित्रपट कधीकाळी पडद्यावर दाखविले जाण्याची शक्यता फारच कमी आहे.

### अनभिज्ञ निर्माते पस्तावतात

बहुतेक निर्माते पहिल्या चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळीच चांगला धडा शिकतात व आपले हात भाजून घेतात. ह्या धंद्यातील कलेचे मर्म आत्मसात तर राहोच, पण ते शिकण्याचे अल्पसे सुध्दा कष्ट ते घेत नाहीत. ह्याचा अर्थ मर्मज्ञ निर्माते नेहमीच यशस्वी होतात असा मात्र नाही. द्यूतातील दान देणाऱ्या भारलेल्या फाशांप्रमाणे त्यांच्या विरुद्धही कठीण परिस्थिती दंड ठोकून उभी असतेच. सिनेगृहांच्या गल्ल्यात येणाऱ्या प्रत्येक रुपयातील हिस्से ठरलेले आहेत. सरासरी ५४ पैसे कराच्या रूपाने सरकारला मिळतात., २७ पैसे प्रदर्शक घेऊन जातो, आणि ४ पैसे वितरक आपल्या कनवटीला लावतो. ह्याचा अर्थ असा की एकूण गल्ल्यापैकी फक्त १५ टक्के रक्कम निर्मात्याच्या हातात पडते. ह्या पैशातूनच त्याला आपला खर्च परत मिळवावयाचा असतो आणि पुढील चित्रपटाला लागणाऱ्या पैशाची व्यवस्था करावयाची असते. तरीसुद्धा निर्मात्यांची संख्या वाढत जाते. ह्याचे रहस्य चित्रपटांच्या निर्मितीसाठी ज्या विशिष्ट तऱ्हेने पैसा पुरविला जातो त्या तऱ्हेत शोधावे लागेल. पुष्कळदा

## दीपावली अभीष्ट चिंतन

वैयक्तिक व सामाजिक अशा कुठल्याही जीवनाचा आपण विचार केला तर सहकार हाच त्याचा मूलाधार आहे असे आढळून येईल. या सहकाराचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच—

# दि डेक्कन को-ऑप. स्पिनिंग मिल्स लिमिटेड.,

इचलकरंजी, जिल्हा : कोल्हापूर

चात्यांची संख्या ... ५४,५२०

| | | |
|---|---|---|
| रा. द. गोवंडे | ग. कृ. कांबळे | अ. रा. भिडे |
| मॅनेजर | व्हाइस चेअरमन | चेअरमन |



# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३०

—प्रगतीचे बोलके आकडे—

(१) ठेवी :—५८ लाखाचे वर

(२) कर्जे :—३८ लाखाचे वर

(३) खेळते भांडवल :—६८ लाखाचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सुलभ हप्त्याने वस्तू खरेदी योजना चालू करण्यात आली आहे.

समक्ष भेटा अथवा लिहा.

| मुख्य कार्यालय : | शाखा : |
|---|---|
| कॉसमॉस बँक बिल्डिंग, | पर्वतीदर्शन शाखा, |
| कुंटे चौक, | ४८९-अ पर्वतीदर्शन |
| [फोन नं. ५६२८३] पुणे ३० | [फोन २७३८६] पुणे ९ |

| | |
|---|---|
| अ. वा. देहाडराय | व. गं. बर्वे |
| कार्याध्यक्ष | व्यवस्थापक |



पुणे जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि., पुणे

सह्याद्री सदन, टिळक रस्ता, पुणे ३०

"सत्फलाय सहकारिता"

पुणे जिल्ह्यातील कृषि-औद्योगिक समाज निर्मितीचे कामी अग्रेसर असणारी व शेतीविकास कार्याला शेतकऱ्यांना साहाय्य करणारी जिल्ह्यातील एकमेव सहकारी संस्था

# पुणे जिल्हा सहकारी भू-विकास बँक लिमिटेड, पुणे

सह्याद्री सदन, टिळक रोड, पुणे-३० :: फोन नं. ५५०७१

—बँकेच्या प्रगतीचे बोलके आकडे (लाखात.)—

| | |
|---|---|
| (१) भाग भांडवल | ७०·९१ |
| (२) इमारत व इतर निधी | ५·६१ |
| (३) मुंबई बँक कर्ज | ४५९ |
| (४) सभासद येणे कर्ज | ४,६९·४१ |
| (५) बाहेरील गुंतवणूक | ३४·५१ |
| (६) वसुली | ८१·८९ |

या बँकेच्या एकूण १९ शाखा अस्तित्वात असून या शाखातर्फे ही बँक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करून हरित क्रांतीच्या यशस्वी वाटचालीसाठी झटत आहे.

वेळेवर कर्जफेड म्हणजेच दुसऱ्या शेतकरी बांधवांस कर्ज मिळण्यास संधी. म्हणजेच परस्पर सहकार.

| | |
|---|---|
| प्रभाकरराव गायकवाड | आमदार शंकरराव भेलके |
| मॅनेजर | बी. ए., चेअरमन |



आमचे भागधारक, खातेदार व हितचिंतकांस ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व उन्नतीचे जावो.

# दी पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

२५, शुक्रवार पेठ,

महात्मा फुले मार्केट समोर, पुणे १.

★ सेवा, सहकार व तत्परता ही ध्येये बाळगून महात्मा फुले मार्केट व परिसरातील ग्राहकांचे सोयीसाठी सकाळ व संध्याकाळ काम करणारी व ५० व्या वर्षात पदार्पण करणारी आपलीच विश्वासपात्र बँक.

ऑडिट वर्ग "अ"] [दूरध्वनी क्र. ५५७०१

* आर्थिक संचय व विनियोग *

| | |
|---|---|
| (१) खपलेले भागभांडवल | रु. ४,३५,९३० |
| (२) गंगाजळी व अन्य निधी | रु. २,१९,३९१ |
| (३) खेळतें भांडवल | रु. ३१,४१,१८१ |
| (४) निव्वळ नफा | रु. ८८,७११ |

| | | |
|---|---|---|
| प्र. मो. रवडे | द. मा. थोरात | य. वा. जेधे |
| कार्यवाह | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |

निर्माता स्वतःचा काहीच पैसा नसताना अगर थोडा पैसा असतानाच चित्रपट काढण्यास प्रारंभ करतो. स्टुडिओत चित्रपटाचे चित्रीकरण होत असताना ते जसजसे होत जाते त्याप्रमाणे निर्माता वितरकांकडून पैसे घेत असतो. म्हणजे वितरकावर पैशासाठी तो सर्वस्वी अवलंबून असतो. चित्रपट पुरा करण्यासाठी वितरकाने पैसे दिले तरच तो चित्रपट पूर्ण होणार असतो. वितरक ३६ टक्के व्याजाच्या दराने आणि होणाऱ्या नफ्यातील निर्मात्याचा हिस्सा कमी करणाऱ्या अटीवर पैसे देण्यास तयार असतो. पण त्यातही एक गोम आहे. निर्मात्याने एकदोन लोकप्रिय नटांबरोबर करार केलेले असले पाहिजेत; आणि शिवाय चित्रपटाचा विषय असा असला पाहिजे की त्यामुळ गाणी, नृत्ये आणि उत्तान हावभाव ह्यांना भरपूर वाव मिळाला पाहिजे. या सर्व कथेत निर्मात्याच्या लोकाभिरुचीबद्दलच्या कल्पनांना कोठेच स्थान नसते. ह्या बाबतीत वितरकाच्या ज्या कल्पना असतील त्याच प्रभावी ठरतात.

### दुष्ट चक्र

हिंदी चित्रपटाच्या धंद्यात वितरकाला भांडवल पुरविणारा म्हणून मिरविण्याची भारी हौस असते. त्याचा परिणाम असा होतो की उच्च दर्जाचे कलावंत भ्रष्ट आणि गैरवागणूक करणारे होतात. लोकप्रिय कलावंतांना हे माहीत असते की चित्रपटाचे भवितव्य निर्मात्यांशी होणाऱ्या त्यांच्या पैशाच्या व्यवहारावर सर्वस्वी अवलंबून असते. ह्याचा फायदा घेऊन ते भरमसाट मेहनताना त्यांची मागणी करतात; पुष्कळदा त्यांना असा अफाट मेहनताना मिळतोही. कलावंतांपैकी फारच थोडे मिळालेल्या पूर्ण पैशाची पावती देतात. प्रत्यक्ष घेतलेल्या पैशांपैकी अगदी थोड्या रकमेचीच पावती ते देतात. ह्या खेळात प्रथितयश दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, उसना आवाज देणारे गायक आणि दृश्ये टिपणारे कॅमेरावालेही सामील असतातच. उसन्या भांडवलावर द्यावयाच्या भरमसाट व्याजाची नोंद निर्मात्याला आपल्या हिशेबाच्या पुस्तकात करता येत नाही हे सांगावयास नकोच. ह्या सर्वांचा परिणाम असा होतो की, देशात निर्माण करण्यात येत असलेल्या बहुतेक चित्रपटांचा दर्जा अगदीच सुमार असतो. तयार झालेल्या चित्रपटांपैकी ३५ टक्केच चित्रपटगृहापर्यंत पोचतात आणि नफातोट्याच्या बाबतीत रमारमी करतात. ना नफा ना तोटा अशी त्यांची अवस्था होते. फार तर २० टक्के चित्रपट गुंतविल्या गेलेल्या भांडवलावर १५ टक्के अगर अधिक निव्वळ नफा कमावतात. फक्त ५ टक्के चित्रपटच लोकप्रियतेचे उच्चतम शिखर गाठतात.

### दर्जा कसा सुधारेल ?

ह्या आजारी धंद्याचे आरोग्य पुन्हा मिळविण्यासाठी एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घेतली पाहिजे. चित्रपटांचे उत्पादन दरसाल वाजवीपेक्षा अधिक होते हे लक्षात घेतले पाहिजे. निदान २०० तरी चित्रपट अधिक निर्माण होत असतात. युद्धकाळी चित्रपट काढण्यासाठी परवाना पद्धती अमलात आणण्यात आली होती. तशीच पद्धत पुन्हा अमलात आणल्याशिवाय चित्रपटांचा दर्जा अधिक चांगला राखणे, त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे आणि ह्या धंद्यात लायक व गुणी माणसे आकृष्ट करणे साध्य होणार नाही. १९५१ साली पाटील कमिटीने ह्या धंद्याचा सोलवट विचार केलेला आहे. कमिटीने परवाना पद्धतीचा विचार केला होता. परंतु अशी पद्धत अमलात आणणे कठीण असल्याचे कारण दाखवून तिने ती रद्द ठरविली होती. कमिटीच्या मताने ही पद्धत पक्षपात आणि भेदभावविषयक आरोप ओढवून घेतल्याशिवाय अमलात आणणे शक्य होणार नाही. दोन वर्षांपूर्वी ह्या धंद्यात मोठाच पेचप्रसंग उत्पन्न झाला. गल्ल्यात गोळा होणाऱ्या पैशाची वाटणी कशी करावी ह्या विषयी निर्माते, वितरक आणि प्रदर्शक ह्यांच्यात वाद उत्पन्न झाला. त्याचा परिणाम म्हणून मुंबईतील दोन महिनेपर्यंत चित्रपट निर्मितीचे स्टुडिओ बंद करण्यात आले. त्यामुळे धंद्याचे दुखणे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले. आता ह्या धंद्याचे आपोआप नियमन करणारी योजना कार्यवाहीत आणण्याचे प्रयत्न होत आहेत. पण ज्यांचे हितसंबंध ह्या धंद्यांत गुंतले आहेत, त्यांना ह्या प्रयत्नाबद्दल फारशी आशा वाटत नाही. कारण, हितसंबंधी गटांना सध्या जे फायदे मिळत आहेत त्यांच्यावरील आपली पकड सोडण्यास ते तयार नाहीत.


## श्री. वा. काळे, संपादक अर्थ, ह्यांची लोकप्रिय पुस्तके

★ १. कण आणि क्षण
★ २. पुढे पाऊल
★ ३. तुमचे स्थान कोणते ?
★ ४. जया अंगीं मोठेपण
★ ५. दाणे आणि खडे
★ ६. कौटुंबिक हितगुज
★ ७. रणजी
★ ८. नवी घडी नवे जीवन
★ ९. सुखी जीवननी पगदंडी ( गुजराती )
★ १०. सदाचारने पगले ( गुजराती )

११. नव्या जीवनाची शानदार घडी —( लवकरच प्रसिद्ध होणार )

**अभिनव पुस्तक मंदिर, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४**

महाराष्ट्र राज्यातील एक आदर्श अर्बन सहकारी बँक

# धी भुसावळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्टेशन रोड, भुसावळ [ जि. जळगांव ]

फोन नं. ३६ ] स्थापना १९१५ [ पोस्ट बॉक्स नं. ३

: ३०-६-७० चे बोलके आकडे :

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल | ३,००,०००·०० | इतर रिझर्वज् | ३,६१,०३८·०० |
| खपलेले | २,२५,७२५·०० | ठेवी [ सर्व प्रकारच्या ] | ५९,२७,१५८·०० |
| रिझर्व फंड | २,७०,२७९·०० | खेळते भांडवल | ७०,९०,२८८·०० |

: डायरेक्टर मंडळ व अधिकारी :

| | | | |
|---|---|---|---|
| १ श्री. सदाशिव दामोदर नाईक | चेअरमन | ६ श्री. दत्तात्रय गोविंद फालक | डायरेक्टर |
| २ श्री. प्रभाकर सेनू महाराज | व्हाईस चेअरमन | ७ श्री. देविदास नामदेव भोळे | „ |
| ३ सदाशिव विठ्ठल वाढ | डायरेक्टर | ८ श्री. निवृत्ति रामचंद्र फालक | „ |
| ४ श्री. नामदेव पुरुषोत्तम फालक | „ | ९ श्री. मोहनलाल बन्सीलाल अग्रवाल | „ |
| ५ श्री. वैद्य ब्रह्मदत्त शर्मा शास्त्री | „ | १० श्री. विश्वनाथ सदाशिव पाटील | मॅनेजर |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

व्ही. एस. पाटील
मॅनेजर

एस. डी. नाईक
चेअरमन

धी भुसावळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., भुसावळ



# दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी

घेता सहकार व्रत, अभ्युदय ये चालत

परभणी जिल्ह्यात ग्रामीण क्षेत्रांत सहकारी चळवळीचा अविरत प्रसार व प्रचार करणारी, शेती उत्पादन व सहकारी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देत असलेली, तसेच ठेवीदारांच्या विश्वासास पात्र ठरलेली जिल्ह्यातील एकमेव सहकारी संस्था

# दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,

— परभणी —

जिल्ह्यात सर्वत्र विखुरलेल्या आपल्या २१ शाखांमार्फत सेवेसाठी सदैव तयार आहे.

—: दिनांक ३८-८-७० अखेर सांपत्तिक परिस्थिती :— ( रक्कम लाखात )

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | ... | ... | रु. १००·२८ |
| गंगाजळी व इतर निधी | ... | ... | रु. १७·१८ |
| ठेवी | ... | ... | रु. ,२०८·७१ |
| उचललेली कर्जे | ... | ... | रु. ३४७·९९ |
| वाटलेली कर्जे | ... | ... | रु. ५६१·१३ |
| खेळते भांडवल | ... | ... | रु. ६७४·१८ |

व्याजाचे आकर्षक दर द. सा. द. शे. ४ ते ७ पर्यंत—अवश्य भेटा.

शा. शे. ताडलिंबेकर
व्यवस्थापक

माणिकराव शंकरराव मस्के
व्हा. चेअरमन

शिवाजीराव नागोराव दुधगांवकर
चेअरमन

# सहकारी बँका आणि पतपेढ्या ह्यांची सद्यःस्थिती

### प्राथमिक संस्थांची दर्शनी प्रगती, पण सुस्थिती नाही

सर्व प्रकारच्या सहकारी बँका आणि पतपेढ्या ह्यांची संख्या १९६८-६९ मध्ये ४,०९८ नी कमी होऊन ती १,८९,३३० झाली. त्यांची सभासद संख्या ४ कोटी, २२ लक्ष होती. त्यांचे एकूण खेळते भांडवल २,७८१ कोटी रु. चे ३,३९४ कोटी रु. झाले; म्हणजे त्यात ६१३ कोटी रु. ची वाढ झाली. त्यांचे स्वतःचे भांडवल ७४ कोटी रु. नी वाढून ते ६२७ कोटी रु. झाले. ठेवी, डिबेंचर्स, कर्जे, इ. ची रक्कम ५३४ कोटी रु. नी वाढून ती २,७६६ कोटी रु. वर गेली.

३० जून, १९६९ रोजी भारतात २५ राज्य सहकारी बँका होत्या, त्यांच्या सभासद-पटावर १२,७११ बँका व सोसायट्या होत्या व ८,५५८ व्यक्ती होत्या. त्यांचे खेळते भांडवल १२३ कोटी रु. नी वाढले. ठेवींचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण ४०·५% वरून ३८·१% वर उतरले.

३० जून, १९६९ रोजी भारतात ३४१ मध्यवर्ती सहकारी बँका होत्या. त्यांनी १९६८-६९ मध्ये २७५ नवीन शाखा उघडल्या, म्हणजे मुख्य कचेऱ्यांसह त्यांच्या कचेऱ्यांची संख्या ३,१२४ झाली. महाराष्ट्रात ५०, गुजरातमध्ये ४८, तामिळनाडूमध्ये ४०, बिहारमध्ये २२ आणि पंजाबमध्ये २१ शाखा उघडण्यात आल्या.

### आकड्यात दिसणारी परिस्थिती

खालील तक्त्यातील सरासरीच्या आकड्यांवरून पतपेढ्यांनी गेल्या वर्षी केलेल्या प्रगतीची कल्पना येईल :—

( आकडे रुपयांचे )

| अखिल भारतीय सरासरी | १९६७-६८ | १९६८-६९ |
|---|---|---|
| प्रत्येक सोसायटीमधील सभासद- | | |
| संख्या | १६३ | १७४ |
| ,, ,, खेळते भांडवल | ४१,२८० | ४८,४१४ |
| भाग भांडवल | | |
| ( १ ) प्रत्येक सोसायटी | ८,५९२ | ९,९७३ |
| ( २ ) प्रत्येक सभासद | ५३ | ५७ |
| ठेवी | | |
| ( १ ) प्रत्येक सोसायटी | २,७४५ | ३,३८८ |
| ( २ ) प्रत्येक सभासद | १७ | १९ |
| प्रत्येक कर्जदार सभासदाचे कर्ज | ३९७ | ४५४ |

१,६७,७६० सोसायट्यांपैकी २१,०६१ सोसायट्या निष्क्रीय होत्या. त्यांचे क्षेत्र ४२,७८० खेडेगावांवर पसरलेले होते.

एकूण सोसायट्यांपैकी ३२%सोसायट्या नफ्यात चालू नव्हत्या.






—दिपावली व नूतन वर्षारंभप्रसंगी शुभेच्छा—

आपल्या सेवेसाठी सदैव सज्ज असणारी
कोल्हापुरातील एक अग्रगण्य सहकारी बँक

## श्री महावीर को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

हेड ऑफिस : ६८१ ई शाहूपुरी, कोल्हापूर. फोन नं. १५२२
शाखा : (१) लक्ष्मीपुरी, कोल्हापूर. फोन नं. १९५
(२) जयसिंगपूर, फोन नं. ३७६, २४५

अधिकृत व रोख भाग भांडवल —२ लाख
रिझर्व्ह आणि इतर फंडस् —४ लाख, ९२ हजार
एकूण ठेवी —१ कोटी, २२ लाखांचे वर
खेळते भांडवल —१ कोटी, ४५ लाखांचे वर

हेड ऑफिसकडे सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.

सुधाकर खोत
प्रेसिडेंट

ही दिवाळी आणि नवे वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचे जावो.

## श्री वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर.

लक्ष्मीपुरी - कोल्हापूर

| हेड ऑफिस : कोल्हापूर | : तार : | ब्रँच ऑफिस : गडहिंग्लज |
|---|---|---|
| फोन नं. ५०२ | शैव बँक | फोन नं. १८ |

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | १,१८,००० |
| ठेवी | रु. | ४० लाखांचे वर |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,६०,००० |
| खेळते भांडवल | रु. | ४६ लाखांचे वर |

ऑडिट वर्ग "अ"

☆ महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर राज्यांतील प्रमुख शहरांवरील बँक ड्राफ्ट मिळण्याची सोय.
☆ व्यापारासाठी व लघु उद्योगधंद्यासाठी कर्जाचा पुरवठा केला जातो.
☆ हायर पर्चेस स्कीमखाली अल्प हप्त्याने सायकल, शिलाई मशिन, रेडिओ, इलेक्ट्रिक मोटार पंप व इतर जीवनोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा केला जातो.
☆ रिकरिंग ठेव योजना सुरु केली आहे.

| शां. डुं. घाळी | डॉ. एस. एस. घाळी | शां. आ. पाटील चंदूरकर |
|---|---|---|
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

दीपावली अभीष्ट चिंतन

आमचे असंख्य सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दीपावली व नूतन वर्ष आनंदाचे व भरभराटीचे जावो

## श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

स्थापना १९२३

मुख्य कार्यालय : १६७ बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर.
फोन नं. २३७
शाखा : (१) शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर,
फोन नंबर ७०४
(२) मार्केट यार्ड, कोल्हापूर. फोन नंबर २१२५

गंगाजळी व इतर निधी रु. ७ लाख, ९२हजार
ठेवी रु. १ कोटी, १२लाखांहून जास्त
खेळते भांडवल रु. १ कोटी, ३५लाखांहून जास्त

● ● ●

| गो. का. पेंडसे | कृ. प. खासबारदार | वृ. रा. उमराणीकर |
|---|---|---|
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

॥ श्री शिवशक २९५-२९६ ॥

## दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

स्थापना : १९२३ ] 'अ' वर्ग [ फोन : ७१२

बँकेने चालू वर्षी भाऊसिंगजी रोडवरील स्वतःचे इमारतीत पदार्पण केले आहे.

| | | |
|---|---|---|
| बँकेचे अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेले शेअर भांडवल | रु. | २,६६,००० |
| ठेवी | रु. | १८,७१,००० |
| दिलेली कर्जे | रु. | १८,७०,००० |
| खेळते भांडवल | रु. | २५,९०,००० |

नूतन वर्ष आमचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचे जावो.

| बी. ए. पाटील. B. Com. | डी. ए. शिंदे B. A., B. T, |
|---|---|
| मॅनेजर | प्रेसिडेंट |

ऑडिट केलेल्या १,५१,५६९ सोसायट्यांपैकी फक्त २२,९३० सोसायट्या अ अथवा ब वर्गात होत्या. उरलेल्या सर्व १,२८,६३९ ( म्हणजे ८५% ) सोसायट्या क, ड, इ वर्गात होत्या किंवा त्यांना वर्ग दिलाच नव्हता.

ह्या बँकांचे खेळते भांडवल १३५ कोटी रु.नी वाढून ते ७०६ कोटी रु. झाले. दिलेल्या कर्जाची रक्कम ९६ कोटी रु. नी वाढून ती ८२३ कोटी रु. झाली. येणे कर्ज ९१ कोटी रु. नी वाढले. थकबाकीची रक्कम १७३ कोटी रु. होती. म्हणजे ती बँकांच्या स्वतःच्या भांडवलापेक्षा जास्त होती. येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण २७% पडले.

१८९ बँकांकडे प्रत्येकी ५० लक्ष रु. पेक्षा कमी ठेवी होत्या; फक्त ९५ बँकाकडे प्रत्येकी १ कोटी रु. पेक्षा अधीक ठेवी होत्या.

### चिंतनीय बाबी


१,६७,७६० प्राथमिक शेतकी पतपेढ्यांपैकी १,४६,६९९ चालू होत्या. त्यांनी एकूण खेड्यांपैकी ८६% खेडी व्यापली होती. ग्रामीण जनतेपैकी ३३% जनता त्यांच्या कक्षेत आली होती. एकूण सभासदांपैकी ३८% सभासद ( १,१०,८९,००० ) कर्ज घेणारे होते. पतपेढ्यांचे खेळते भांडवल ७०९ कोटी रु. वरून ८१२ कोटी रु. वर गेले. त्यांच्या स्वतःचे भांडवलात २५ कोटी रु. ची भर पडली, पण ठेवीत फक्त ९.६ कोटी रु. ची वाढ झाली. खेळत्या भांडवलाशी ठेवींचे प्रमाण अत्यल्प म्हणजे ७% पडले. थकबाकी १७१ कोटी रु. वरून २१४ कोटी रु. वर गेली; येणे कर्जाशी तिचे पडणारे प्रमाणही वाढून ते ३२% चे ३४.६% झाले.

### राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांविरुद्ध तक्रारी

राष्ट्रीयीकरण झालेल्या व्यापारी बँकांविरूद्ध राज्या-राज्यातील सहकारी बँका कुरकुर करू लागल्या आहेत. पूर्वीच्या व्यापारी बँका ठेवीदारांना अधिक सढळ सवलती देऊ शकत असल्यामुळे एरवी सहकारी बँकांकडे येणाऱ्या ठेवी त्यांच्याकडे आकर्षित होत आहेत अशी सहकारी बँकांची तक्रार आहे. त्यामुळे सहकारी बँकांचा ठेवी गोळा करण्याचा वेगही मंदावला आहे. म्हणून सहकारी बँकांच्या कार्यक्षेत्रात तरी राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या व्यवहारावर बंधने घालण्यात यावीत अशी मागणी पुढे येण्याचा संभव आहे. एकाच विभागात दोन्ही प्रकारच्या बँका काम करत असल्यामुळे काहीशी गोंधळाची परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे. व्यापारी बँका ग्रामीण भागात उतरल्या असल्या तरी अजूनही शेतीसाठी कर्जे देण्यात सहकारी बँकाच आघाडीवर आहेत. सहकारी बँकांतर्फे देण्यात येणाऱ्या अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जात चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेर बरीच वाढ होईल असा अंदाज आहे. सध्या दरसाल ४५० कोटी रुपयांची कर्जे देण्यात येतात, ती ७६० कोटीपर्यंत वाढतील असे दिसते. मुदत संपलेल्या कर्जाची परत-







फेड वेळेवर न झाल्याने अशी रकम फुगत चालली आहे. सहकारी बँकांपुढे हा एक अवघड पेच निर्माण झालेला आहे. १९६७–६८ सालांत राज्यातील सहकारी बँकानी १८० कोटी रुपयांच्या ठेवी मिळविल्या. त्या साली ३५८ कोटी रुपयांची कर्जे येणे होती. १९६८-६९ सालात त्यांनी २१५ कोटी रुपयांच्या ठेवी मिळविल्या. परंतु कर्जाची बाकी ४५९ कोटी रुपयांपर्यंत वाढली. म्हणजे ठेवींचे थकबाकीशी असलेले प्रमाण टक्केवारीच्या भाषेत ४७ टक्क्यांपर्यंत खाली आले.

### कर्जावरील व्याजाचे दर वाढवणार

राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या बँका त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाच्या दरांत वाढ करण्याचा विचार करीत आहेत. दर बहुधा अर्धा ते एक टक्का इतके वाढविण्यात येतील. बँकांतील कर्मचाऱ्यांनी आपल्या वेतनात वाढ करून घेण्यासाठी नुकतीच निदर्शने केली होती. त्याचा परिणाम म्हणून सुमारे १ लाख, ५० हजार बँक नोकरांची प्राप्ती वाढणार आहे आणि ह्या वाढीचा मोठा वार्षिक बोजा बँकांना सहन करावा लागणार आहे. बँकांमधील अधिकारी वर्गही वेतन वाढीची मागणी करीत आहे त्यांच्या मागण्यांचाही विचार होण्याची शक्यता असून त्या मान्य झाल्यास बँकांना आणखी ५ कोटी रुपयांची तरतूद दर साल करावी लागेल. अशा परिस्थितीत कर्जावरील व्याजाचे दर वाढविल्याशिवाय अन्य मार्ग उरलेला नाही असे बँकांचे म्हणणे आहे. व्याजाच्या दरात वाढ करण्यासाठी त्यांना रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्याचे कारण नाही. तथापि शेती, छोटे उद्योगधंदे आणि निर्यात करणारे उद्योगधंदे ह्यांना स्थिर दराने कर्जाचा पुरवठा करण्यात येत असतो. त्यांना दरवाढीची झळ पोचणार नाहीं. ह्याचा अर्थ असा की बँकांकडून देण्यात येणाऱ्या इतर कर्जावरील व्याजाचे दर मात्र वाढणार आहेत. छोटे ऋणको आणि मोठे ऋणको ह्यांना वेगवेगळ्या म्हणजे अनुक्रमे कमी व अधिक व्याजाचे दर असावे अशी सूचना करण्यात येत आहे. साखर कारखाने, कापड गिरण्या हे बडे ऋणको समजले जातात. ह्या सर्वांचा परिणाम किमती वाढून चलनवृद्धी वाढीस लागण्याची शक्यता आहे.

---

### बँक पाहताच ओकारी

अमली पदार्थांचे व्यसन असणारांवर आणि जुवेबाजांवर मानसिक प्रक्रिया घडवून आणल्या तर त्या पदार्थांबद्दल आणि जुवेबाजीबद्दल मनात घृणा उत्पन्न करता येते असे मानसशास्त्रज्ञ डॉ. बॅरी सिंगर ह्यांनी दाखवून दिले आहे. बँकेवर दरोडा घालणाऱ्या दरोडेखोर कैद्यांवर असेच उपचार केले तर बँक अथवा पिस्तूल त्याच्या दृष्टीस पडताच त्याला भयंकर ओकाऱ्या होऊ लागतील. व तो तात्काळ आजारीच पडून निष्क्रीय बनेल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे गुन्हेगार पुनः बँकेकडे वळणारच नाहीत.


# दि रत्नाकर बँक लिमिटेड

( स्थापना सन १९४३ )

( शेड्यूल्ड बँक )

रजि. ऑफिस–रत्नाकर बँक बिल्डिंग, शाहूपुरी कोल्हापूर

शाखा : कोल्हापूर शहर, सांगली, जयसिंगपूर, मिरज, पेठवडगांव, हुपरी, रुकडी व इचलकरंजी

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ५,०३,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ४,७७,००० |
| एकूण ठेवी | रु. | १,५०,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,७१,००,००० |

बी. एन्. गरगटे
चेअरमन व चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर

# दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पेण

( फोन नं. ४ )

- ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर
- देशातील कोणत्याही प्रांतातील बिल वसुलीची व्यवस्था.
- सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
- लॉकर्सची उत्तम सोय.
- आपल्या सेवेस सदैव तयार.

प्र. ना. खारकर, चेअरमन — हि. हे. शहा, मॅनेजिंग डायरेक्टर — श्री. मा. लिमये, मॅनेजर

# विधि-मंडळात प्रभावी ठरलेले निर्णायक एक मत !

## इतिहासाचा प्रवाह बदलणाऱ्या काही घटना एका मताच्या ततूंवर हेलकावे खात होत्या !

हिंदमधील माजी संस्थानिकांचे तनखे आणि खास सवलती रद्द करण्याच्या हेतूने राज्यघटनेत बदल करणारे बिल लोकसभेत रीतसर मंजूर झाले. पण राज्यसभेत केवळ एक मत कमी मिळाल्याने ते नामंजूर झाले. हिंदमधील विधि-मंडळात अशा प्रकारची ही बहुधा पहिलीच घटना असेल. राज्यसभेतील ह्या नाट्यपूर्ण निर्णयावर ३०० माजी संस्थानिकांचे भवितव्य अवलंबून होते. त्यापैकी २७८ संस्थानिक तनख्याचे अधिकारी होते. तनख्यापोटी संघ सरकारला दरसाल ४८१ लाख रुपये संस्थानिकांना द्यावे लागत होते. राज्यसभेत घटनादुरुस्ती बिल मंजूर होण्यावर इतकी रक्कम कायमची वाचण्याचे अवलंबून होते; त्यापेक्षाही सरकारला मिळणाऱ्या राजकीय विजयाचे महत्त्व फार मोठे होते. राज्यसभेतील मतदानांत अनिश्चितता डोकावत होती. १५ सभासद गैरहजर होते; पण त्यांचा इलाज नव्हता. शिवाय निरनिराळ्या राजकीय पक्षांचे सभासद अमूकच बाजूला मत देतील अशी शाश्वतीही नव्हती. भारताच्या विधि-मंडळातील मतदानाची फलश्रुती बऱ्याच 'जर तर' वर हेलकावे खात होती.

हा सगळा एका मताचा प्रताप. इतर देशांच्या कायदे-मंडळांतही काही ऐतिहासिक निर्णय एका मताने इकडचे तिकडे फिरलेले आढळून येतात. १६४९ मध्ये इंग्लंडचा सर्वसत्ताधीश राजा चार्ल्स (१ ला) याला फासावर लटकावण्याची शिक्षा फर्मावण्यात आली. त्या वेळी ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये राजाला सहानुभूती दाखविणारे ६७ सभासद होते. परंतु त्याच्याविरुद्ध ६८ मते पडल्यामुळे चार्ल्सला आपला मुकुट आणि डोकेही गमवावे लागले. ह्या सर्व क्रांतिकारी प्रसंगात ऑलिव्हर क्रॉम्वेल हा प्रमुख सूत्रधार होता. गंमत अशी की, त्याला ह्याच पार्लमेंटने १६४५ साली, सैन्याचा अधिपती नेमून राजाला गादीवर चढविण्याची अगर खाली ओढण्याची कर्तुमाकर्तुम् शक्ती दिली होती आणि तीही केवळ एका मताच्या अधिक्याने ! इंग्लंडच्या इतिहासात एका मताच्या कमीअधिक तंतूवर निर्णय केले गेलेले आणखीही एक प्रकरण आहे. हा प्रसंग १७०१ मध्ये उद्भवला. त्या साली हॅनोव्हर राज घराण्याच्या, इंग्लंडच्या गादीवरील हक्काला मान्यता देणारा कायदा मंजूर करण्यात आला. ॲक्ट ऑफ सेटलमेंट ह्या नावाने तो प्रसिद्ध आहे. तोही कायदा अवघ्या एका मताने मंजूर करण्यात आला. पुढे १७१४ साली पहिला जॉर्ज गादीवर आला आणि ह्या घराण्याच्या १८७ वर्षांच्या कारकीर्दीला प्रारंभ झाला.

फ्रान्समध्ये १८७५ साली राजसत्ता रद्द करण्यात आली आणि तिच्या जागी सामर्थ्यसंपन्न अध्यक्षीय पद्धती अमलात आली. हा बदलही फ्रान्सच्या कायदे-मंडळात अवघ्या एका मताच्या आधिक्याने घडवून आणण्यात आला. त्यापूर्वी वर्षापर्यंत ह्या विषयावर वादंग चालू होते ते अखेर संपले. अशाच एका मताच्या फरकाने फ्रान्सच्या तिसऱ्या लोकसत्ताक राजवटीचा जन्म झाला. नियती अशी की, १९४० साली ह्या प्रजासत्ताकाचा अंतही अवघ्या एका मताच्या उणिवेनेच झाला. अमेरिकेच्या इतिहासात तर एका मताच्या प्रभावाने इतिहासाचा प्रवाह बदलल्याची कितीतरी उदाहरणे सापडतात आणि आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. अमेरिकेच्या अध्यक्षांपैकी तिघांची निवडणूक एका मताच्या अधिक्याने झालेली आहे. १८०० साली थॉमस जेफर्सन, १८२६ साली जॉन क्विन्सी ॲडम्स आणि १८७६ साली रुदरफोर्ड हेज ह्यांची निवडणूक एका मताच्या अटीतटीने झाली. अमेरिकेच्या संघ-राज्यात वेळोवेळी नवीन घटक राज्यांना प्रवेश देण्यात आला. त्यापैकी पाच राज्यांचा म्हणजे लुइशिआना, ऑरेगॉन, वॉशिंग्टन, इडाहो आणि टेक्सास ह्या राज्यांचे संघराज्यातील पदार्पण एका मताच्या बळाने झाले. काही राज्यांच्या प्रवेशाच्या वेळी ज्या सिनेटरांचे मत-निर्णय ठरले त्यांची नावेही नमूद करण्यात आलेली आहेत.

अलीकडच्या म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळातही असाच प्रकार घडलेला दिसतो. अमेरिकेत सिलेक्टिव्ह ट्रेनिंग ॲंड सर्व्हिस ॲक्ट अमलात होता. पण त्याची मुदत संपत आलेली होती. ह्या कायद्याची मुदत १८ महिन्यांनी वाढविण्याचा प्रश्न अमेरिकन कॅाँग्रेसपुढे होता. १२ ऑगस्ट, १९४१ ह्या दिवशी काँग्रेसमध्ये मुदतवाढीच्या प्रश्नावर मतदान होऊन २०३ विरुद्ध २०२ मताने मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. हा दिवस अमेरिकेच्याच केवळ नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा ठरला. कारण, संबंधित कायद्याची मुदतवाढ न होती तर अमेरिकेसकट सर्व जगावर जर्मनी आणि जपानकडून पादाक्रांत होण्याचा प्रसंग गुदरला असता. कायद्याची मुदत वाढविण्यात आल्यावर काही महिन्यांनीच जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर येथील नाविक तळावर अचानक हल्ला चढविला. ह्या भीषण प्रसंगाला योग्य तयारीने तोंड देण्याची तयारी मुदतवाढ झालेल्या कायद्याच्या अभावी अमेरिकेला करता आली नसती आणि परिस्थिती अधिकच भयानक झाली असती. कदाचित् दुसऱ्या महायुद्धाने निराळीच दिशा घेतली असती व सर्व जगावर दुःखद संकट ओढवले असते. परंतु सुदैवाने अमेरिकन काँग्रेसने कायद्याची मुदत वाढविली. मुदतवाढीसंबंधी अनेक दिवस वादंग माजले होते आणि ती होईलच अशी खात्री देता येणे कठीण होते.

---

ही दिवाळी आमचे सभासद बंधू, ग्राहक व हितचिंतक यांना सुखाची व भरभराटीची जावो.

पांढरी शुभ्र दाणेदार साखर निर्मितीसाठी
अल्पवधीतच भारतात लोकप्रिय ठरलेला

**कुंभी-कासारी सहकारी साखर-कारखाना लिमिटेड, कुडित्रे**

पोस्ट–कुडित्रे, तालुका–करवीर, जिल्हा–कोल्हापूर.
महाराष्ट्र

शंकरराव दृ. पाटील
शिंगणापूर
चेअरमन.

मा. शं. वैद्य,
कार्यकारी संचालक.

मा. धों. खाडे,
व्हाइस चेअरमन.

पणतीवरती पेटे पणती ॥
ऊजळून गेली हिरवीकांति ॥
घराघरांतून तेवत आहे ॥
सहकाराची अखंड ज्योति ॥
पंचगंगेच्या परिसरात
★ सहकाराद्वारे उद्योगक्षमता ★
★ सहकाराद्वारे संस्कार शुचिता ★
व त्यातूनच
★ सामान्य माणसाच्या जीवनात स्थैर्य निर्माण होऊ शकते, हे सहकारी-तत्त्वाने सिद्ध झाले आहे.
–: त्याचा केंद्रबिन्दू आहे :–

**श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर-इचलकरंजी**
**( जिल्हा कोल्हापूर )**

ही दीपावली व नवे वर्ष सर्वांना सुखसमृद्धी व भरभराटीचे जावो.

रत्नाप्पा कुंभार,
अध्यक्ष

वसंत म. सप्रे
प्रभारी कार्यकारी संचालक

मृ. वि. सुलतानपुरे,
उपाध्यक्ष

दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना सुखाचे व भरभराटीचे जावो !

**सेवा – सहकार – सचोटी**
हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत.   शाखांची संख्या : ३०

# दि बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस : १५० मांदुर गल्ली, बेळगाव.

**प्र ग ती चे पा ऊ ल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. अधिकृत भांडवल | रु. १,७५,००,०००·०० | ४. ठेवी | रु. ५,११,५७,६१३·०० |
| २. वसूल झालेले | रु. ९३,३२,१००·०० | ५. खेळते भांडवल | रु. ९,१५,००,५७७·०० |
| ३. रिझर्व्ह व इतर फंड | रु. १९,७५,८५४·०० | ६. दिलेले कर्ज | रु. ७,३६,३९,०७१·०० |

निव्वळ नफा ११,२२,१९६·००

ही बँक शहरी व ग्रामीण जीवन सुधारणेच्या कामी, त्याचप्रमाणे अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देऊन सर्वतोपरी साहाय्य करीत आहे. तसेच, त्यांच्या मालास योग्य किंमत येऊन त्यांचा धंदा किफायतशीर व्हावा यासाठी सेल सोसायट्या व विविधोद्देश संघांमार्फत विक्री करून देण्याच्या कामी त्यांना मदत करीत आहे.

या बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू व सेव्हिंग्ज बँक ठेवी, एक महिन्यापासून पाच वर्षांवरील मुदती ठेवी व तसेच रिकरिंग ठेवी स्वीकारण्यात येतात. तसेच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहारही केले जातात.

बेळगाव बझार, बैलहोंगल व सौंदत्ती येथील शाखांमध्ये मौल्यवान जिनसांच्या सुरक्षिततेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आमच्या ३० शाखा आहेत.

जी. व्ही. घोडगेरी,
व्हाईस प्रेसिडेंट.

विशेष माहिती बँकेचे ऑफिसमध्ये मिळेल.

एम्. एस्. होसमनी,
प्रेसिडेंट.

## स्फोटकांचा सार्वजनिक मालकीचा कारखाना

खाणीत वापरण्यासाठी लागणारी स्फोटक द्रव्ये तयार करण्यासाठी सार्वजनिक मालकीच्या विभागात एक कारखाना उभारण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. संकल्पित कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १५ हजार टनांची असेल. कारखान्याची जागा अद्याप ठरविण्यात आलेली नाही. परंतु बहुधा ती मध्यभारतात कोठे तरी असेल. कारखान्यासंबंधीचा अहवाल तयार करण्याचे काम एका इंजिनियरकडे सोपविण्यात आले आहे. हा अहवाल पाच महिन्यांच्या अवधीत सरकारला सादर करण्यात येईल. खाणींना लागणारी स्फोटके तयार करणाऱ्या कारखान्यात संप झाल्याने त्यांचा पुरवठा बंद पडला आणि खाणीचे काम चालविणे कठीण होऊ लागले. दरम्यान स्फोटके आयात करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. निकडीच्या गरजा भागविण्यासाठी पोलंड व हंगेरी ह्या देशांकडून ५ हजार टन स्फोटक द्रव्ये आयात करण्यात येणार आहेत. पुढील महिन्यात बहुधा ती भारतात पोचतील. देशातील स्फोटक द्रव्यांची मागणी दरसाल ३३ हजार टनांची आहे. लवकरच ही मागणी ४६ हजार टनांपर्यंत वाढण्याचा संभव आहे. भारतामधील कोळशाच्या खाणींना दरसाल १२ हजार टन स्फोटके लागतात. ५ हजार टन लोखंडाच्या खाणींना लागतात. त्याशिवाय सरहद्दीवरील रस्ते बांधणाऱ्या संघटनेला ३ हजार टन स्फोटके लागतात. स्फोटकांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे संरक्षण-संघटनेचे वरील कामही खोळंबण्याचा संभव निर्माण झाला होता. सुमारे ८ हजार टन स्फोटके रस्ते बांधणीची कामे, नदीखोरे विकास-योजना आणि धरण योजना ह्या कामासाठी लागतात.

---

## खाऱ्या पाण्याचा बागायतीसाठी उपयोग

अमेरिकेतील व्हर्जिनिआ राज्यातील एका शेतकऱ्याने खाऱ्या पाण्याचा उपयोग करून टोमॅटो व मिरी ही पिके घेण्यात यश मिळविले आहे. त्याचे शेत ४०० एकरांइतके मोठे आहे आणि ते नदीच्या मुखाजवळ आहे. शेतातील बागायती पिकांना पाणी देण्याची एक नवीन कल्पना त्याने अवलंबली आहे. शेतात टाकलेल्या नळातून समुद्राचे खारे पाणी आत खेचण्यात येते. मात्र ते पिकांना पाण्याच्या स्वरूपात दिले जात नाही. पिकाच्या मुळांच्या खोलीपर्यंत हे नळ बसविलेले असतात. मुळांच्या पातळीपर्यंत हे नळ भरीव म्हणजे नेहमीसारखे असतात. त्या पातळीच्यावर मात्र नळांना भोके पाडलेली असतात. जमिनीतील उष्णतेमुळे नळातील काही पाण्याची वाफ होते आणि तो नळाच्या वरच्या भागात असलेल्या छिद्रातून जमिनीत पसरते. रात्रीच्या थंड वेळी वाफेचे पाणी होऊन ते मुळांना मिळते. वालुकामय उष्ण प्रदेशात दिवस कडक उन्हाळ्याचा व रात्र थंड असते. तेथे ह्या पद्धतीचा उपयोग होण्यासारखा आहे.

---

### वाचकांस सूचना

**"अर्थ"चा ह्यापुढील अंक**

दिवाळीनिमित्त सुटीमुळे "अर्थ"चा दि. ४ नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही.

त्यानंतर १८ नोव्हेंबरचा अंक नेहमीप्रमाणे प्रसिद्ध होईल.

## करपात्र प्राप्तीची मर्यादा वाढवा

१०,००० रुपयांवरील प्राप्तीवर इनकमटॅक्स असू नये आणि २,००,००० रुपयाखालील मालमत्तेवर संपत्तीकर असू नये, असे कौन्सिल ऑफ दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटसनी सुचविले आहे. ६०% पेक्षा जास्त दराने वैयक्तिक प्राप्तीवर कर-आकारणी होऊ नये आणि हा दर ७०,००० रु. वरील उत्पन्नास लागू करावा, असेही कौन्सिलने सुचविले आहे.

## हिप्पी केस ठेवणारांविरुद्ध मोहीम

दक्षिण व्हिएटनाम सरकारने, तेथील तरुणांपुढे वाईट आदर्श राहू नये ह्यासाठी, परदेशातून येणाऱ्या प्रवाशांना "हिप्पी" पद्धतीचे केस वाढवून आमच्या देशात येऊ नका असा सल्ला दिला आहे. सरकारने त्यासाठी एक मोहीमच उभारली आहे, आणि पहिल्या तीन आठवड्यात १,५४७ व्हिएटनामी तरुणांचे केस सक्तीने कमी करायला लावले आहेत.


शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी
चमन
चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.
बाटली किंमत रु. १-५०
याच्या सेवनाने तहान भागून आवाज सुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान-थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.
इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार
स्टार कंपनी, बेळगाव

### गंगा नदी कानपूरच्या जवळ पुन: आली

१९६२ साली कानपूर जवळून वाहाणाऱ्या गंगेचे पात्र बदलून मोठे संकट निर्माण झाले होते. पात्राच्या ओघाची दिशा बदलल्यामुळे भैरवघाट येथील वीजनिर्मिती केंद्राला पाण्याच्या पुरवठ्याची शाश्वती राहिली नाही. तेव्हा सरकारला गंगेच्या मुख्य प्रवाहापासून वीजनिर्मिती केंद्रापर्यंत एक कालवा खोदावा लागला. त्यासाठी ५ हजार माणसे व माती खणणारी अनेक यंत्रे वापरावी लागली. तेव्हा कोठे ४ मैल लांबीचा हा नवा कालवा तयार झाला. दरम्यान, म्हणजे कालवा तयार होईपर्यंत, विजेच्या शक्तीने चालणारे लहान व मोठे कारखाने बंद पडले. अर्थातच २ लाख कामगारांना १५ दिवसपर्यंत सक्तीची बेकारी अनुभवावी लागली. कारखाने बंद पडल्यामुळे व्यापार व उद्योगधंदे थंडावले आणि कित्येक कोटी रुपयांचे नुकसान झाले. कानपूर हे एक मोठे औद्योगिक शहर असून त्याची लोकसंख्या १० लाखापेक्षा अधिक आहे. शहराचा पाणी पुरवठा व औद्योगिक जीवन विजेच्या सुरळीत पुरवठ्यावर अवलंबून आहे. त्यामुळे गंगेच्या बदलत्या पात्राचा वीजपुरवठ्यावर परिणाम होऊ न देणे अगत्याचे आहे. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून मध्यवर्ती सरकारने उपाययोजना सुचविण्यासाठी एका कमिशनची नेमणूक केली होती. कमिशनने गंगेच्या मुख्य पात्रात एक बंधारा घालून भरवघाट वीजकेंद्राला निश्चित पाणीपुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याची शिफारस केली होती. ह्या कामासाठी १० कोटी रुपये खर्च देणार होता. आता गंगेचे पात्र पुन्हा कानपूर नजीक सरकू लागल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे. भाविक लोक गंगामाईची पूजा करू लागले आहेत आणि परत येणाऱ्या गंगेत स्नान करणारांची गर्दीही वाढत चालली आहे.

---

### सिने-कलावंतांनी एकाच वेळी सहापेक्षा जास्त चित्रपटांत कामे करू नयेत

एकाच वेळी सहापेक्षा जास्त चित्रपटांत काम न करण्याची सूचना नटनट्यांना देण्याचे फिल्म प्रोड्यूसर्स गिल्ड ऑफ इंडिया, इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशन आणि सेंट्रल सर्कीट सिने असोसिएशन ह्यांनी ठरविले आहे. एकाच वेळी फार चित्रपटांत काम करणाऱ्या नट-नट्यांमुळे चित्रपटांच्या कामात तर व्यत्यय येतोच, पण त्याबरोबर नटनट्यांचे कामही व्हावे तेवढे चांगले होत नाही; प्रत्येक निर्मात्याला त्या फारच थोडा वेळ देऊ शकतात. अमेरिकेत, नट-नट्यांना एकाच वेळी दोनपेक्षा अधिक चित्रपटांत काम करण्याची परवानगी नसते. तेव्हा सहा चित्रपटांची नियोजित कमाल मर्यादा अप्रस्तुत नाही. नट-नट्यांना ह्या सूचना पाळायला कितपत भाग पाडता येईल, ह्यावर सर्व काही अवलंबून आहे. अधिक गरज कुणाला आहे, प्रथित यश नट-नट्यांना का निर्मात्यांना, ह्या प्रश्नाचे उत्तर निर्णायक ठरेल.


## पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंटस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणे

७६८ (जुना ६०९) सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणे ३०

स्थापना : १३-२-१९१४]      [दूरध्वनी क्रमांक : ५७१५६

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल झालेले शेअर भांडवल | रु. ७,७५,७०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,१४,७२० |
| सभासद काटकसर फंड | रु. ५९,४७,००० |
| ठेवी | रु. २३,३८,००० |
| गुंतवणूक | रु. १७,९२,००० |
| खेळते भांडवल | रु. १ कोटीचे वर |

१. बँकेचा ऑडिट वर्ग 'अ' गेली १५ वर्षे आहे.
२. बँकेची भव्य इमारत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधण्यात आली आहे.
३. बँकेच्या खेळत्या भांडवलापैकी ६० टक्के रक्कम सभासदांकडून काटकसर फंडाच्या रूपाने उभारण्यात आलेली आहे.

ठेवींचे दर :-

सेव्हिंग्ज द. सा द. शे. चार टक्के, चालू द सा. द. शे. एक टक्का

| कायम ठेव | १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे | ४ वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| दर रुपये | ६-०० | ६-२५ | ६-५० | ६-७५ | ७-०० |

बा. गो. थोरात, बी. ए.
अध्यक्ष

स. ग. मिसाळ,
कार्याध्यक्ष

नारायण कृष्ण कुलकर्णी, मॅनेजर



## दीपावली अभीष्टचिंतन

मंगलप्रसंगी साखर वाटतात पण चिकित्सक ती वारणेचीच असल्याची खात्री करतात.

# श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि.,

— वारणानगर —

तार : वारणासाकर : वारणानगर ]  [ फोन नं. कोल्हापूर २२४६

पोस्ट : वारणानगर, तालुका पन्हाळा,
जिल्हा कोल्हापूर.
(महाराष्ट्र)

श्री. बाजीराव बाळाजी पाटील,
व्हा. चेअरमन.

श्री. विश्वनाथ आण्णा कोरे,
चेअरमन

WITH BEST COMPLIMENTS FROM

# M/s. VARSHA INDUSTRIES

## SPECIALISTS IN NON-FERROUS CASTINGS




Fully Equipped With
Modern Instruments,
Technical Assistance and
Laboratory.

*Please Contact for Your*
*Non-Ferrous Castings*

**M/s. VARSHA INDUSTRIES**
Office : 64/23, Erandavana,
Law College Road, Poona 4.

**ARTHA**
Divali Number, 1970
Price Rs. 2 = 00

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No MH. 80, Licence No. 175




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६